# द्वितीय वर्ष कला

## सत्र - IV (CBCS)

# मराठी अभ्यासपत्रिका क्र. - III

## SUBJECT CODE: UAMAR401

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रवींद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **श्री. अनिल आर. बनकर**
कला आणि मानव्य विद्याशाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **प्रा. बालाजी ग्यानोबा कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **प्रा.डॉ. मनिषा बनसोडे**
सहयोगी प्राध्यापक,
एस.एम.डी.एल.आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, कॉलेज,
सेक्टर - १/ई, सिडको कॉलनी, कळंबोली,
नवी मुंबई, पनवेल, जि. रायगड.

: **प्रा. डॉ. भाऊसाहेब नन्नवरे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
के.एम.सी.महाविद्यालय,
खोपोली, जि.रायगड.

: **प्रा. विवेक कुडू**
सहाय्यक प्राध्यापक,
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,
पालघर, मुंबई

**जानेवारी २०२२, मुद्रण - १, ISBN - 978-93-91735-82-1**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १अ. | आगरी भाषेची वैशिष्ट्ये | ०१ |
| १आ. | आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र, लोकसंस्कृती व आगरी साहित्याचा इतिहास | ०८ |
| २. | आगरी बोलीतील निवडक कवितांचा अभ्यास | १७ |
| ३. | आगरी बोलीतील निवडक कथांचा अभ्यास | ५७ |


❖❖❖❖

## द्वितीय वर्ष बी.ए.मराठी अभ्यासपत्रिका क्र. ३
## मराठीच्या बोलींचा अभ्यास बोली
## सत्र -४ (चौथे) एकुण व्याख्याने ४५, श्रेयांकने ३

**घटक १** एकुण व्याख्याने १५, श्रेयांकने १

अ) आगरी बोलीची वैशिष्ट्ये – व्युत्पत्ती आणि विकास, व्याकरणिक वैशिष्ट्ये, उच्चार प्रक्रिया– म्हणी , वाक् प्रचार, शब्दसंग्रह इ.

आ) आगरी लोकसंस्कृती, आगरी बोलीचे प्रभाव क्षेत्र, आगरी साहित्याचा इतिहास

**घटक २** एकुण व्याख्याने १५, श्रेयांकने १

आगरी बोलीतील निवडक कवितांचा अभ्यास : १) सारेबाराचा पलाट, मायच्यं सुरक्याची गोदरी – प्रा. एल्.बी पाटील, २) आगरी-कोळी, आय्-चंद्रकांत मढवी, ३) आबचा आगोर-डॉ.संजीव म्हात्रे, ४)मीठ, नवी मुंबई -रामनाथ म्हात्रे, ५) इनकूरी, आमी जातीच हाव आगरी –पुंडलिक म्हात्रे, ६) जमिनीचा तुकरा – म.वा.म्हात्रे, ७) बंदर, खोपट –मुकेश कांबळे, ८) आलं कंपनीवालं आलं सौ.सुनंदा मोडखरकर, ९) पायंडा – सौ. शोभना रामकृष्ण पाटील, १०) एस्. ई. झेड नवरा – गणपत म्हात्रे, ११) खलाटी – अविनाश पाटील, १२) दिप्तीला गाव सारा धावला – दिनानाथ वेटू पाटील, १३) आमचेकरं आता परकल्प आयलंय – विश्वास ठाकूर, नेरूल, १४) भाकरी, शून्य – सौ.दमयंती भोईर

**घटक ३** एकुण व्याख्याने १५, श्रेयांकन १

आगरी बोलीतील निवडक कथांचा अभ्यास : १) साकव – परेन जांभळे २) मौल – शंकर सखाराम, ३) म्हारत्याचा तेरावा – मोहन भोईर, ४) बेमट्याचा बेरा – चंद्रकांत पाटील, ५) हरिभाऊ घरत – भगताचा उतारा ६) वादळ – सौ. वासंती ठाकूर, ७) निवरणुका – ए.डी.पाटील, ८) जोल – अविनाश पाटील, ९) जाण – गजानन म्हात्रे, १०) शालन जावाचा हाय – प्रा. झयवंत पाटील

### चतुर्थ सत्रांत परीक्षेचे स्वरूप

प्रश्न क्र. १ घटक १ वर अंतर्गत पर्यायासह एक प्रश्न (गुण २०)

प्रश्न क्र. २ घटक २ वर अंतर्गत पर्यायासह एक प्रश्न (गुण २०)

प्रश्न क्र. ३ घटक ३ वर अंतर्गत पर्यायासह एक प्रश्न (गुण २०)

प्रश्न क्र. ४ घटक १,२ व ३ यांवर अंतर्गत पर्यायासह तीन टिपा (गुण ३०)

प्रश्न क्र. ५ घटक १,२ व ३ यांवर अंतर्गत वस्तुनिष्ठ स्वरूपाचे ९ पैकी कोणतेही ५ प्रश्न सोडविणे (गुण १०)

**संदर्भ ग्रंथ :** १) भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : सर्वेक्षण मालिका मुख्य संपादक – डॉ. गणेश देवी, महाराष्ट्र खंड संपादन : अरूण जाखडी, पद्मगंधा प्रकाशन, २०१३

❖❖❖❖

# १अ

# आगरी भाषेची वैशिष्ट्ये - व्युत्पती आणि विकास

**घटक रचना :**

१ अ.१ उद्दिष्टे

१ अ.२ प्रास्ताविक

१ अ.३ आगरी बोलीतील व्युत्पती

१ अ.४ आगरी बोलीचा विकास

१ अ.५ समारोप

## १ अ.१ उद्दिष्ट्ये

- आपल्या बोलीत व मातृभाषेत अभिव्यक्त होण्याचा अधिकार राजघटनेने दिलेला आहे. त्यामुळे बोलीला योग्य तो सन्मान मिळावा म्हणून.
- बोलीच्या अनुषंगाने समाजाचा, संस्कृतीचा अभ्यास करणे.
- बोली चा ठेवा जपणे त्याचे संवर्धन करणे.
- बोलीतील लोकगीते, लोककथा, लोकसाहित्य समजून घेता यावे याचाही अभ्यास.

## १ अ.२ प्रास्ताविक

मराठीच्या बोलीचा अभ्यास यामध्ये ‘आगरी बोली’ या द्वितीय वर्ष कला शाखेलाही लावण्यात आलेल्या अभ्यासक्रमात प्रामुख्याने आगरी बोली, तिची व्युत्पती आणि विकास, आगरी बोलीची वैशिष्ट्ये, उच्चारप्रक्रिया, म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह इ. तसेच आगरी लोकसंस्कृती, आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र, आगरी साहित्याचा इतिहास इत्यादींचा अभ्यास करावयाचा आहे.

भाषा ही मानवी समूहाने परस्पर विचारविनिमयासाठी, संपर्क निहाय व अभिव्यक्तीसाठी हेतूपूर्वक निर्माण केलेली प्रक्रिया आहे. ध्वनीयुक्त संकेत हे त्याचे साधन आहे. उच्चार व श्रवण हे माध्यम आहे. समाजातील व्यक्तीचे व्यवहार भाषेच्या सहाय्याने चाललेले असतात. प्रत्येक समाजाची भाषा भिन्न भिन्न असते. भाषा ही परिवर्तनशील आहे. त्यामध्ये बोली हे दैनंदिन व्यवहाराचे साधन आहे. बोली मौखिक परंपरेने आलेले असल्यामुळे तिच्याअंगी एक जिवंतपणा

असतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य असते. त्यामुळे अशा बोलीची व्युत्पती कशी झाली व तिचा विकास कसा झाला हे पाहणे आवश्यक आहे.

## १ अ.३ आगरी बोलीची व्युत्पती

आगरी बोली मुख्यतः सह्याद्रीपासून अरबी समुद्रापर्यंतचा पश्चिमेकडील प्रदेश म्हणजे पूर्वीचा अपरान्न होय. कोकण हे त्याचे प्राकृत नाव. ठाणे, मुंबई, कुलाबा, रत्नागिरी हे जिल्हे व गोवा हे प्रदेश कोकणामध्ये येत असत. आज ठाणे, मुंबई, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे जिल्हे कोकणचा भाग मानला जातो.

आगरी बोली ही प्राकृत समूहातील बोली आहे. तसेच यादवकालीन भाषेस ती खूप जवळची आहे. आगरी समाज शिलाहार काळापासून कोकणात स्थायिक झाला व तिथलीच स्वतंत्र अशी भाषा बोलू लागला. भौगोलिक परिस्थितीनुरुप त्यांच्या बोलीवर परिणाम झाला. आगरी माणसाचा मुख्य व्यवसाय शेती व इतर व्यवसाय रेती काढणे, मासेमारी, मीठ पिकविणे हा होता. त्यानुसार व्यवसायानुरुप भाषेत वेगवेगळे शब्द आलेले दिसतात. आगरी बोली ही पूर्णपणे स्वयंभू नसावी. तरीसुद्धा तिच्यातील बरीचशी शब्दसंपदा तिची स्वतःची आहे. बोलण्यास सुलभ व ऐकण्यास कर्णमधुर अशी ही बोली आहे. जी आगरात वाढली, रुजली व बहरली. या बोलीच्या निर्माणकर्ते हे आगरातले कष्टकरी आहेत.

परंतु काही अभ्यासकांच्या मते आगरी बोलीवर प्राचीन मराठीचे संस्कार आहेत. जो आगरी समाज आधीपासून येथे स्थिर होता त्यांच्यावर त्यांचा प्रभाव पडला. महानुभावपंथी वाङ्मया मधील महदंबेने गायलेले थवळे आजही आगरी समाजातील लग्नगीतांशी साम्य साधणारे आहे. लग्नामध्ये 'धवळे' गाण्याची परंपरा आजही आगरी समाज जोपासतो आहे. बोलीभाषा या प्रादेशिकतेनुसार, जातिभेदानुसार, स्थानभेदानुसार, संस्कृतीनुसार, व्यवसायानुसार अस्तित्वात येतात. व्यक्ती ज्या भौगोलिक प्रदेशात राहतात व ज्या समाजात दैनंदिन व्यवहार करतात त्या समाजाचा व्यवहारातील बोलीला त्या समाजाची बोलीभाषा असे म्हणतात.

बोली या मौखिक परंपरेने चालत आलेल्या असतात. त्यांचे लिखित पुरावे सापडत नाहीत. त्यामुळे अमुक एक बोली कोणत्या काळात निर्माण झाली हे सांगणे कठीण होऊन बसते. बोली एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमीत होत असताना तिच्यातील काही शब्द लोप पावतात तर काही शब्दांची नव्याने भर तिच्यात पडत असते.

अविनाश पाटील यांच्या मते आगरी समाज नागरी वस्तीपासून दूर खाड्यांच्या किनारी वसला. शिक्षणापासून अथवा बाह्य संस्कारापासून दूर राहिला. दुर्गम खेड्यात राहिल्याने सांस्कृतिक प्रदूषणापासुन तो दूर होता. त्यामुळे अनेक शतके अनेक पिढ्या त्यांनी आपली अपभ्रंशीय महाराष्ट्री बोली म्हणजे प्राकृत बोली आपली बोली म्हणून जतन केली. पुढे यादवकाळीन मराठीचेही संस्कार तिच्यावर झाले. त्यामुळे मराठी भाषेचे बोली स्वरूपातील प्राकृतरूप म्हणून आगरी बोलीत अनेक साम्य आपल्याला आढळून येतात.

जर भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण या ग्रंथात 'गणेश देवी' आगरी बोलीची व्युत्पती पुढीलप्रमाणे सांगतात.

या कोकणची पूर्वीची मानवी वसाहत भौगोलिकदृष्ट्या पाहिली तर दर्यावर, दर्यावर्दी म्हणजे कोळी, त्यानंतर पूर्वेकडे गेल्यावर आगरातला आगरी, माळावरचा माळी, आणि वनातला म्हणजे आदिवासी या दरम्यान होती. हे सर्व मानवी समूह अनार्थ म्हणजे द्रविड संस्कृतीमधील आहेत. यातील दर्यावरचा कोळी आणि माळावरचा माळी या दोन्हींच्या मधील आगर (नारळी, पोफळी, भाजीपाला, भात, मीठ वगैरे पिकविण्याचे ठिकाण) पिकविणारा तो आगरी समाज होय. त्या समाजाची बोली ती आगरी बोली.

आगरी समाज हा मूलतः कुणबी म्हणजे शेतीप्रधान आहे. त्याच्या कष्टावर व त्याला मदत करुन बलुतेदार व इतर समाज जगत होते. हे सारे समाज आगरातील समाज. हे समाज आगरी लोकांबरोबरच त्यांची आगरी बोली बोलत होते व बोलतात म्हणून त्या बोलीस आगरी बोली असे जातिवाचक न म्हणतात आगरी बोली किंवा आगरातील बोली असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. मराठी भाषा ही संस्कृत - प्राकृत अपभ्रंश आणि नंतर मराठी अशी बदलत जात अस्तित्वात आली. यादवकालीन मराठी ही प्राकृत होती. भागवत संप्रदाय व महानुभाव संप्रदाय यातील ग्रंथनिर्मिती ही यादव काळातच झाली. ती साधारण बाराव्या तेराव्या शतकात झाली. आगर बोली ही प्राकृत बोलीतीलच एक बोली आहे. तिच्यात यादवकालीन बोलीतील, ज्ञानेश्वरी, विवेकसिंध लीलाचरित्र वगैरे ग्रंथातील शब्दांबरोबरच संस्कृतमधील शब्दांची अनेक अपभ्रंश रूपे दिसून येतात. आगरबोली निश्चित कोणत्या काळात बोलली जात होती हे सांगता येत नाही. मात्र ही बोली प्राकृतकालीन आहे एवढेच नोंदवता येईल.

## १ अ.४ आगरी बोलीचा विकास

भाषा ही जनसमूहाच्या संस्कृतीचा भाग असल्याने ती संस्कृतीच्या प्रकटीकरणाचे एक महत्त्वाचे साधन होय. ती भाषा त्या समूहाच्या वर्तुणूकीच्या आकृतीबंधाचे स्वरूप स्पष्ट करते. खाण्यापिण्याच्या सवयीपासून ते आध्यात्मिक ज्ञानसाधनेपर्यंत सर्व गोष्टी भाषेच्या माध्यमातून साध्य होतात. त्या त्या समाजमनाचे, जीवनाचे वास्तव स्वरूप जाणून घ्यायचे असेल तर त्यांच्या बोलींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

कोणतीही भाषा टिकवून ठेवायची असेल तर ती लिखित स्वरूपात जतन करुन ठेवणे आवश्यक असते. आगरी समाज बरीच वर्षे शिक्षणापासून वंचित राहिला त्यामुळे लिखित स्वरूपात आगरी बोली जतन करता आली नाही. परंतु १९६० नंतर शंकर सखाराम व परेन जांभळे यांच्या साहित्यातून आगरी बोलीची ओळख महाराष्ट्राला झाली. आधी भाषा बनते व मग तिचे व्याकरण ठरते. त्यानुसार आगरी बोलीचेही स्वतंत्र असे व्याकरण आहे. आगरी बोली ही शब्दसंपन्न अशी बोली आहे. आगरी समाज जेव्हा शिक्षण घेऊ लागला तेव्हा त्यांच्या बोलीत अनेक प्रमाण मराठी भाषेतील शब्दांची सरमिसळ होऊ लागली, त्याप्रमाणे बोलीचे स्वरूप बदलत गेले.

आगरी बोली ही इतरांच्या भाषेहून बरीच भिन्न आहे. दोन आगरी माणसे एकमेकांशी बोलत असताना इतरांना त्याचा चटकन उलगडा होत नाही. या आगरी भाषेत (बोलीत) कशा पद्धतीने उच्चार केले जातात ते आपण पाहू.

**१) वर्ण :**

१) 'ग' च्या ठिकाणी मूर्धन्य 'ज' चा प्रयोग करतात. उदा. जेला - गेला

२) घ च्या ऐवजी झ योजतात. उदा. घेतले - झेतले

३) ड च्या ऐवजी र ची योजना करतात. उदा. उडाला - उराला, वाडा - वारा

४) कधी र च्या ठिकाणी ल चा वापर करतात. उदा. रडणे - लरणे, गाडी - गारी

५) दैी मी या कथाऐवजी सर्वनामाय तृतीयेचा नी हा प्रत्यय जोडून मिनी असे रूप साधतात. उदा. मिनी काय केला किंवा तूनी काय केला

६) मराठी ढ या अक्षराचा लोप होऊन ऱ्ह हे अक्षर येते. उदा. गाढव - गाऱ्हव, पेढा - पेऱ्हा, पुढ्यांन - पुऱ्हान.

७) मराठीतील एखाद्या अक्षरावरचा अनुस्वार आगरी बोलीमध्ये देत नाहीत. उदा. उंट - उट, पिंपळ - पिप्पल, गंध - गन, मांजर -माजर

८) मराठीतील 'व' ऐवजी 'य' वापरतात. उदा. वेडपट - यडपट, वेडा - येरा

९) मराठीतील 'ळ' चा उच्चार 'ल' असा करतात. उदा. वेळ - येल, पळ - पल, बाळ - बाल, माळ - माल, शाळा - शाला

१०) मराठीतील 'छ' या अक्षराऐवजी स किंवा श्य होतो. उदा. छत्री - सत्री, छत - श्यत, छगन - श्यगन, छाती - श्याती

११) मराठीतील 'व' ऐवजी 'इ' वापरतात. उदा. विट - इट, विहीर - इहीर, विमान - इमान

१२) आगरी बोलीत 'इ' या अक्षराऐवजी 'य' वापरतात. उदा. कई - कय, आई - आय, जावई - जावय.

१३) मराठीतील 'क्ष' ऐवजी 'ख' अक्षर वापरतात. उदा. अक्षयतीज - अखयतीज, नक्षत्र - नखीतर, क्षार - खार, अक्ष - अख.

१४) मराठी शब्द बोलताना कधी कधी मदले अक्षर गाळले जाते. उदा. कशाला - कला, दिवस - दिस, शहाणा - शाणा, म्हणजे - म्हजे

वरील नियमांचे अवलोकन केल्यास मराठी शब्द आगरी बोलीत जसेच्या तसे स्विकारले नाहीत हे दिसून येईल. आपले काही पूरातन शब्द या बोलीत जतन करुन ठेवलेले आहेत. काही नवीन शब्द निर्मान केले तर काही मराठीतले शब्द आगरी संस्कार करुन स्विकारले आहेत. म्हणून आगरी बोली ऐकण्यात व बोलण्यास मधुर वाटते. आगरी बोली ही शब्दसमृद्ध बोली आहे.

काही खास आगरी शब्द आपल्याला पाहता येतात.

| | | |
|---|---|---|
| कांव - पान कावळा, | सोनार - सुतार पक्षी, | ढेग-बगळा, |
| शालोंकी- साळुंखी | पावशी - कोकीळा, | बकोर - बोकड, |
| माकर - माकड, | गाऱ्हव - गाढव, | कांवल्या जोगी - घोणस, |
| पानमार - पानसाप | मुरकूट - मच्छर, | घोण - गोम |
| कोकमा - कोकम | मुसूना - मोसंबी, | मुंबोर - उंबर |
| करदा - करवंद | काकरी - काकडी, | जोरव्हा - सावरीचे फळ |
| आळवा - अळू, | जंठार-लाल भोपळा, | भुशिंग - भुईमुग, |
| कोथुंब्री - कोथिंबीर | चिंचखय - शिकेकाई | ज्याऊल - तांदूळ |
| धान - भात, | पोळं - घिरडे, | कांजी - मच्छीचा कालव |
| सिसोर - मच्छीचा रस्सा, | भुजणे - भाजणे | उकंर - उकड |
| रामोसी - मरण | खापरली - कोंड्यापासून बनविलेला पदार्थ | |

पानोल - पीठ मीठ व तिखट व मासे यापासून बनविलेला पदार्थ

| | | |
|---|---|---|
| ऱ्होय - भाकरी, | लाऊ - लाडू, | बुकी - पावडर |
| चिवरा - चिवडा | कडवे - लाडू, | पुरण्या - करंज्या |

**आगरी बोलीतील काही वाक्प्रचार :**

१. काळीचा नाऱ्या - कळ लावणारा नारद
२. घोंगरीत पाणी आला - डबगाईला आला
३. सनी गती लावणे - विल्हेवाट लावणे
४. कानचिंबली घेणे - आठवण करुन देणे
५. आगीचा कोंबराळ होणे - उद्विग्न होणे
६. आरकाठी घालणे - अडवणूक करणे
७. आखरान करणे - जोडणे
८. कांदा आरवा करणे - तुर्मी जिरविणे
९. कोसळन होणे - अवेळी मरुन जाणे
१०. खूर मांड बसणे - तळपायावर गुडघे वर करुन बसणे
११. ठाहाफोर करणे - जोराने ओरडणे
१२. चिखलान गाय रुपने - संकटात सापडणे
१३. चुलीचं गुण असणे - घराव्या व्यवहारात दोष असणे
१४. ढेमली मारणे - धडक मारणे
१५. थजा लावणे - कामगिरी पूर्ण करणे
१६. निसवला जाणे - कणीश बाहेर पडणे

१७. भंगारी फुटणे – खोक पडणे

१८. मालवणे – शेताच्या बांधला चिखलाने लेप करणे

१९. लगारने – जवळीक साधणे

२०. हेल करणे – ओझे वाहून नेणे

**आगरी बोलीतील म्हणी -**

१. आगीशी शेकना न मुरखाशी बोलना

२. अनाऱ्याशी घारली गाठ, उठ ग मानकू चटणी वाट

३. एक विधा न माणसा शिधा

४. कनचा काय न टिमकीची बाय

५. खातय सान सूपा न हाय मांजरीचे रूपा

६. गावभर कामा न कोन नय येय कामा

७. घराला नय वसा न खलारीन नय खोसा

८. चिरी चिप न गारका लिप

९. जीतंपनी नाय दिली रोटी न मेलंपनी खजूर वाटी

१०. बऱ्यान मासा न हंडीला भरोसा

११. दिरकीचा डिगला न खानार भुगला

१२. कुकरची कळ न बघाला कळ

१३. भाकरीला नाय पीठ न पानग्याला नाय मीठ

१४. मेलेला कोंबरा आगील भीत नाय

१५. कसली बाय न कोपऱ्यात जाय

१६. हातभर काकरी न सव्वाहात बी

१७. वारपे तुपाशी नय तं उपाशी

१८. आयत्यावर कोयता

१९. घोरा भाऱ्याशी न शिंगरु हेलपाट्याशी

२०. रमान्याला शेनपा न मुरखाला टेनपा

आगरी बोली ही अशा प्रकारे स्वतःचे नियम असणारी किनारी बोली आहे. त्यामुळे ती स्वतंत्र वेगळी आहे. तिची उच्चारप्रक्रिया, व्याकरणव्यवस्था वर्णध्वनी इत्यादी स्वतंत्र आहेत. आपला असा स्वतंत्रपणे विकास या बोलीने केलेला आहे. मराठी प्राकृत भाषेचे संस्कार आगरी बोलीवर झालेले असल्याने ते आजही टिकून आहेत. आगरी बोली बदलण्याचे प्रमुख कारण म्हणजे हा समाज अनेक वर्षे शिक्षणापासून वंचित राहिला त्यामुळे बाह्यसंस्कृतीचे आक्रमण सीमित राहिले. शहरीकरणानंतरही हा समाज समाविष्ट नव्हता. सत्तर ऐंशीच्या दशकानंतर मोठ्या भाषिक व शैक्षणिक बदलानंतर आगरी बोली परिवर्तनाकडे झुकलेली दिसून येते.

अविनाश पाटील यांच्या मते, आगरी जातीची दसआगरी ही पोटजात आजही अस्तित्वात आहे. दसआगरी जातीची वस्ती वसई, पालघर व ठाणे जिल्ह्यात आहे. पुढारी दस आगरी व डंगामी दस आगरी असे स्थानपरत्वे तिचे मुख्य उपप्रकार आहेत. उच्चार, हेल, शब्द यामध्ये फरक आहेत. समुद्रसपाटीपासून जवळ असलेल्या आगरी, पठारी दसआगरी बोली बोलतात. वर डोंगरी भागात राहणारे दस आगरी डंगामी बोलीभाषा बोलताना दिसतात. या बोलीत वाडवली, भंडारी, आदिवासी बोलीचा प्रभाव अधिक दिसून येतो. पहारी दस आगरी बोली स व क्ष चा 'ह' होतो. तसेच 'च' चा 'स' होतो. मात्र डंगानी दस आगरीत हा बदलत होत नाही. उत्तर ठाणे जिल्हा विशेषतः जव्हार, मोखाडा, डहाणू भाग आदिवासी विभाग असल्याने येतील पठारी दस आगरी बोलीची हेल आदिवासी बोलीच्या जवळपास जाते. म्हणजेच आगरी बोलीच्याही काही पोट बोलीभाषा आहेत. आगरी बोलीत यादवकालीन भाषेचे व महानुभावकालीन संत साहित्याचे शब्द विपुल प्रमाणात आढळून येतात. एकाच बोलीत प्रादेशिक बदलानुसार भाषिक बदली आढळून येतात.

**आपली प्रगती तपासा.**

**प्रश्न १. सविस्तर लिहा.**

१) आगरी बोलीभाषेचे प्रभाव क्षेत्रे कोणते ?

२) भाषा समृद्धीमध्ये अगरीला भाषिक स्थान स्पष्ट करा.

**प्रश्न २. एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) 'आगरी बागाईतदार' लोक कोणत्या जिल्हयात आढळतात ?

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## १ अ.५ समारोप

अशा प्रकारे आगरी बोली ही नव नवोन्मे शालिनी आहे. प्रसिद्ध लेखक परेन जांभळे यांच्या शब्दात सांगायचे तर 'कोणतीही बोली म्हणजे स्वयंप्रज्ञ प्रकाराच असतो. अव्यक्त अमूर्त भावनांचे व्यक्त गोचर रूप हे बोलीतूनच जाणवते, दृश्यमान होते. बोली ही जन्मजात, पारंपारिक, उर्जस्वल लोकसंस्कृतीच असते. अक्षर साहित्याच्या खाणी म्हणजेच बोली होत. कोणत्याही जनसमूहाची बोली ही अल्पाक्षरव आणि अर्थबहुल या विशेषणांनी ओथंबलेली असते. कोकणात, वाडवली, मालवणी, चित्पावनी, कोकणी इ. च्या जोडीला आगरी बोलीसुद्धा नवनवोन्मेषशालिनी प्रतिमेचे अक्षर लेणे आहे.

❖❖❖❖

# १आ

# आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र, लोकसंस्कृती व आगरी साहित्याचा इतिहास

**घटक रचना :**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रास्ताविक

## १.१ उद्दिष्टे

- आगरी बोलीच्या प्रभावक्षेत्रातील आगरी संस्कृती बदलाचे बारकावे टिपणे
- आगरी लोकसंस्कृतीचा सखोल अभ्यास करणे
- आगरी साहित्याचा इतिहास जाणून घेणे.
- या सर्वातून आगरी बोलीचे वेगळेपण सिद्ध करणे.

## १.२ प्रास्ताविक

आगरी बोलीचा इतिहास जाणून घेतल्यानंतर तिची व्युत्पत्ती जाणून घेतल्यानंतर आगरी लोकसंस्कृतीचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. कारण बोली या लोकसंस्कृतीला अधिक जवळच्या असतात. त्या त्या बोलीतील लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार हे इतर भाषांपासून त्या बोलीला वेगळेपण देतात. बोलीची स्वतंत्र अशी नियमव्यवस्था असते. ती समजून घेण्यासाठी लोकसंस्कृतीचा अभ्यास आवश्यक असतो. बोली या मौखिक पद्धतीने पुढच्या पिढीकडे जात असते, त्यामुळे त्या बोलीची व्यापकता लोकसंस्कृतीच्या अंगानेच शोधावी लागते. बोली या आपला वेगळेपणा नेहमीच जपतात. आगरी लोकांचे राहणीमान त्यांचे रीतीरिवाज, रूढी, परंपरा जाणून घेणे तेवढेच आवश्यक बनते. त्यातूनच बोलीची विविधता, सौंदर्य आपल्या लक्षात येते.

बोलीचे सौंदर्य जाणून घेतल्यानंतर आगरी साहित्याचा इतिहास आपल्याला जाणून घ्यावा लागतो. कारण दर सात कोसावर भाषा बदलते हे या साहित्यातूनच प्रत्ययास येते. प्रत्येक जिल्ह्यातील आगरी बोली वेगवेगळ्या प्रकारे अभिव्यक्त होताना दिसते. त्यामुळे बोलीची समृद्धता लक्षात येते. म्हणून आगरी बोलीतील साहित्याची पार्श्वभूमी व त्याचा विकास आपल्या अभ्यासासाठी महत्त्वाचा ठरतो.

**१) आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र :** वेगवेगळ्या ग्रंथामध्ये वेगवेगळ्या पद्धतीने आगरी समाजाचे (बोलीचे) प्रभावक्षेत्र सांगितलेले आहे.

१) महाराष्ट्रीय ज्ञानकोष : ज्ञानकोशकारांच्या मते आगरी लोकांची वस्ती कुलाबा जिल्ह्यातील पेण, पनवेल, अलीबाग, कर्जत, रोहे व माणगाव तालुक्याच्या थोडा भाग जंजिरा आणि ठाणे जिल्ह्याचा बराच भाग या ठिकाणी पसरली आहे.

२) भारतीय संस्कृती कोश : संस्कृतीकोशामध्ये ठाणे जिल्ह्यातील पालघर पासून ते कुलाबा जिल्ह्यातील श्रीवर्धनपर्यंत समुद्र किनाऱ्यावर आगरी लोकांची वस्ती आहे.

३) डॉ. नेताजी पाटील - (पालघर) : यांच्या मते आगरी हे मध्ययुगीन मुंबईचे रहिवाशी असून इतिहासपूर्व काळापासून त्यांचे वास्तव्य मुंबई, ठाणे व कुलाबा या जिल्ह्यात आहे.

४) गो.मं. कालेलकर - गो.म. कालेलकर यांच्या मते आगरी हे मुख्यत्वेकरुन ठाणे व कुलाबा जिल्ह्यात आणि जंजिरा संस्थानात आढळतात.


५) कुलाबा मॅझेटिअर - कुलाबा जिल्ह्यातील शेतकऱ्यांपैकी आगरी हे बागाईतदार असल्याचे म्हटले जाते व ते प्राधान्याने अलिबाग आणि पेण यांच्यामधील खाली किनारी राहतात.

६) प्रा. शंकर सखाराम - यांच्या मते ठाणे, कुलाबा, मुंबई, नवी मुंबई येथला समाज हा आगरी समाज आहे. हा मूळ द्रविडीयन पंथाचा समाज आहे. पुढे त्या लोकांच्या वसाहती अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत, रोहे, माणगाव, मुरुड व ठाण्यापर्यंत पसरत गेल्या.

या सर्व संदर्भावरुन आगरी बोलीचे (समाजाचे प्रभावक्षेत्र हे ठाणे, मुंबई, कुलाबा (रायगड) नवी मुंबई इथे असलेले दिसते.

**१) आगरी लोकसंस्कृती :**

ज्ञानकोश, संस्कृतीकोश व कुलाबा गॅसेटिअर व इतर तज्ञांच्या मते आगरी जातीच्या पोटजातीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.




**१) शुद्ध आगरी -** यात तीन पोटजाती येतात. शुद्ध आगरी म्हणजे मूळचे आगरी लोक. आगर पिकविणारे, त्यातील मीठ पिकविणारे ते मीठ आगरी, ढोल वादन करणारे व नृत्य करणारे ते ढोल आगरी, काही ठिकाणी ढोल आगरीचा अपभ्रंश ढोर असा झाला आहे. पण त्या काही ढोर मेहनत

करणारा तो ढोर आगरी व कमी मेहनत करणारा सोन आगरी असा पोटप्रकार अलिबाग तालुक्यात होता. ढोर आगरी म्हणजेच खारकी, खारपाटे व मोन आगरी म्हणजे उथळी. ढोल आगरी आज जरी नाव प्रचारात नसले तरी ते परंपरा टिकवून ताशे ढोल वाजंत्री आहेत. लग्न प्रसंगी आजही ते वाजवतात.

**२) दास आगरी / दस आगरी :**

दास आगरी पालघर तालुक्यात आढळतात. तिथे त्यांना कराड आगरी म्हणतात. ह्या लोकांविषयी एक दंतकथा सांगतात. एका बाईची मुले जगत नव्हती. तेव्हा तिने महारांच्या देवाला नवस केला की माझे मूल जगले तर डोक्यावर गाईचे हाड व कानावर लोकरी पूल खोवून ती महारवाड्यात प्रवेश करील. पुढे दैवयोगाने तिचे मुल जगले. नंतर तिने केलेला नवस फेडला. त्या धर्मवाटप कृत्याबद्दल लोकांनी तिला जाती बाहेर टाकले. तिचे वंशज ते दास आगरी होत. शुद्ध आगरी त्यांच्याशी रोटी-बेटी व्यवहार करत नाही.

**३) वरप आगरी :** हे लोक मूळचे आगरी पण पुढे ते ख्रिस्ती झाले. नंतरच्या काळात ब्राह्मणांकरवी पुन्हा ते आगरी झाले. अशाप्रकारे ख्रिस्ती व नंतर पुन्हा आगरी झालेल्या लोकांना नव मराठे हे नाव मिळाले. शुद्ध आगरी व दास आगरी या लोकांना हलके मानतात.

लोकआस्थापिकेनुसार आगरी लोकांच्या पूर्वजातीची माहिती वेगवेगळ्या स्वरूपाची मिळते. ऐतिहासिक काळात आगरी लोकांचा उल्लेख आगरी, कुणबी, वाजे, कोळी असा आढळतो. आरमारावर लढणारे व तराफेवाले लोक आगरी मोठ्या प्रमाणात होते. खारकी, खारपाटे, खारकर असे खाडीच्या किनारी राहणारे लोक व खाडीपासून दूर डोंगराळ भागात राहणारे आगरी लोक हे उथळी अथवा उथळकर असे आगरी समाजाचे भौगोलिकदृष्ट्या भेद आहेत. पण आता त्यांच्या सांस्कृतिकदृष्ट्या मात्र भेद दिसून येत नाहीत असेही पहावयास मिळते.

**२) आगरी लोकसंस्कृती :**

आगरी समाजासंदर्भात वेगवेगळ्या संशोधकांनी वेगवेगळ्या पद्धतीने शोध घेतलेला दिसतो. यापुढे जाऊन आगरी संस्कृतीचा परिचय करुन घ्यावा लागतो. संस्कृतीची संकल्पना ही विविधांगी आणि गुंतागुंतीची आहे. कोणत्याही समाजातल्या संस्कृतीचे दर्शन त्यातल्या पाच गोष्टींच्या आधारे करतात. त्या समाजातील जन्मविधी, विवाहविधी, मर्तिकविधी, त्या समाजाचे एक ठराविक तत्वज्ञान, बोली, पापपुण्य संकल्पना व त्या समाजाचे दैनंदिन रीतीरिवाज, तसेच लोककथा, लोकगीते, पूर्वापार लोकसंगित यांचा विचार केला जातो.

**१) जन्मविधी :**

बाळाच्या जन्मानंतर तिसऱ्या दिवशी लाठा साजरा केला जातो. लाठा उजळणे म्हणजे खाटेच्या चार कोपऱ्यात तेलात भिजवलेली कापसाची वात पिठाच्या दिव्यात लावली जाते. त्याप्रसंगी इतरांना चणाडाळीपासून बनविलेला शेवया व पिठाचे मुटके वाटले जात असत.

मूल जन्मल्यानंतर पाचव्या दिवशी सरी हा कार्यक्रम केला जातो. सरी म्हणजे पाटा उजळणे होय. पिठाचे दिवे करुन त्यात तेल भरुन पाट्यावर पेटते ठेवतात. पाच कुमारिका मुली

तिथे तांदूळ फेकतात व बाळंतिनीची पूजा करतात. मध्यरात्री पाट्याजवळ पाटी पेन्सिल ठेवतात. त्या पाटीवर सटी (सटवी) बाळाचे विधीलिखित लिहिते अशी श्रद्धा आहे. जमलेल्या लोकांना गोड पदार्थ वाटले जातात. नंतर ब्राह्मणांकडे जाऊन नाव रास व नक्षत्र पाहिले जाते. पूर्वीच्या काळी आगरी माणसांची नावे काळवेळ व स्थिती या गोष्टीवरुन ठेवली जात. सोमवारी जन्मला तर सोमा, शिमग्यात जन्मला तर शिमग्या, एखाद्याची मुले जगत नसतील तर धोंड्या, डगजा, बाठ्या अशीही नावे नजर लागू नये म्हणून ठेवली जात असत.

**२) मर्तिकविधी :**

समाजात एखाद्याचे निधन झाले तर सर्व गाव जमा होत असे. जर माणूस लहानपणी किंवा तरुणपणी मेला तर मृतावर दु:खद अंत:करणाने अंत्यसंस्कार केले जात. जर वयोवृद्ध होऊन मृत झाला तर टाळ-मृदुंगाचा गजरात व गुलाल पैश्यांची उधळण करीत प्रेतयात्रा काढली जात असे. प्रेत जाळले जाते. स्मशानातील राख आणून पवित्रक्षेत्री त्याचे विसर्जन केले जाते. मृत्यूनंतर १२ व्या दिवशी धार्मिक विधी केले जात. मृतांचे नातेवाईक कपडे व पैसे या रूपाने दुखोटा देत. मृताच्या घरातील लोकांसाठी भात शिजवून आणत. त्याला दुडी असे म्हणतात. मुलगी व जाव गोडधोड पदार्थ बनवून आणत किंवा जिवाडी व मटणाचे हाऱ्याचे जेवण करुन सर्वजण जेवतात.

**३) आगरी कुटुंबव्यवस्था व पोशाख :**

आगरी समाजामध्ये एकत्र कुटुंब पद्धती होती. अनेक माणसे एकत्र गुण्या गोविंदाने राहत असत. शेतीची कामे करण्यास माणसांचा तुटवडा पडत नसे. सर्व सण समारंभ उत्साहात पार पाडले जात असत. आज मात्र विभक्त कुटुंबपद्धती पहावयास मिळते.

आगरी माणसाचा पोशाख हे त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. इथली भौगोलिक परिस्थिती व हवामान यावर त्याचा पोशाख ठरतो. गोड्या पाण्याचे दुर्भिक्ष व उष्ण हवामान यामुळे आगरी माणूस कमरेस रूमाल, अंगात कब्जा, डोक्यावर उन्हासाठी टोपी, स्त्रिया नऊवारी लुगडे गुडघ्यापर्यंत नेसत. अंगात चोळी व नाकात नथ असे. काठा लोकरीचा खोंडा डोक्यावर घेत. शुभप्रसंगी पांढरी ओढणी घडी करुन खांद्यावर घेतात त्याला फरकी असे म्हणतात. कानातले पेरे, पुतळ्याची माळ व कमरपट्टा हे अलंकार घालत.

आगरी माणसाचा प्रमुख आहार भात व मासळी हा होय. तांदळाची व नाचणीची भाकरी सकाळी न्याहारीसाठी व दुपारी भात-मासळी असा आहार असतो. मासळी हे त्यांचे मुख्य अन्न आहे.

**४) आगरी विवाहविधी :**

सर्व आप्तेष्ठांच्या सहकार्याने विवाह ठरविले जात असत. इतर जातीत केलेला विवाह निषिद्ध मानला जातो. द्विभार्या किंवा बहुभार्या पद्धत होती. स्त्रिलाही पुनर्विवाह करण्यास मुभा होती. तयाला पार असे म्हणत. आगरी लग्न सोहळा पाच दिवस चालत असे. यात धवलारनीचे काम अतिशय महत्त्वाचे असते. लग्नातील प्रत्येक विधी देवदेवतांच्या आश्वासनेने पूर्ण केला जातो. आगरी समाजात हळद या समारंभास जास्त महत्त्व आहे. हळद लावताना धवलारीन धवले (धवले) यात असते. लग्नात सर्व देवदेवता येऊन काम करतात असे वर्णन धवलारीन

आपल्या धवल्यामधून व आगरी बोलीतून करत असते. एकदंरीत मंगलमय व प्रसन्न वातावरण निर्मिती करणे हे धवलारणीचे काम असते. तवा चढविण्याच्या दिवशी घाऱ्या (वडे) मटणधान व मद्यपान महत्त्वाचे असते. लग्न महत्त्वाचे नसून हळद समारंभ महत्त्वाचा आहे अशी भावना आजही आगरी समाजात आहे. इतर किंवा अनेक विधीने युक्त असे लग्न लागते. विवाहानंतर विहीनथाळा, पाय धवनी, वरात - मानपान, नवरीचे नाव बदलणे गोंधळ हे विधीही साजरे केले जातात. आगरी समाजात हुंडा घेण्याची किंवा देण्याची प्रथा नाही. दोन्हीकडचे लोक खर्च वाटून घेऊन लग्नविधी करतात हा महत्त्वाचा भाग आहे.

### ५) आगरी सण उत्सव :

आगरी समाज हा हिंदू धर्मातील रीतिरिवाज व त्याने काही स्वतः निर्माण केलेले रीतिरिवाज यांचा मेळ घालून सण उत्सव साजरे करतात. धार्मिक वृत्ती व आपार श्रद्धा यामुळे सण उत्सवाचा वेगळेच महत्त्व प्राप्त झाले ्हे. शेतीमध्ये अतिकष्ट करुनसुद्धा तो अशा कार्यक्रमांना उपस्थित राहत असे. सामाजिक व वैयक्तिक असे सणवार केले जात असत. यामध्ये गुढीपाढवा, अक्षय तृतीया (अखयतीज), वटपोर्णिमा, आषाढी एकादशी, गटारी अमावास्या, नागपंचमी, नारळी पोर्णिमा, पिठोरी अमावस्या, ऋषीपंचमी हे सण साजरे करतात. त्यामध्ये नारळी पोर्णिमा व शिमगा हे सण मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात.

तसेच जन्माष्टमी, गणेश उत्सव, नवरात्रोत्सव इ. उत्सवही साजरे केले जातात.

### ६) आगरी समाजाचा श्रद्धा व अंधश्रद्धा :

आगरी लोकांचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा व एकवीरा देवी. बहुसंख्या खनार्थ समाजाचा कुलदैवत मल्हारी आहे. एकवीरा देवीचा व खंडोबाची भक्ती हा समाज करताना आढळतो. आगरी समाजात जशी श्रद्धा आहे तशी अंधश्रद्धाही आहे. मानवी मन हे घाबरट असते व त्यातूनच अंधश्रद्धा जन्माला येत असतात. समाजातले भोंदु बाबा, भगत त्याचा गैरफायदा घेतात. आगरी समाजात जत्रेत लेपा काढला जातो. ढोल ताशाच्या गजरात उघड्याबंब अंगावर सपासप काटेरी निवडुंग मारुन घेतले जातात. ईर काढला जातो, हेरली, उगिन्हा, साती आसरा, म्हसोबा यांचा पूजा भीतीपोठी केली जाते. करणी व मूठ मारणे यासारख्या गोष्टींवर विश्वास ठेवला जातो. डॉक्टर वैद्याच्या औषधापेक्षा बुवा किंवा भगताने दिलेली विभूती महत्त्वाची वाटते.

अनेक पुरुषांच्या व स्त्रियांच्या अंगात देवाचे वारे येते असेही मानतात. घुबड ओरडणे, पाल चुकचुकणे, मांजर आवडी जाणे, कुत्रे रडणे, अंगावर पाल पडणे हे सगळे अशुभ मानले जाते. मुंगसाचे तोंड पाहणे, कोंबडीने धूळ झाडणे, कावळा काव काव करणे हे शुभसंकेत मानतात. चंद्राला घेर पडणे, हे वादळाचे चिन्ह समजतात. वाकरी मासा खाडीत उंच उडणे, हे वादळाचे सूचक समजतात. पावशी ओरडणे, वोवळाची भाजी रानात उगवणे, शेवग्याला पालवी फुटणे ही पावसाळा जवळ आल्याची चिन्हे समाजात मानली जातात.

### ७) शेतीची कामे व मासेमारी :

आगोर येण्याआधी किंवा पावसाळा येण्याआधी सुकी मासळी वाळवून, कापून मडक्यात भरणे फांडणे करणे, आमसूल बनविणे, कैऱ्यांचे लोणचे बनवणे, घरांची शाकारणी करणे ही कामे केली जातात. पहिला पाऊस पडला की उधवण केली जाते. शेतातल्या मासेमारीचा उधवण

मारणे असे म्हटले जाते. पाग, डफ, आसू, येडी, पगोळी, गळ यांसारखी सादने मासेमारीसाठी वापरतात. एका ठराविक दिवसी सर्व गावाने एकत्रितरित्या पाण्यात उतरुन मासे पकडण्याचीही पद्धत आहे.

शेतीची कामे विविध प्रकारे केली जातात त्यात हेदा करणे हा एक प्रकार आहे. हेदा हा स्त्रियांचा संघटीत गट असतो. एखादी वयस्कर स्त्री याचे नेतृत्व करते. या संघटीत गटाद्वारे शेतीची उन्हाळ्यातील सर्व मशागतीची कामे केली जातात. यामध्ये आज एकाच्या शेतात व उद्या एकाच्या शेतात सर्वजणी मिळून कामे करतात.

त्याचप्रमाणे जोल हा सुद्धा आगरी समाजाच्या सांधिकतेचे प्रतिक मानले जाते. खाडीच्या बांधाला तडा गेला असेल किंवा श्रमाचे काम असेल तर विनामोबदला गावातील लोक एकत्रित काम करतात त्याला जोल म्हणतात. या जोन असेही म्हणतात. सरकारी मदतीची वाट न बघता आजही आगरी माणूस जोल करुनच कामे करतो.

यामध्ये कांडवणी, राब, मजत, काटकाम परका करणे इ. कामेही समूहाने केली जातात. पण आता मात्र यासर्व संकल्पना मोडीत निघाल्या आहेत. सर्व यंत्रे आल्यामुळे हे सामूहिक श्रमदान आता बंद झाले आहे.

ठाणे, मुंबई, रायगड आणि नाशिक या पट्ट्यात आगरी समाज स्थिरावलेला असल्यामुळे तिथली प्रादेशिक वैशिष्ट्ये घेऊन बोली अवतरताना दिसते. आगरी समाजात लोकगीताच्या स्वरूपात बोलीचा प्रचंड खजिना असलेला आढळतो. लोकगीते ही महाराष्ट्रीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. विविध प्रादेशिक बोलींच्या जडणघडणीची जीवनप्रणालीची आाया लोकगीताला पडलेली दिसून येते. लोककथा, लोकगीते यातून त्या प्रादेशिक लोकजीवनाचा श्रद्धा, अंधश्रद्धा, चालीरिती, व्रतवैकल्ये, देवदेवतांचे आविष्कार, विधी, क्रीडा इ. लोकसाहित्य बनत असते. विशिष्ट जातीजमातींनी आपले सांस्कृतिक संचित मौखिक स्वरूपात पिढ्यानपिढ्या जतन केलेले असते. आगरी बोलीतही अशी लोकगीतांची संपन्न आणि श्रीमंत परंपरा आहे. यामध्ये एकवीरा देवीची लोकगीते, नागपंचमीची लोकगीते, गणपतीची लोकगीते, देवीची लोकगीते, आगरी विवाहाप्रसंगीची लोकगीते (धवले) आजही आगरी समाजाने जपलेली आहेत. धवले हा गीतप्रकार आगरी बोलीने अत्यंत समृद्ध केला आहे. यादवकालीन प्राकृत मराठीचे लावण्य या धवळ्यामध्ये आढळते.

त्याचप्रमाणे आगरी बोलीत लोककथांचीही परंपरा आहे. विविध विषयावरच्या लोककथाही प्रसिद्ध आहेत. उदा. चिंबोऱ्याची गोष्ट, काळ्या नि बोळ्याची गोष्ट, अका न मकाची गोष्ट, प्राणी कथा, कोल्हा आणि कोंबऱ्याची गोष्ट, सातवाहनांची पराक्रम कथा, हुतात्मा बिराजी पाटील यांची पराक्रमकथा इ. मौखिक साहित्य आगरी बोलीत जतन केलेले आहे. लोककथा व लोकगीते यासारख्या लोकसाहित्यामधील घटकांची निर्मिती केवळ रंजनाच्या हेतूने झालेली नसते तर हे लोकमानवाचे, लोकभावनाचे, लोकश्रद्धाचे व लोकधारणाचे व्यक्त रूप असते. यामुळे अशा साहित्यातून समाजमन योग्य रित्या व्यक्त होत असते.

### ३) आगरी साहित्याचा इतिहास :

आगरी समाजात शिक्षणाचा प्रसार होण्यास थोडा वेळ लागला. पुढे गावोगावी शाळा आणि महाविद्यालये स्थापन झाल्यानंतर मात्र आगरी समाज खऱ्या अर्थाने शिक्षित होण्यास सुरुवात झाली. १९६०-७० नंतर जसे ग्रामीण, दलित, साहित्य निर्मितीस सुरुवात झाली तशीच आगरी समाजातही झाली. प्रथमतः म.ना. पाटील यांनी आगरी संस्कृती शब्दरुप करण्याचे काम केले. मराठी साहित्यात नव्याजोमाने आगरी बोलीत कथा, कादंबरी, कविता, ललित, आत्मचरित्र असे विविधांगी लेखन होऊ लागले. आगरी समाज हा मुंबईलगत राहत असल्यामुळे विविध प्रकल्प, औद्योगिकीकरण व शहरीकरण हे लवकरच खेड्यापर्यंत पोहोचले. याच पार्श्वभूमीवर पूर्वीचे आगरी जीवन व आताचे आगरी जीवन लेखकांनी चितारलेले दिसते.

आगरी बोली ही नादमधुर बोली आहे. समुद्रकिनारी वसलेला आगरी समाज आपल्या सुखदु:खाच्या कथा आपल्या साहित्यातून व्यक्त करताना दिसतो. नव्याने शिक्षित झालेला समाज अलीकडे आगरी समाजाचे भावविश्व त्यांच्या वेदना संवेदना शब्दात साकारु लागला आहे. विविध प्रकल्प, शहरीकरण, औद्योगिकीकरण यामुळे जमीन विक्रीस निघत आहे. गरजेपेक्षा जास्त पैसा हाती आल्यामुळे आई-वडिलांचे, बहिणीचे नातेसंबंध दुरावत आहेत. श्रद्धा, अंधश्रद्धा, नैसर्गिक आपत्ती सामाजिक विषमता, संघर्ष, राजकीय आर्थिक शोषण, यामुळे नातेसंबंधातला ताण वाढतो आहे. ग्रामव्यवस्थेचा डोलारा कोसळताना दिसत आहे. यावरच आधारलेले साहित्य आपल्याला पहावयास मिळते.

आगरी साहित्यात पहिल्यांदा रसमाधुरी, खलारी ही पुस्तके यांनी लिहिली. आगरी बोलीत नंतर कादंबऱ्याही लिहिल्या गेल्या. नागर संस्कृतीप्रमाणेच ग्रामीण आगरसंस्कृती चितारणाऱ्या कादंबऱ्या निर्माण झाल्या. यात प्रामुख्याने शंकर सखाराम यांची माया व कोसलन, सदाशिव वाशीकराची भूक आणि बखर, अविनाश पाटील यांची वस्ती नसलेले गाव, वासंती ठाकूर यांची उफल्या, अनंत पाटील यांची रायना, ढेपली व चावरे फुथ, गजानन म्हात्रे यांची तांदळाची भाकर, मुरलीधर म्हात्रे यांची प्रेम कहाणी, परेन जांभळे यांची जोडाक्षरे, या कादंबऱ्या लिहून आगरी साहित्यिकांनी मोलाची भर घातली.

आगरी बोलीमध्ये काही आत्मचरित्रेही आढळतात. परंतु ते मर्यादित स्वरूपाचे आहे. मागील पिढीतील आगरी लोकांचे जीवनानुभव यात चित्रित झालेले आहेत. यामधून पूर्वी शिक्षण घेणे किती कष्टदायक होते व गरिबीमुळे जीवनमान किती हलाखीचे होते हे चित्रीत झाले आहे. त्यामध्ये सूचेता खळे यांचे अवतीभवती, ए.डी. पाटील यांचे यतावळ, व्ही. के. पाटील यांचे आलो कोठून, का. ध. पाटील यांचे साडीकाठची हिरवळ, सुनंदा मोरखडकर यांचे स्मृतिमंध इ. आत्मचरित्रे सापडतात.

कोकणच्या भूमीचे चित्रण करणाऱ्या अनेक कथा मराठी साहित्यात आल्या त्यातच आगरी लेखकांनीही आपल्या कथा लिहिलेल्या आढळतात. त्यांनी ते सोसलं, भोगलं तेच संवेदना होऊन व्यक्त झाले. आपले भावविश्व त्यांनी मांडले. यामध्ये परेन जांभळे यांचे माळडुंगाच्या कुशीत, निबीड, अधांग, रान, कूळाचंद्र, बिलोरी, सांज, कातळपाणी हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. यामध्ये आगरी व प्रमाण मराठी अशा निर्भ बोलींचा वापर त्यांनी केला आहे. चंद्रकांत पाटील हे अस्सल आगरी बाज घेऊन लिहिणारे लेखक आहेत. त्यांचे बेमट्याचा बेरा त्यांचा कथासंग्रह

प्रसिद्ध आहे. या कथासंग्रहात सामाजिक लोकसंस्कृतीच बेमट्याच्या रूपाने त्यांनी उलगडून दाखविले आहे. संपूर्ण ग्रामीण जीवन अधोरेखित केले आहे.

नवी मुंबईच्या उलथापालथीची बदलांची स्थित्यंतरे व त्यांचा ग्रामीण समाजजीवनावर होणारा परिणाम पानुंगला या कथासंग्रहातून मोहन भोईर यांनी चित्रीत केला आहे. सार्थक हा अविनाश पाटील यांचा कथासंग्रह आगरी बोलीतील विनोदी अंगाने जाणारा आहे. शंकरपट हा त्यांचा दुसरा कथासंग्रह आगरी बोलीची व आगरी संस्कृतीची नाळ जपणारा आहे. ए.डी. पाटील यांचा सपान हा कथासंग्रह खास आगरी मातीचा गंध असणाऱ्या आहेत. कसदार कथा लिहिणारे हरिभाऊ घरत यांचा हळद रुसलि हा कथासंग्रह रहस्यकथांच्या अंगाने जाणारा आहे. तरीही या कथांना आगरी भाषेचा आगरी परिसराचा गोडवा लाभलेला आहे. एम.एन. म्हात्रे यांच्या पुण्यार या कथासंग्रहात खाडीकडच्या माणसांच्या वेदना काय असतात याचे ह्रदयद्रावक चित्रण केलेले आहे. अशाप्रकारे बऱ्याचशा आगरी कथासंग्रहाची मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

**आगरी कविता :**

आगरी कविता ही साधारणतः १९८४ च्या सुमारास लिहिली जाऊ लागली. वेगवेगळ्या जमिनींच्या आंदोलनासाठी समाज आक्रमक बनला. प्रकल्पग्रस्तांची लेखणी सरसावली व त्यांची आंतरिक तळमळ कवितेच्या रूपाने कागदावर उतरली. यामध्ये पहिल्यांदा प्रा. एल.बी. पाटील यांचा आंदोलन हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. आगरी समाजाच्या भूमिहीन होण्याच्या पार्श्वभूमीवर या संग्रहातील कविता आलेल्या दिसतात. रामनाथ म्हात्रे व मुकेश कांबळे यांचा निंगोलीचे पाणी हा कवितासंग्रह आगरी मातीशी, इथल्या माणसांशी व इथल्या संस्कृतीशी वेगळ नातं सांगणाऱ्या आहेत. सभोवताली घडणाऱ्या घटनांचे पडसाद त्यांच्या कवितेत दिसतात. अरुण म्हात्रे यांचा ते दिवस आता कुठे हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. परेन जांभळे यांचा बावन्नपक्षी, कृळाधून, आत्मभोर हे कवितासंग्रह वास्तवाचा वेध घेत जाताना दिसतात. शंकर सखाराम यांचा झाडातल्या कविता या कोकणातल्या हिरव्या निसर्गरम्य भूमीची विविध रूपे, वाणी, पक्षी यांच्या विलक्षण प्रतिमांच्या रूपाने आविष्कृत होताना दिसतो. अविनाश पाटील यांचा अन्वय, ऋतू बहरताना हे दोन संग्रह आलेले दिसतात. त्याचबरोबर शांताराम चवरकर यांचा सहस्त्रजाच्या उंभरठ्यावर हा कवितासंग्रह आला. पुंडलिक म्हात्रे यांचा हारकत काय तुमची हा पूर्ण आगरी लेखीतील काव्यसंग्रह प्रकल्पग्रस्तांचा इतिहास, आदिम संस्कृतीचे भुईसपाट होणे, प्रकल्पग्रस्तांची ससेहोलपट, नेतेमंडळीची दुटप्पी नीती, स्वार्थी व संकुचित गावपुढारी यांचे पैसा व उपभोग यांच्या नादाने उद्ध्वस्त झालेले भावजीवन परखडपणे व विनोदी अंगाने आपल्या कवितेतून सांगतात. संपूर्ण आगरी बोलीतील हा काव्यसंग्रह व्यथावेदनांचा पंचनामा मांडताना दिसतो. चंद्रकांत पाटील यांचा जागर हा चारोळ्यांचा संग्रह सामाजिक समस्या, व्यथा, दैन्य, दुःख यावर कठोर प्रहार करतो. सुनील पाटील यांचा तू तिथ मी, मोहन भोईर यांचा प्रेमस्वरूप आई तसेच विश्वास ठाकूर, दमयंती भोईर, चंद्रकांत मढवी, संजीवन म्हात्रे, कैलास पिंगळे, मुग्गणपत म्हात्रे, शोभना पाटील, दिनानाथ पाटील, इ. मोलाची भर काव्यक्षेत्रात घातली आहे.

**आगरी नाटके :**

पहिले आगरी नाटक म्हणून भ.ल. पाटील यांचे संगीत कूळकायदा, संगीत जमीनदार, संगीत चौथे रत्न होय. आगरी बोलीत खऱ्या अर्थाने नाटकाची मुहुर्तमेढ रोवली ते मोहन भोईर यांच्या तरवा या नाटकाने. अंधश्रद्धेला झुगारणारे बंडखोर नाटक म्हणून ते लोकप्रिय झाले.

आगरी बोलीत नाटक सादर करण्याचा तो मोठा प्रयत्न झाला व यशस्वी झाला. यानंतर हरिश्चंद्र भोईर यांचे तू कनाला भांडतस, टोकन आयला वाऱ्याला, हे स्वप्निल तांडेल यांचे नाटक आहे. गणपत पाटील यांचे धनी माजा दारोड्या, धनाची भोईर यांचे नरी आणि रं पोरानू, रंजन ठाकूर यांचे आगरी पेठा, एल.बी. पाटील यांचे बाय चालली इमानान, धनेश्वर म्हात्रे यांचे देव घरा आयला, गजानन म्हात्रे यांचे लाखाचे धंदे न खायदे वांदे इ. नाटके रंगभूमीवर आली.

यानंतर आगरी बोलीतील नाटकाला व्यावसायिक परिमाण मिळून देण्याचे काम नंदकुमार म्हात्रे यांच्या मांडवाचे भंवारी चाललंय काय या नाटकाने केले. त्यानंतर एल.बी. पाटलांचे मांडवान पांडव, इस.ई. झेर ही नाटके आली. चंद्रकांत पाटील यांचे देव दरीच राय ही नाटकेही आली.

आगरी समाज व संस्कृतीविषयक संशोधनात्मक लेखन काशीनाथ मढवी व अनंत पाटील, मुरलीधर म्हात्रे यांनी केलेले दिसते. त्याचबरोबर अनेकजण वर्तमानपत्रातून, नियतकालिकातून कथा, कविता लिहिताना दिसतात. पण त्या पुस्तक रूपाने प्रसिद्ध नाहीत. अशाही कवींनी आगरी साहित्य समृद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे हे निश्चित.

**आपली प्रगती तपासा.**

१) 'आगरी इतिहास' व संस्कृती स्पष्ट करा.

________________________________________________________

________________________________________________________

________________________________________________________

________________________________________________________

________________________________________________________

❖❖❖❖

# २

# आगरी बोलीतील निवडक कवितांचा अभ्यास

**घटक रचना :**

२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ आगरी बोलीतील कविता (कवी व कवयित्री)

२.३.२ अभ्यासक्रमात नेमलेल्या आगरी बोलीतील निवडक कविता-आकलन व विश्लेषण

२.३.३ आगरी बोलीतील कवितांमधील आशयसूत्रे

२.३.४ आगरी बोलीतील कवितांचे स्वरूप-विशेष

२.३.५ आगरी बोलीतील कवितांमधील जाणिवा व भाषाशैली

२.४ सारांश

२.५ सरावासाठी स्वाध्याय / नमुना प्रश्न

२.६ पूरक अध्ययन / अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

## २.१ उद्दिष्ट्ये

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला -

- आगरी कवितेचे स्वरूप समजावून घेता येईल.
- आगरी बोलीतील महत्त्वाचे कवी व कवयित्री यांचे कवितेतील योगदान जाणून घेता येईल.
- आगरी बोलीतील कवितांची आशयसूत्रे स्पष्ट करता येतील.
- आगरी बोलीतील कवितांचे रसग्रहण करुन त्यातील आशयसौंदर्य व विचार जाणून घेता येईल.
- आगरी कवितांचे स्वरूप - विशेष, जीवनजाणिवा व मूल्यविचार स्पष्ट करता येतील.
- आगरी कवितांमधून व्यक्त झालेल्या जीवन दर्शनाचा, समाजवास्तवाचा परामर्श घेता येईल.
- आगरी बोलीतील कवितांमधून व्यक्त होणारे अनुभवविश्वाचे वेगळेपण जाणून घेता येईल.
- आगरी बोलीतील कवितेतील शैली विशेष व भाषिक सौंदर्य स्पष्ट करता येईल.

## २.२ प्रास्ताविक

आतापर्यंतच्या घटकात आपण मानवी भाषा, तिचे स्वरूप, भाषेची विविध कार्य अभ्यासली आहेत. भाषा, समाज आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध लक्षात घेतानाच भाषेचा विकास आणि ऱ्हास या संकल्पनाही आपण समजून घेतल्या आहेत. भाषेच्या अभ्यासात प्रमाणभाषा व बोली यांचा परस्पर संबंध लक्षात घेऊन बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्त्वही आपण विचारात घेतले. 'आगरी बोली' चा अभ्यास करीत असताना या बोलीची व्युत्पत्ती, तिचा विकास व आगरी बोलीची महत्त्वाची वैशिष्ट्ये मागील घटकात आपण अभ्यासली आहेत. या बोलीचा अभ्यास करताना आगरी समाज, लोकसंस्कृती, या बोलीचे प्रभावक्षेत्र व आगरी बोलीचा काहीसा इतिहास आपण जाणून घेतला. आता या घटकात आगरी बोलीतील निवडक कवितांचा अभ्यास आपणास करावयाचा आहे.

आगरी समाज हा मूलतः कुणबी म्हणजेच शेतीप्रधान आहे. 'आगर' म्हणजे नारळी, पोफळी, भाजीपाला, मीठ, पिकविण्याचे ठिकाण होय. त्यावरून आगरात शेती करणारा तो आगरी समाज व त्यांची बोली म्हणजे 'आगरी बोली - आगरातील बोली' म्हणून ओळखली जाते. प्रामुख्याने ठाणे, रायगड, नवी मुंबई हे आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र होय. या परिसरात आगरी बोलीचा वापर लोक करतात. आगरी बोलीत कविता, कथा, कादंबरी, नाटक व आत्मचरित्र अशा विविध साहित्यप्रकारात लेखन झालेले आहे. आगरी बोलीचा अभ्यास करताना आगरी बोलीत निर्माण झालेल्या साहित्यनिर्मितीचाही आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल.

## २.३ विषय विवेचन

'कविता' हा मराठीतील महत्त्वाचा व प्राचीन अशी प्रदीर्घ परंपरा असलेला साहित्यप्रकार आहे. मानवी जीवनाला व्यापून राहिलेला व रसिकप्रिय असा साहित्यप्रकार म्हणजे कविता होय. काळानुरूप भिन्न-भिन्न रूपात कविता लिहिली गेली. विविध काव्यप्रकार व प्रवाहांमधून विपुल अशी काव्यनिर्मिती मराठी साहित्य परंपरेत झालेली आहे. केवळ मानवी भाव-भावनांची अनुभूती नाही तर समकालीन सामाजिक वास्तवाला, विविध समस्यांना, एकूणच मानवी जीवनाला कवेत घेण्याचा प्रयत्न सातत्याने कवितेने केलेला आहे. मराठी कवितेचा प्रदीर्घ असा हा पट कवी व रसिक वाचकाला आनंद देत आला आहे.

प्रमाणभाषेबरोबरच मराठीच्या भिन्न-भिन्न बोलींमध्ये, उपभाषामध्ये उत्तम दर्जाची कविता लिहिली गेलेली आहे. त्या-त्या बोलींमधून झालेले काव्यलेखन अर्थातच त्या समूहाला, समाजसंस्कृतीला, जीवन-जाणिवांना व्यक्त करण्याचा प्रयत्न करते, हे स्पष्ट आहे. बोली म्हणजे सामाजिक जीवनात केवळ संवाद साधण्याचा, बोलण्याचा व्यवहार करण्यापुरती मर्यादित नसते. आगरी बोलीत जी कविता लिहिली गेली आहे, ती प्रामुख्याने आगरी समाज व संस्कृतीचे दर्शन घडविते. या कवितांमधून निसर्ग, पर्यावरणाचा ऱ्हास, शहरीकरणाचे परिणाम, सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तन, नीतिमूल्यांचा होत असलेला ऱ्हास, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, त्यांचा जीवनसंघर्ष मांडला गेला आहे. या अर्थाने आगरी बोलीतील कविता वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे जाणवते.

### २.३.१ आगरी बोलीतील कवी व कविता :

आगरी बोलीत साधारणपणे १९८४ च्या सुमारास कविता लिहिली जाऊ लागली. आगरी समाजाचे जीवनदर्शन घडविणारी ही कविता आहे. मुंबईसारख्या मोठ्या महानगराचा विस्तार हळूहळू रायगड, नवी मुंबई, ठाणे, पालघर या जिल्ह्यांमध्ये होऊ लागला. आगरी समाजातील लोकांच्या जमिनी त्यामुळे सरकारने हस्तांतरित करुन घेतल्या. इथले मूळचे भूमिपुत्र देशोधडीला लागले. अनेक आंदोलने झाली. आगरी समाज आक्रमक झाला. प्रकल्पग्रस्त लोकांनी लेखणीच्या माध्यमातून आपल्या दु:खाची जाणीव व्यक्त केली. आपली हक्काची जमीन उध्वस्त होताना त्यांच्या मनाची होणारी तळमळ आगरी बोलीतील कवितांमधून व्यक्त झालेली आहे. अनेक कवी व कवयित्रींनी सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली. समाजजीवनाचे वास्तव चित्रण केले. अनेक समस्या मांडल्या. अभ्यासक्रमात आगरी बोलीतील १४ कवींच्या २० निवडक कवितांचा समावेश केलेला आहे. या कवितांच्या आधारे आगरी बोलीचे स्वरूप अभ्यासता येईल.

**अभ्यासक्रमात समाविष्ट कवी / कवयित्री व त्यांच्या कविता :**

| अ.न. | कवी | | कविता |
|---|---|---|---|
| १. | प्रा. एल. बी. पाटील | : | १. सारेबाराचा पलाट |
| | | : | २. मायच्यं सुरक्याची गोदरी |
| २. | प्रा. चंद्रकांत मढवी | : | ३. आगरी - कोळी |
| | | : | ४. आय |
| ३. | डॉ. संजीव म्हात्रे | : | ५. आबंचा आगोर |
| ४. | रामनाथ म्हात्रे | : | ६. मीठ |
| | | : | ७. नवी मुंबई |
| ५. | पुंडलिक म्हात्रे | : | ८. आमी जातीचं हाव आगरी |
| | | : | ९. इनकूरी |
| ६. | म. वा. म्हात्रे | : | १०. जमिनीचा तुकरा |
| ७. | मुकेश कांबळे | : | ११. बंदर |
| | | : | १२. खोपट |
| ८. | सुनंदा मोडखरकर | : | १३. आलं कंपनीवालं आलं |
| ९. | शोभना पाटील | : | १४. पायंडा |
| १०. | गणपत म्हात्रे | : | १५. एस.ई.झेड. नवरा |
| ११. | डॉ. अविनाश पाटील | : | १६. खलाटी |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | दिनानाथ पाटील | : | १७. दीप्तीला गाव सारा धावला |
| १३. | विश्वास ठाकूर | : | १८. आमचेकरं आता प्रकल्प आयलय |
| १४. | दमयंती भोईर | : | १९. भाकरी |
| | | : | २०. शून्य |

**सारेबाराचा पलाट**

सारेबाराचा पलाट आलाय
मनान इचार काय
मांगं पुरं बगतस कनाला
मारूतीन बिसून जाय।।धृ।।
यक पलाट दोन लाखाला
चालीस पलाट जिमीन काय
आवरा पयसा ठिवाचा कनाला
कलबान खेलाचा हाय।।१।।
वाटा झेवाला बयनीस धावली
तिचा पन्नास हाजारान भागं नाय
जावय म्हनतय सासरसला
तुला जिताच ठिवणार नाय।।२।।
गलन चयनी बोटान आंगठ्या
हातान करा घरवाचा हाय
शेटच्या खिसन पन्नासचा पुरका
दिसता ठिवाचा हाय।।३।।
आगरी हासून भानगर नाय
आग्गं बापयं मेलं काय
व्हईल त्या व्हईल वकिलूस खाईल
पून त्येला आरवा कराचा हाय।।४।।
घरान आग्गा जुनाच सामान
ठरवून देवाचा हाय
बायकू पून आथा डोकरी झाली
बगाची बापकटवाली बाय।।५।।

शब्दार्थ : आवरा - एवढा, झेवाला - घ्यायला, सासरला - सासऱ्याला, हासून - असून.

**मायच्यं सुरक्याची गोदरी**

माय तुजं इरलेलं सुरक
जवा तू गोदरीन घातलंस
तवा तुजं कालीज लपवताना
मी तुला पायलं
पावसाची झोर

ठंडींचा हिव
आग्या उन
गोदरीन नय घुसू दिलंस
सारं कसं तरतं झेललं...
कस्टाचा घाम
गरिबीचं आसरू
येदनाची उबक
यान तुजं सुरकं इरलं
इरलेल्या सुरक्यान तू कसं गुतवून झेतलं...
वय सरलं
टाकून नाय दिलंस
गादयावर लोलणारं आंग
जवा तडफडल
तवा तू गोदरीच्यं उबन चिरीचूप बिसीवलस

शब्दार्थ : इरलेलं - विरलेलं, सुरकं - लुगडं, गोदरी - गोधडी, कलीज - काळीज, पायलं - पाहिलं, झोर - न थांबणारा पाऊस, आग्या - अग्नीचा, तरंत - वरच्यावर, आसरू - अश्रू, येदना - वेदना, उबक - हुंदका, चिरीचूप - चिडीचूप

## आगरी - कोळी

आगरी - कोळी भंडारी होती तिची पोरं
आता तिची पोरं गेली लई लई दूर।।धृ।।

परकियांची पोरं तिच्या आली उरावर
भावनांचा त्यांनी इथे मांडला बाजार
काम धंदे होते तेव्हा आता झालीत बेकार
इथे त्यांना आता कधी मिळेना भाकर
आगरी -कोळी भंडारी होती तिची पोरं
आता तिची पोरं गेली लई लई दूर।।१।।

मच्छीकाटा ताडीमाडी मिठ खार खार
पोटासाठी धान्य देत होतच शिवार
सागर आगर येथे होते मोठाले डोंगर
तोडून-मोडून आता इथे वसवलं शहर
आगरी - कोळी भंडारी होती तिची पोरं
आता तिची पोरं गेली लई लई दूर।।२।।

गोऱ्यांनीच केलं होतं मुंबई बंदर
सुखातच होते तेव्हा गिरणी कामगार
दिल्लीवरची जशी तिला लागली नजर
विकासात गेली घर आगरं बंदर
आगरी -कोळी भंडारी होती तिची पोरं
आता तिची पोरं गेली लई लई दूर।।३।।

एक-दोन तीन झाली मुंबई नगर
थारा नाही त्यांना आता झाली हद्दपारं
धनी होता तेव्हा आता झालाय चाकर
राज्य आता आहे उपऱ्यांचा उम्बयवर
आगरी -कोळी भंडारी होती तिची पोरं
आता तिची पोरं गेली लई लई दूर।।४।।

जुने नवे कायदे आता इथे सांगणार
होती नव्हती मुठभर त्यांना हाकलणार
उपऱ्यांच्या झोपड्या आता कायम होणार
भूमिपुत्र येथे देशोधडी लागणार
आगरी -कोळी भंडारी होती तिची पोरं
आता तिची पोरं गेली लई लई दूर।।५।।

**आय**

आयं, तुझ्या डोक्यावरचा टोपला
अन् भरलेली वटी मना आठवतंय
न तुझा दमडी नसलेला रिकामा परवट
मी पार इसरुन जातंय, मी पार इसरुन जातंय
आयं तुझ्या वटीन सदा न कदा रानमेवा असाचा
जगनचा सगळा बाजार त्यान मला दिसाचा
आयं तू शेतान रानात कांडतना
मी ही कुढायचो आतल्या आत मरून
मला लय लय वाटायचं
तुझ्या खाटेवरच्या सुखांची स्वप्न पायचो
पून मी ही तवा फुटका असाचो
आयं शेतानं, रानान, खारीन खपून
मी पून तुझ्या बरोबर मोटा झालो
शेतानं रानानं खारीनं मना...
लय लय शिकवलं, हवं नको ते दिलं
अजूनही मी जगतोय त्याच्यावरच
अजूनही मी लिवतोय त्याच्यावरच
अजूनही मी लिवतोय त्याच्यावरच
पून आय आता माझ्या डोक्यावरचा, तुझा हात सरलाय
मना वाटतं माज्या जीवनात काय उरलाय
पून आयं, मी पून कोणाचा तरी आईस बापूस हाय
म्हणून तर जगावसं वाटतय नयत
तुज्याशिवाय सारं जग सुन सुन वाटतयं...

शब्दार्थ : टोपला - बांबूची टोपली, वटी - ओटी (साडीची ओटी), परवट - लुगड्यामध्ये पैसे ठेवण्याचे ठिकाण, खारीन - खाडीत,

## आबंचा आगोर

खांदानिवं लौटाना मारला का आबला भिमाचा बल यतय
कांड्यावरची ढेपलां लुखीत, आगराचे वाटला लागतय.
आयचा न माजा पवचा पोचं परेन
चार कोंड्यानशी मीठ परतय
आमचा काश्मिर म्हंजे आमचे आबंचा आगोर
फरक आवरास बर्फाच्या राशी तयां,
न आयां मिठाचे डोंगोर
लांबलचक आगाराव एक नंदर टाकली
बारकेबारके कोंड्यानशी जशी काय कापशी फुलली.
आबा घामान डबडबडलेला, आख्या पाण्याचा बाटला
तोंडान रिचवला
मीठ आवरा खारा कसा, त्या मना आपसुक उमजला
लौटाना हातात हयतला, तशी आय कुरबुरली
ठेव त्या खाली आबनी डरकाली फोरली
माजे अंगारवची लंव, ताठ उबी रशाली
आगोर पिकवून बाबावूं, आमची ताटा सदा आलती
चार बुका शिका पोरावूं, न करा आपले आगऱ्यांना शानी

शब्दार्थ : आबंचा - वडिलांचा, आगोर - आगार, आगर, खांदानिवं - खांद्यावर, लौटान - मीठागरात तयार होणारे मिठ कोंड्यामधून बांधावर काढण्याचं अवजार; एका लहानशा आडव्या लाकडी फळीला लांब बाबूंचा दांडा जोडलेला असतो ते लौटान, कांडा - शेताचा बांध, देपला - ढेकळं, पवा - संथ गतीने चालणे, नंदर - नजर, खारजत - खाऱ्या चवीचा, तुरवित - चालत (चपळाईने), वरतय - ओढतोय, राली - राहिली

## मीठ

आमी हाव जातीच आगरी
मीठ बाय पिकवू समुंदरी
गोरे सायबाला कलली हुशारी
न मीठाचा झाला तो व्यापारी।।धृ।।

कष्ट आमी केलं नानापरी
पैसा नाय गावला पदरी
मिठाच्या वाव्हील्या हो फरी
न मिठ जेला इंग्लंडचे बाजारी।।१।।

मिठाची चव त्याई पायली
सगले जगानी ती चाखली
वाह वाह समद्यावी केली
न भारताची शान वारिवली।।२।।

आगरं समदीच मोरली
भरावानं समदीच भरली
त्याचेवं बिल्डींग उभी रेली
पून आगऱ्यांची निशानी पुसली।।३।।

मीठ बाय टाटा न बिर्लाचा
नाव नाय आमचे रं वरलांचा
आगऱ्यांनी मीठ यो पिकवाचा
न टाटा न बिर्लानी खपवाचा।।४।।

शब्दार्थ : कळली - कळली, वाव्हल्या - वाहील्या, त्याई - त्यांनी, वारीवली - वाढवली, रेली - राहिली, खपवायचा - संपवायचा.

**नवी मुंबई**

आई गो आई, ईच काय गो बाई
जीला गो बोलतान नवी मुंबई।।धृ।।
सिरकुनी बंत येऊन आखरं
भूमीपूत्रानाच केल उगरं
झेऊन त्यांची आर्दी भाकरी
मालकानाच बतं केल भिकारी
आई गो आई।।१।।
स्थानिकांचे घरावं फिरवूनशी नांगर
सिरकुनी रचला सिमेंटचा डोंगर
पयले मिलाचं तल्या बावीच पानी
आता तं मुनसुपालटीची मनमानी
आई गो आई।।२।।
बी एम टी सी च्या गाऱ्या सडेवल्या साऱ्या
वाजेवला तीनी सगल्यांचा बोऱ्या
शेतामिठावं जावाचा आगऱ्याचा पोऱ्या
आता नय त्यांना कया मिलत नोकऱ्या
आई गो आई।।३।।
आयली व्हती सिरकू कराला बदल
तीनी तं दिला उपासमारीचं वादल
शिक्षण नाय तं नोकरी नाय
आगऱ्यांचे पोरावी काय खावाचाच नाय?
आई गो आई।।४।।

शब्दार्थ - सिरकुनी - सिडकोने, बनं - म्हणे, आखरं - इकडे, तल्या - बाबीचं - तलाव विहीर, गाऱ्या - गाडया, खावाचाच - खायचय.

**आमी जातीच हाव आगरी**

आमचा रगत हाय उन उन, म्हनून तं अबीमान शिरावरी
आमी जातीचं हाव आगरी नाय पर्वा जेला सगला तरी।।धृ।।
तवा आमाला लय आलतं पयसं
धरतीवं रात व्हतू कवसं बयसं
काय व्हता आमचा तवा ठाटमाट
हुरांपुरा व्हवून झाला सपाट

आथा कया तो मोबाईल नय राईली इसटक गारी घोरी।।१।।
राजकारनांचा तं आमीच किरं
नको तया नुसतंच मारतून फेरं
जरी आमचा तया पोट नाय भरं
तरी कयापुन पुरचं यक सारं
यो सेट माजा, तो माजा करुन जेली जीनगानी फुकट सारी।।२।।
नको त्याला आमी सलाम ठोकतून
उजेर नय तर कालोखान वलखतूनं
लांडेलबाऱ्यांना कयपुन देतून
टायमावं सक्के भावालाच फारतून
आवरूसे हिस्स्यासाठी जलमदात्याचे घशावरी।।३।।
नैतेच राजकारण्यांचे लागून पाठी
बालपन तरूनपन हातान आलीय काठी
पोराबालांच्या मंगारसी वराती
तरी पुन सुखा-दुखान आरकाठी
कुंडलिक सांगतय घरलेली न घरतय गोठ ई खरोखरी।।४।।

शब्दार्थ : रगत - रक्त, अबीनान - अभिमान, शिरावरी - डोक्यावर, धरतरीन - जमिनीवर, उरापुरा व्हवून - सर्व काही होवून, इसटक - इस्टेट, प्रॉपर्टी, आमीच किर - एक नंबरचे, कयापून - कुठेपण, जीनगानी - सर्व आयुष्य, नैतेच - नको ते, मंगारशी - मागून, गोठ - गोष्ट

## इनकूरी

आमी उगस नय भांडाचू पोरा हाव परकल्पग्रस्तांची
साईब तूमी इनकूरी करा इ जागा हाय कोनचे बापासची।।धृ।।
यक व्हती बाब म्होटी आया पान्याची
ये गावांची लोखा पान्याला यावाची
शांता न तली आया आमची व्हती
मावरा काट्याची त गनतीचं नवती
आनचेच आगरांचे मीठावं भरत व्हती पोटा बवतेकांची।।१।।
तो देवुल न पिपलाचा झारं आजून हाय व्ह
नाव माजा हाय ते देवलांचे पाटीवं
यो इया सातबारा इ नक्कल आवारची
का पायजे तुमाला पुरकी नोटांची
तरी कला चिटी सांगताव आमदार खासदाराची।।२।।
पोटा पान्याचा आमचे सगला जेलायं
पुरं कैसा व्ईल म्हणूनसी हायं हाय
सिकूनसी पक्का पुन ब्याकार रालू
जागंन कंपनी आमचे म्हणून आलू
आवरा हासून आया आमचा तरी येल आलीय भीक मांगाची।।३।।
साईब खरा - खोटा सांगा मनांचा
आमा कय सांगू नका पुडाऱ्यांचा
राजकारणाचा आया समंदं नाय व्ह

परकल्पग्रस्त चिंतातूर हाय व्हं
इनवी कुंडलिक तुमा नोकरी द्या तरी वाचमेनची।।४।।

शब्दार्थ : इनकूरी - चौकशी, उगस - उगाच, आया - इथे, नक्कल आवारची - आवार्डाची नक्कल, ब्याकार - बेकार, जागन - जागेत

## जमीनीचा तुकरा

खिसन नत्या दिरक्या
तरी बहिनी वाटत नत्या परक्या
खलाटीन व्हता एक खोसा
काम कराचू तिथं जोसा जोसा
आनसव कामाला लागचू
डोकव जेवन न्हेवाचू
कांडवं भाकरी खावाचू
त्यातच समाधान मानाचू
खोसन होता तला
म्हावरा धराचू त्यातला
तेलाची धार कमी असाची निसोटाला
तरी चव लय असाची जेवनाला
खोसा बिल्डरला इकला
त्या पैशानं भांदला इमला
टेबल खुर्ची आता जेवाला
पून समाधान निघून जेला
आता गादया गिरदंयावर लोलतंय
तरी डोल्याची झोप मोरतंय
पैशांची आशा जास्तच वाऱ्हली
सुख पलालाय लांबच्या पावली
जमीनीचा तुकरा ऱ्हावदे जवळी
तीच हाय आपली सावली
नाती गोती इसरू नका
फसवा फसवी करू नका

## बंदर

बरेच दिसांशी आज जेलू बंदराव
काय व्हतं तयं ? कईच न्हवतं!
तयं व्हती उसनी हानून टाकलेली मातीची भर
रेती, इटा, खरी, न डबर।।धृ।।

कयं जेली ती डोल, वाऱ्यावं डूलनारी
कयं जेली ती व्हरी, पान्यावं झुलनारी
धावत व्हतं आज तयं मातीची ढंपर
रेती इटा खरी न डबर।।१।।

तंवं आसाची बंदराव कोल्यांची धावपल
मावऱ्याच्या पाट्या वावनाऱ्या कोलनींची पलापल
चालली व्हती आज तयं कोगाऱ्यांची गरबर
रेती, इटा, खरी, न डबर।।२।।

झयल्या आसतील नारली पुनवा कतीक तयं साजऱ्या
फिरल्या आसतील कतीकांच्या वरातीच्या सतऱ्या
आज तयं कॉनची कॉनला नय खबर
रेती, इटा, खरी, न डबर।।३।।

शब्दार्थ - दिसाशी - दिवसांनी, जेलू - गेलो, डोल, व्हरी - छोटी होडी, व्हावनाऱ्या - वाहून नेणाऱ्या, कोगाऱ्यांची गडबड - मजूरांची गडबड, वरातीच्या सतऱ्या - नवऱ्याला डोक्यावरची लग्नाची छत्री, कॉनची - कॉनला - कुणाची कुणाला

## खोपट

आयसं माज खोपट व्हत कुराचं
ज्वाराच पानी आयलं का ते बुराचं।।धृ।।

खोपटावं माजे नलीची कौलं
कुराला मीनी गेरूशी रंगीवलं
खोपटान माजे बाजवं निजाचं।।१।।

खोपटाचे भवशी सगली खारी
खारीनचा चिखोल पून लय भारी
बांधवाशी चालताना कतीक जन पराचं।।२।।

खारीन माजे मावर व्हतं रास
चोरा पोरांचा माजे जीवाला ध्यास
मावऱ्याशी माजं खोपट भराचं।।३।।

शिरकोचे भरावान सगलं जेलं
खोपटाचे जागवं बंगलं झैलं
आठवूनी त्याला आथं काय लराचं
आयस माज खोपट व्हतं कुराचं।।४।।

शब्दार्थ - खोपट - कुडाची झोपडी, ज्वाराचं पानी - समुद्राच्या भरतीच पाणी, बुराचं - बुडायचं, नळीची कौलं - जुन्या काळातील कौलांचा प्रकार, कुराला - कुडाची भिंत, बाजवं - जुनी काथ्याने विणलेली खाट, खारीन - खाडीमध्ये, मावरं - मासळी, लराचं - रडायचं

## आलं कंपनीवालं आलं.

आलं कंपनीवालं आलं
न त्याच आमचे जमीनीवं डोल

हायीत पक्क ते पैसंवालं
पैशाच्या जोरावर मांडलन खेल।।
काठ न कोट मोरून शानी
पिकल्या जमिनी केल्या जानी
त्यांचे डोल्यांनसी धाय धाय पानी
न कला रं बिसऱ्यांच्या भरतान गोनी।।
या भूमीची लेकरं आमी
कला रं भिकंला लावताव तुमी
खाऱ्या न खोऱ्याशी आमची नाती
कला रं खावाला लावलंच माती।।
नोटांची बंडलं खपून जाती
रावाची काय मं डगोर माती
आमचे पोरांना नोकऱ्या देती
त सुखानी समदी दोन घास खाती।।
सारेबाराचा फलाट द्यावा
रावाला आमचा घरटा ठेवा
बोला आमचेशी तुमी बोला
न कला रं मंदीन व्हयी दलाल।।
मायबाप तुम्हाला कोन आमी
माय आमची इकाला निंगलव तुमी
कसलं तुमचं रं सोटं लोटं
न आमाला भिकची दावताव वाट।।

शब्दार्थ - डोलं - डोळे, जानी - बळकावणे, बिसऱ्यांच्या - दुसऱ्यांच्या, खाऱ्या - खाज्या, डगोर - दगड

**पायंडा**

पनजा माझा लंगोटवाला
पणजी माझी खोंडवाली
शेता भाता पिकईत व्हती
न पोटापुरता कमईत व्हती।।
पनजनी माझे एक बेस केला
आजूसला माजे सालन धारला
चिखला तुरईत सालन जेला
न आजूस माजा फायनल झाला।।
पनजा माझा पक्का हाऊसला
न आजूसला नोकरी सोधाला लागला
एक दीस पनजाचा मैतर आला
न पनजाला काय बाय सांगून जेला
पाग घेऊन पनजा तलवं गेला
न जितारीची दोन टापा झेवून आला
सायबाला भेट देऊन आला

न बिसरेदिन आजूस मास्तर झाला।।
नोकरीला आजूस शारान आला
न बापासला माझे पक्का शिकवला
शिकून बापूस साहेब झाला
नं पक रूपये कमवाला लागला।।
बाबनी मना कालेजात धारली
न पक्की शिकवून डाक्टरीन केली
पनजा माझा मरून जेला
पून शिक्षनाचा पायंडा पारू जेला...

शब्दार्थ - खोंडवाली - लज्जा रक्षणासाठी डोक्यावर घेतलेले लोकरी वस्त्र, तुरईत - तुडवित, तलवं – तळे, जितारी - मच्छीचा प्रकार, बिसरे दिस - दुसरे दिवशी, शारान - शहरात, बाबनी - बाबा, पार - पाडणे

## एसई झेड नवरा

एसई झेड नवरा
नं त्याचा सरकार करवला
सरकार करवला नं त्याला
भारतान फिरवला... ।।धृ।।
मिळून शेतकरी सारे
लावू याच्या हळद अंगाला
मोर्चे घोषणांनी मिरवणूक काढू
देऊ चपलांच्या माला... ।।१।।
गाढवावर बसून आपला
नं याच्या बाशिंग गुडग्याला
सोबत आले वऱ्हाड
लागले दलाल नाचायला... ।।२।।

झाली लगीन घाई मिरवू
लागले सरकारी गोतावला
चार एकच्या नोटीसांच्या
लागले अक्षदा वाटायला।।३।।
शुभ मंगल सावधान बोलदाना
लागले मंत्री भांडायला
मोर्चे धरणे सभा करुन
शेतकरी लागले आहेर लायला... ।।४।।
वरात रायगडात आली
याची आणरी दारात
बुतारा घेऊन हातात
हाकलून लावू परत... ।।५।।

‘एसई झेड नवरा’ - सरकारने होऊ घातलेल्या ‘स्पेशल इकॉनॉमिक झोन’ प्रकल्प घालवण्यासाठी (विरोधासाठी) शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनासाठी सहभागातून निर्माण झालेली कविता.

शब्दार्थ - माला - माळा, हार, गोतावला - गणगोत, नातेवाईक - अक्षदा - अक्षता, बुतारा - झाडू, केरसुनी

## खलाटी

खलाटी वलाटी,
झगरा आमुचे ललाटी।।
जमीन झाली पलाट तवशी,
लोनी खातंय तलाटी।।
इसरून जेलू पऱ्ह्या, उधानलेला दऱ्या,
हिरवी शेता, फुललेली भाता,
नै वाजं घुंगूर काठी।।
भावांचा न देवाचा, नै र बाबा खावाचा,
मिरगाचा पानी परं, दाटून येतंय ऊर,
भवताली दाटं पूरं, न भाऊ नै भावापाठी।।
आमीच बनलू भाई, अन् ते तं छूप कसाई,
अंतरली आमुची आई, न् परक्यांना झाली घाई,
झगरा यो कोनासाठी।।

शब्दार्थ - खलाडी - गावाजवळची पांढरी, झगरा - भांडण, पेऱ्हा - पाट, दऱ्ह्या - समुद्र, पलाट - प्लॉट, तवशी - तेव्हापासून

## दिप्तीला गाव सारा धावला

कनवटीला दिरक्या व्हत्या तवा पतूर
लेका भाव तुझा कती वाऱ्हला
शिगरेटचा पाकीट तासातासाला काऱ्हला
तवा तुझे दिप्तीला गाव सारा धावला।।
    बोटान आंगठ्या, हातान घऱ्याल, गल्यान चैन
    फिराया सुसाट एसी कार
    जवायला रोज गाठाचा बार
    कोबऱ्याचे रसा संग रमने झिंगला।।
लंगोटीचे जागंव बेलबॉटम शिवला
करगोटा फेकून फॅशनचा पट्टा लावला
गुटखा तोंडान टाकून ‘एस’, ‘नो’ करावं लागला
दारूपायी संसार रसातलाला गेला
व्यसनापाय कुलाला बट्टा कती लावला
आज एक घासाला तू महान कती झाला
तवा तुझी सावली बगून गाव सारा पांगला।।

खलाटीन व्हता खाचर न खोसा
पिकवित व्हतं भात फसा फसा
आता आगरान नाय खोसा न घराला वासा
तुझ्या कररनीनं लेका सारं बघ धरला।।

खलाटीन लावतं व्हतू भेंड भाजं मोप मोप
उकरीत व्हतू चवल्याच्या शेंगा टोप टोप
बांधावर लावित व्हतू तवसा आन् काकऱ्या
खाताना चिली पिली खूस कती वाटली।।

**आमचेकरं आता परकल्प आयलंय**

पयले कैसा जॉराचा पानी
शेतान न बारान घुसाचा
सदान कदा बाराई मयनं
खड्डयान पानी रवाचा
आसू झेवून जेला तरी
बोलखूट भरुन मासली गवाची
आगरान डगराचे फटीना
चिंबोरी हाताला लागाची
घरान ढोमनी भरून
काऱ्या कोलीम आसाचा
सुके न वले मासलीचा
मोजमाप नसाचा
ताटलीभर आतराकाटी
माजर खाऊन जावाची
कांबऱ्या कुतऱ्यांची
वटीवं येरझारा रवाची
पावन्या मांद्यासाठी
समदी दीसरात खपाची
परत्येकाचा लोभ व्हता
म्हणून मानुसकी जपाची
आता शेताना बाराना भराव झयलाय
न जॉराचा पानी निकरिला जेलाय
आमचेसाठी या सगला
पुरान झयलाय
का ? तं आमचे करं आता
परकल्प आयलाय

शब्दार्थ : पयले - पुर्वी, जॉराचा पानी - समुद्राच्या भरतीचे पाणी, बार - खाऱ्या पाण्याची शेती, सदा न् कदा - नेहमी, सतत, आसू - मासळी पकडण्याचे छोटे साधन (जाळे), बोलखूट - मासळी ठेवण्यासाठी बांबूपासून विणलेली टोपली, पाटी काऱ्या कोलीम - छोट्या आकाराची कोलंबी, आतराकाटी - माशांची आतडी व काटे, चबाची - पोट भरून खायची, पावन्या

मांद्यांसाठी - पाहुणे व इतर माणसांसाठी, परतेकाचा - प्रत्येकाचा, लोब - लोभ, प्रेम, झयलाय - झाले आहे, निकर - समुद्राची पुर्ण ओहोटी होते तेव्हाची पाण्याची पातळी

### भाकरी

भाकरी झेतली वलाला
तं जावाला लागलं तरं
न लागलं तुकरं पराला
तवा माजे धेनान आयला
का वरशी ज्या दिसतं सादा सुदा
त्या नसतं तवरा सोपा - तूनी मग पान्याशी
मलून मलून मव केलास पीठ
न शिकविलीस
कयाच न कुरकुरनारी
चांदागत गोल भाकरी
आथा मी मलुनशी
मव करतय माजं बत्तर नशीब
न सांदत रवतं तरा जेलेलं जीवन,
पुनवचे चांदागत गरगरीत
तवाबी माजे मनान यांच येतं
का वरून तुनी ज्या शिकविलाता
त्या तवरा नवता सादा
पाख मिटूनशी, चार भित्तीतलं
धरं लावतांना जिरवाला
तू गदगदलेली तुजी नंदर
कया भिरवत व्हतीस माजे नंदरला

शब्दार्थ - वलाला - वळायला, तरं - तडे, धेनान - ध्यानात, मव - मऊ, आथा - आता, बत्तर - बथ्थड, रवतं - राहते, तवरा - तेवढं, नवता - नव्हतं, पाख - पंख, जिरवाला - गिरवायला, धरं - धडे, नंदर - नजर, भिरवत - भिडवत

### शून्य

लिवन्याचं वलन लागन्याचे आदी
लिवता येन्यासारका आकार म्हंजी शून्य
मंग, जिरवत जातू आपून
नया वाटा नयी वलना
न हरवून जातू
अंकांचे भूलभलैयान लिलया
भोला - भाबरा शून्य निसाटतं
आपल्या हातानशी
आकरंमोरीन गुंथून परता परता
जमाखरचाचे तालेबंदा
निररतक, पोकाल शून्य तवरा

उरतय हाती
शून्यापासूनते, शून्यापतूरचे ये परवासान
एकेक घर, सर करत गेलेलो आपून
एक मवर, फकस्त पटावरची

शब्दार्थ - जिरवत - गिरवत, निसाटतं - निसटतं, हातानाशी - हातातून, गुंथून - गुंतून, तालेबंदान - ताळेबंद, निररतक - निरर्थक, पोकाल - पोकळ, शून्यापतूरचे - शून्यापर्यंतचे, परवासान, - प्रवासात, मवर - मोहोर, फकस्त - फक्त

### २.३.२ अभ्यासक्रमात नेमलेल्या आगरी बोलीतील कविता - आकलन व विवेचन :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रा. एल. बी. पाटील | : | १. सारेबाराचा पलाट |
| | | : | २. मायच्यं सुरक्याची गोदरी |

**परिचय - प्रा. एल.बी. पाटील** हे आगरी बोलीतील एक मान्यवर साहित्यिक आहेत. कविता, नाटके, एकांकिका, ललितगद्य या प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. सेवानिवृत्त प्राध्यापक असलेले एल.बी. पाटील हे रायगड भूषण पदवीने सन्मानित झालेले आहेत. 'आंदोलन' (१८८९) हा त्यांचा आगरी बोलीतील पहिला कवितासंग्रह आहे. त्यानंतर 'साडेबाराचा पलाट' (१९९७) याशिवाय 'इंदिराजी : एक कविता', 'मध्यरात्रीचा सूर्यास्त', 'छकुली परी' हे कवितासंग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत. हुतात्मा, मांडवान पांडव, घर जपावं असं, चौकटीबाहेरची चौकट, लफडं झालं अंगाशी इ. नाटके व द समे रोल, द एंड ऑफ द प्ले, एक रात्र जळताना इ. एकांकिका प्रसिद्ध आहेत. त्यांनी काही ललितलेखनही केले आहे.

**१) 'साडेबाराचा पलाट'** ही एल.बी. पाटील यांची कविता त्यांच्याच सादरीकरणामुळे विशेष लोकप्रिय ठरलेली आहे. पैसा हाती पडल्यावर आगरी समाजात कोणती परिवर्तने झाली, याबद्दलचे मार्मिक भाष्य त्यांनी या कवितेतून केलेले आहे. एवढा भरपूर पैसा जेव्हा आगरी समाजातील लोकांच्या हाती पडला तेव्हा त्या पैशाचा कसा उपयोग केला गेला, पैशाची उधळपट्टी कशी केली गेली याबद्दलचे भाष्य कवी करतात. पैशामुळे परस्परांची नातेसंबंधही कसे बिघडत गेले आणि हौस, मौज-मजा करण्यातच हा पैसा उडवला गेल्यामुळे पुन्हा कसे दारिद्र्य आले हे अत्यंत मार्मिक शब्दात कवी येथे सांगतात.

सारेबाराचा पलाट आलाय
मनान इचार काय
मांगं पुरं बघतस कनाला
मारुतीन बिसून जाय

जमिनीच्या विक्रीतून प्रचंड पैसा हाती आल्यामुळे मागेपुढे न पाहता मारुती मोटार खरेदी करण्याचा विचार मनात येतो. एवढा मिळालेला पैसा मागे कोणाला ठेवायचा आहे. तो हवा तसा खर्च करणे, प्रसंगी दारू आणि जुगारावरही तो उधळला जातो. बहिण जेव्हा तिचा वाटा मागायला येते तिचाही पैशाबद्दलचा हव्यास कवीने व्यक्त केला आहे. गळ्यात, बोटात अंगठ्या घालून

शेटजी सारखे पैसे खिशात बाळगण्याची हौस निर्माण होते. पैशाच्या हव्यासापोटी नातेसंबंध सुटतात. आपलेपणा नष्ट होऊन जातो. त्यावरुन विकोपाला गेलेले भांडण शेवटी कोर्टात जाते. आगरी असून काय उपयोग अशी इर्षा मनात नको तो विचार आणते. वकिलाने कितीही पैसे खाल्ले तरी चालतील पण माघार घ्यायची नाही. अशा जिद्दीने कवितेतील हा निवेदक पैसा हाती आल्याने कसा वागतो आहे. कवीने अस्वस्थपणे हे वास्तव मांडले आहे.

"घरान आग्गा जुनाच सामान
उरवून देवाचा हाय
बायकू पुन आथा डोकरी झाली
बगाची बापकटवाली बाय"

घरात समान व वस्तू जुन्या झाल्याने त्या नवीन आणायच्या आहेत. बायको वयस्क झाली आहे, त्यामुळे बॉबकटवाली बाई आणण्याचे मनात येते. मार्मिक अशी चिंतनशीलता या ठिकाणी कवितेतून व्यक्त होते. म्हणजे पैसा हाती पडल्यावर आगरी समाजात कोणती परिवर्तने झाली, समाजातील लोकांमध्ये वागण्या बोलण्यात काय बदल झाले, याचे वास्तव चित्रण या कवितेतून येते.

### २) 'मायच्चं सुरक्याची गोदरी' - एल.बी. पाटील

या कवितेत कवीने दारिद्र्यात प्रचंड कष्ट उपसणारी आई व तिच्याबद्दलची मुलाच्या मनात असलेली आदराची भावना व्यक्त केली आहे. आई आपल्यासाठी किती कष्ट उपसते आणि त्याची वाच्यताही ती कुठे करीत नाही. याबाबत कवी म्हणतात,

"माय तुजं इरलेलं सुरक
जवा तू गोदरीन घातलंस
तेवा तुजं कालीज लपवताना
मी तुला पायलं"

अशा शब्दात कवी आईने दारिद्र्यात कसे दिवस काढले. ऊन, वारा, पाऊस सारं काही सहन करुन तू दारिद्र्याचे चटके आम्हाला पोहोचू दिले नाहीस. आयुष्यभर काबाडकष्ट करुन, घाम गाळून गरीबीतच तू स्वतः जीवन घालवले. व्यथा - वेदनांचा हुंदका तू कधीही व्यक्त केला नाहीस. आईच्या जुन्या झालेल्या विरलेल्या लुगड्यात मायेची उब आहे. कुटुंबासाठी आई किती कष्ट घेते याची जाणीव या कवितेतून कवी व्यक्त करतात. या सर्व गोष्टी अनुभवल्या व पुढे वय झाल्यावर सुद्धा आईच्या गोधडीची उब कवीला कायम प्रेम देत राहिली.

"गाद्यावर लोलणारं आंग
जवा तडफडल
तवा तू गोदरीच्चं उबन चिरीचूप बिसीवलस"

अशी भावना कवी एल.बी. पाटील व्यक्त करतात. आईच्या प्रेमाचा महिमा वर्णन करतानाच आई करीत असलेल्या कष्टाची जाणीव कवीने या कवितेतून व्यक्त केली आहे. अस्वस्थ करणारी स्त्री जाणीव कवीने यातून व्यक्त केली आहे. सातत्याने कष्ट करणारी घरातील स्त्री किती दुख व वेदना सहन करते.

**सारांश -**

थोडक्यात, प्रा. एल.बी. पाटील यांच्या आगरी बोलीतील या दोनही कविता वैशिष्ट्यपूर्ण अशा आहेत. कवितांमधील आशय, बोलीतील शैली व शब्दसौंदर्य यामुळे या कविता आपल्या मनाला वेगळा अनुभव देतात. 'साडेबाराचा पलाट' या कवितेतून आगरी समाजात झालेले परिवर्तन कवीने मार्मिकपणे मांडले आहे. तर 'मायच्यं सुरक्याची गोदरी' ही कविता आई आणि मुलातील भावबंध व्यक्त करते. शिवाय आपल्या मायेच्या उबदारवृत्तीने सर्वांना भरभरुन प्रेम देते हा महत्त्वाचा विचार ही कविता आपल्याला देते.

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रा. चंद्रकांत मढवी | : | ३. आगरी - कोळी |
| | | : | ४. आय |

**परिचय -**

चंद्रकांत मढवी हे आगरी बोलीतील कवी व कादंबरीकार म्हणून परिचित आहेत. 'प्रहार' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. शिवाय 'उधळया' व 'बाजार' या कादंबऱ्याही त्यांच्या नावावर आहेत. 'मी भूमिपुत्र' ही त्यांची ऑडिओ सीडी प्रसिद्ध असून त्यांच्या साहित्य लेखनाला अनेक पुरस्कारही मिळालेले आहेत. १६ व्या राज्यस्तरीय आगरी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

**१) आगरी - कोळी** - चंद्रकांत मढवी यांच्या 'आगरी-कोळी' या कवितेतून येथील मूळ असलेले भूमिपुत्र-आगरी समाज इतरांच्या आक्रमणामुळे कसा अस्वस्थ झाला आहे, याचे चित्रण येते. मुंबई आणि परिसरात मोठ्या प्रमाणात आलेले परकीय लोंढे इथल्या भूमिपुत्रांच्या जगण्यावर कसे परिणाम करतात याचे वास्तव चित्र कवीने येथे मांडले आहे. मुंबई आणि परिसरातील आगरी - कोळी-भंडारी हे जे लोक होते येथे हे सुखासमाधानाने व आनंदाने राहत होते. परकीय लोक येऊन येथील भूमिपुत्रांचा रोजगार त्यांनी बळकावला आहे. आता येथील मूळच्या लोकांना कामधंदा मिळत नाही. ते बेकार झाले आहेत. त्यांना कधी भाकरीही आता नीट मिळेना, अशी दयनीय आवस्था त्यांची झाली आहे.

पोटापुरतं धान्य पिकवण्याची जमीन होती. मोठ मोठाले डोंगर होते. सागर व आगर म्हणजे शेती होती, मिठागरे होते. पण शहरीकरणाच्या प्रक्रियेत हे सर्व डोंगर फोडून शहरे वसवली गेली. त्याचे दुःख व असहायता कवीने येथे व्यक्त केली आहे.

"सागर आगर येथे होते मोठाले डोंगर
तोडून-मोडून आता इथे वसवलं शहर"

अशी दुःखत भावना कवी व्यक्त करतो आहे. इंग्रजांनी मुंबई बंदर सुरु केले. तेव्हा मुंबईला गिरणी कामगार सुखाने जगत होता, पण विकासाच्या नावे नावाने हे बंदर, आमची घरे व शेतीवाडी सर्वच आता परकीयांच्या ताब्यात गेले आहे. त्यामुळे मूळच्या भूमिपुत्र येथून हद्दपार झाला आहे. ही दुखरी वेदना कवी व्यक्त करतात. मूळ मुंबईचे अनेक उपनगरे झाली. त्यामुळे मूळचा भूमिपुत्र मात्र येथून हद्दपार झाला आहे. एकेकाळी धनी असणारा, मालक असणारा मूळचा आगरी-कोळी माणूस मात्र आता या मुंबईत उपरा झाला आहे आणि उपरे म्हणून बाहेरुन आलेल्या

लोकांचे राज्य आता मुंबईवर आहे, राजधानीवर आहे अशी दुःखाची जाणीव या कवितेतून व्यक्त होते.

"धनी होता तेव्हा आता झालाय चाकर
राज्य आता आहे उपऱ्यांचा उम्बयवर
आगरी-कोळी भंडारी होती तिची पोरं
आता तिची पोरं गेली लई लई दूर"

भूमिपुत्रांच्या मनातील अस्वस्थता कवी व्यक्त करतानाच जुने नवे कायदे सांगून आता थोडेफार जे भूमिपुत्र येथे राहिले आहेत, त्यांनाही हाकलण्याचा प्रयत्न आहे आणि उपरे म्हणून आलेले बाहेरचे लोक आता इथे कायमचे वास्तव्य करु लागले आहेत. त्यामुळे मूळचा भूमिपुत्र कसा देशोधडीला लागेल याबद्दलची असह्य वेदना कवीने व्यक्त केली आहे. मुंबईचा भूमिपुत्र असणारा हा आगरी-कोळी समाज शहरीकरणाचा प्रक्रियेत कसा भरडला जातो आहे आणि त्याच्यासमोर असणारी अनेक आव्हाने कोणती आहेत, याचे वास्तव चित्रण चंद्रकांत मढवी या कवितेत करतात.

थोडक्यात, चंद्रकांत मढवी यांची आगरी-कोळी ही कविता आगरी समाजातील भूमिपुत्रांच्या मनाचे दुःख, अस्वस्थता, असहायता व आव्हानांची जाणीव चित्रित करणारी मांडणारी कविता आहे. लयबद्ध शब्दरचनेमुळे या कवितेला वेगळे असे भाषिक सौंदर्य प्राप्त झाले आहे. आशय आणि मांडणीच्या दृष्टीने एक महत्त्वाची कविता ठरते.

**२) आय - चंद्रकांत मढवी** यांची 'आय' ही कविता आईशी असलेली प्रेमभावना, तिच्या कष्टाची जाणीव आणि आईशी जोडले गेलेले नाते जीवनात किती महत्त्वाचे आहे, हा मूल्यविचार देणारी कविता आहे. विविध रूपे चित्रित करतानाच कवीने आता आई नसल्याने तिची जाणवणारी उणीव या कवितेतून व्यक्त केली आहे. आईच्या साडीच्या ओटीत जंगलातला रानमेवा असायचा. आई काबाडकष्ट करायची. तिच्या डोक्यावर कायम असणारी बांबूची टोपली म्हणजे कष्ट करणारी आई कवीला आठवते. कवी म्हणतात, मला कायम आठवते आईचा परवड म्हणजे कमरेला लुगड्यात पैसे ठेवण्याची जागा, ज्यात कधीही पैसे नसायचे पण तरीही आईशी असलेले जिव्हाळ्याचे नाते कवीला अधिक महत्त्वाचे वाटते.

"आयं तू शेतान रानान कांडतना
म ही कुढायचो आतल्याआत मरून
मला लय लय वाटायचं
तुझ्या खाटेवरच्या सुखांची स्वप्न पायचो
पण मी ही तवा फुटका असाचो"

म्हणजे कवीने आपली हतबलता येथे व्यक्त केली आहे. आईच्या कष्टाची जाणीव आहेत तिचे कष्ट कमी व्हावेत तिला सुख मिळावे यासाठी कवी प्रयत्नशील असतो. शेती, खाडी, रान यांच्यापासून मी खूप काही शिकलो असे कवितेतील निवेदक म्हणतो. तुझ्या बरोबर मी हे सारे पाहूनच मोठा झालो आहे. हवं नको ते सारं मला मिळालं. आजही मी जे काही शिकतो आहे. जे जगतो आहे त्याच्यावरच मी लेखन करतो आहे. आई तुझा माझ्या डोक्यावरचा हात आता सरलाय ही दुःखाची सल मात्र कवितेतून व्यक्त होते.

"पून आयं, मी पून कोणाचा तरी आईस बापूस हाय
म्हणून तर जगावसं वाटतय नयत
तुझ्याशिवाय सारं जग सुन सुन वाटतयं..."

आई शिवाय हे सारे जगच कसे आपल्याला सुन सुन वाटते आणि आईने दिलेले प्रेम, दिलेले आशीर्वाद निवेदकाला कायम महत्त्वाचे वाटतात. म्हणून आपणही कुणाचे तरी आई-बाप आहोत याची जाणीव कवीला होते. आता आई नाही, तिच्याविषयीच्या अनेक आठवणी कवीने कलात्मकरित्या मांडल्या आहेत. त्या प्रेमभावनेचा सहज आणि सुंदर अविष्कार या कवितेतून घडतो.

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | डॉ. संजीव म्हात्रे | : | ५. आबंचा आगोर |

**परिचय -**

व्यवसायाचे डॉक्टर असलेले संजीव म्हात्रे यांनी आगरी बोलीत काव्यलेखन व नाट्यलेखन केलेल आहे. 'उरण गौरव पुरस्कार' त्यांना प्राप्त झाला असून आपल्या लेखनातून आगरी समाजाची सद्यस्थिती ते व्यक्त करतात.

## ५) आबंचा आगोर - डॉ. संजीव म्हात्रे

'आबंचा आगोर' ही त्यांची कविता आपल्या वाड-वडिलांचे खूप मोठे असे मिठाचे आगर होते. त्यात आई-वडील काबाड कष्ट करुन मीठ कसे तयार करत असत, याचे वास्तव चित्रण कवी करतात. आपले हे मिठाचे आगर म्हणजे कवीला जणू काश्मीरच वाटतो. फक्त तिकडे बर्फाच्या राशी आणि इकडे पांढरे शुभ्र मिठाचे डोंगर एवढाच काय तो फरक दोन्हीमध्ये कवीला जाणवतो आहे.

"लांबलचक आगाराच एक नंदर टाकली
बारकेसारके कोंड्यावशी जशी काय कापशी फुलली"

असे आपल्या पांढऱ्याशुभ्र मिठाच्या आगाराचे वर्णन वेगवेगळ्या उपमा देऊन कवीन सुंदर पद्धतीने केले आहे. आपले वडील म्हणजे आबा मिठागरात कष्ट करताना घामाने डबडबायचे. वडिलांच्या कष्टाची जाणीव येथे कवीने व्यक्त केली आहे. 'आब' च्या म्हणजे वडिलांच्या ठिकाणी असलेले 'भिमाचे बळ' आणि लौटन (मिठागरात तयार होणारे मीठ कोंड्यांमधून बांधावर आणण्याचे एक अवजार) खांद्यावर घेऊन वडिलांनी आयुष्यभर केलेल्या कष्टाची जाणीव कवी व्यक्त करतात. त्यामुळे आगरी समाजातील मुला-मुलींनी शिक्षण घ्यावे आणि स्वतःचा विकास घडवावा, अशा प्रकारची प्रेरणा ही कविता देते.

"आगोर पिकवून बाबावूं, आमची ताटा सदा आलनी
चार बुका शिका पोरावूं, न करा आपले आगऱ्यांना शानी"

अशा प्रकारचा प्रेरणादायी विचार डॉ. संजीव म्हात्रे यांनी 'आबंचा आगोर' या कवितेतून व्यक्त केला आहे. आगरी समाजाला मार्गदर्शक ठरणारी आणि शिक्षणाचे महत्त्व वर्णन करणारी ही

त्यांची महत्त्वाची कविता होय. वेगवेगळ्या प्रकारच्या उपमा व दृष्टांत देऊन आगरी समाजाचे सामाजिक व आर्थिक वास्तव त्यांनी या कवितेतून अधोरेखित केले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | रामनाथ म्हात्रे | : | ६. मीठ |
| | | : | ७. नवी मुंबई |

**परिचय -**

वाणिज्य शाखेतून पदवीधर झालेल्या कवी रामनाथ म्हात्रे यांचे 'निंगोलीचं पानी' व 'आजुसचा नंगोट' हे काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. पाचशेहून अधिक गीते त्यांनी लिहिली असून सीडी व डीव्हीडीच्या माध्यमातून ती प्रकाशित झालेली आहेत. आगरी बोली विकसित करण्यात त्यांचा महत्त्वाचा सहभाग आहे. नृत्य, नाट्य व साहित्य लेखनाची आवड त्यांना असून दूरदर्शनवर त्यांचे कार्यक्रम प्रसारित झालेले आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

**६) मीठ - रामनाथ म्हात्रे**

'मीठ' या कवितेतून कवी रामनाथ म्हात्रे यांनी आगरी समाजाच्या दु:खाची जाणीव नेमक्या शब्दात व्यक्त केली आहे. आयुष्यभर कष्ट करणारा, मीठ तयार करणारा आगरी समाज कायम कसा दुर्लक्षित राहतो. त्यांच्या कष्टाची जाणीव कोणालाही नसते. शिवाय मूळची असलेली मिठागरे शहरीकरण, औद्योगीकरण यामुळे कशी भुईसपाट झाली आणि त्यातून आगरी समाजाच्या वाट्याला व्यथा-वेदना कवीने मांडल्या आहेत. वर्षानुवर्षे आम्ही मीठ तयार करायचे आणि त्याचा व्यापार मात्र गोऱ्या साहेबाने म्हणजे इंग्रजांनी कसा केला. शिवाय कष्ट करुनही आमच्या पदरी कधीच पैसा आला नाही, ही आगरी समाजाची दुखरी वेदना या कवितेतून व्यक्त होते.

"कष्ट आमी केलं नानापरी
पैसा नाय गावला पदरी
मिठाच्या वाव्हील्या हो फरी
न मीठ जेला इंग्लंडचे बाजारी"

अशी दु:खाची जाणीव कवी व्यक्त करतात. आपण जे मीठ तयार करतो आहोत, त्याची चव सर्व जगाने चाखली आहे. शिवाय त्याचे कौतुकही जगभर लोकांनी केले आहे. त्यामुळे भारत देशाची शान वाढली, असा आगरी समाजाच्या ठिकाणी असलेला अभिमान कवी व्यक्त करतात. काळाबरोबर ही मीठागरे आता नष्ट होऊ लागली आहेत. त्यावर भराव टाकून नव्या इमारती व बिल्डिंग उभ्या राहू लागल्या आहेत. त्यामुळे आगरी समाजाची निशाणीच पुसली जाण्याचा धोका त्यातून जाणवतो आहे.

"मीठ बाय टाटा न बिर्लाचा
नाव नाय आमचे वरलांचा
आगऱ्यांनी मीठ यो पिकवाचा
न टाटा न बिर्लानी खपवाचा"

आम्ही कष्ट केले मीठ पिकविले पण आमच्या वडिलांचे नाव त्यावर कधीच लागले नाही तर टाटा आणि बिर्ला यांच्या नावाने ते आजही विकले जाते. म्हणजे कष्ट आम्ही करायचे आणि व्यापार मात्र दुसऱ्यांनी करायचा ही दु:खाची सल कवी अत्यंत नेमक्या शब्दात 'मीठ' कवितेतून मांडतात.

**७) नवी मुंबई - रामनाथ म्हात्रे**

'नवी मुंबई' या कवितेत रामनाथ म्हात्रे यांनी प्रकल्पाच्या नावाखाली आगरी समाजाच्या जमिनी मोठ्या प्रमाणात सिडको कंपनीने हस्तगत केल्या. त्यामुळे इथला भूमिपुत्र हा कसा उपरा झाला. स्थानिक आगरी समाजाच्या जीवनात निर्माण झालेले हे सर्व प्रश्न अत्यंत मार्मिक शब्दात कवीने व्यक्त केले आहेत. शहरीकरणाचा आगरी समाज जीवनावर झालेला विपरीत परिणाम कवीला त्यातून व्यक्त करायचा आहे.

"स्थानिकांचे घरावं फिरवूनशी नांगर
सिरकुनी रचला सिमेंटचा डोंगर
पयले मिलाचं तल्या बावीच पानी
आता तं मुनसुपालटीची मनमानी"

अशा शब्दात सिडको कंपनीने भूमिपुत्रांच्या जमिनी कशा बळकावल्या. त्यांची अर्धी भाकरी हिसकावून घेतल्यामुळे त्यांच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिकांच्या जमिनीवर आता सिडकोने नांगर फिरवून सिमेंटची जंगले उभी केली आहेत. शिवाय हक्काचे पाणीदेखील आगरी समाजाला मिळत नसून प्रशासनाची मनमानी कशी चालते, अन्याय अत्याचार कसा होतो आहे याचे वास्तव चित्रण रामनाथ म्हात्रे व्यक्त करतात.

स्थानिक भूमिपुत्रांना आता नोकरीही मिळत नाहीत आणि शेतावर जाऊन त्यांना मीठही तयार करता येत नाही. अशा स्थितीत त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. काही सकारात्मक बदल करण्यासाठी सिडको कंपनीने आली, आगरी समाजाला आशा दाखवली पण शिक्षणही नाही आणि नोकरीही नाही अशा काळात आगरी समाजाने कसे जगायचे हा भीषण प्रश्न या कवितेतून कवीने मांडला आहे. 'आई गो आई, ईच काय गो बाई' अशा रचनेमुळे 'नवी मुंबई' कवितेला एक लयबद्धता प्राप्त झाली आहे. रामनाथ म्हात्रे यांच्या दोन्ही कविता आगरी समाजाचे भीषण वास्तव बोलीतून परीणामकारकतेने मांडतात.

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | पुंडलिक म्हात्रे | : | ८. आमी जातीचं हाव आगरी |
| | | : | ९. इनकूरी |

**परिचय -**

पुंडलिक म्हात्रे यांनी आगरी बोलीत वैशिष्ट्यपूर्ण असे काव्यलेखन केले आहे. आपल्या मातीशी नाते जोडत कृषी संस्कृती त्यांनी आपल्या कवितेतून अधोरेखित केलेली आहे. म्हणूनच 'आगरी कवितेचा बादशहा' हा बहुमानाचा किताब त्यांना मिळाला आहे. जागतिक आगरी मराठी संमेलनात (मॉरिशस) त्यांनी आपल्या 'हरकत काय तुमची' या कवितेचे ५०१ वे सादरीकरण केले आहे. ते अनेक पुरस्कारांचे मानकरी असून प्रकल्पग्रस्त आगरी समाजाच्या प्रश्नांना त्यांनी

आपल्या कवितेतून वाचा फोडली आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्यामुळे होणारे हाल, मिळालेला पैसा योग्य पद्धतीने न वापरल्याने वाट्याला आलेली ससेहोलपट आणि आगरी समाजाची कैफियत त्यांनी आपल्या कवितांमधून व्यक्त केली आहे.

### ८) आमी जातीचं हाव आगरी - पुंडलिक म्हात्रे

'आमी जातीचं हाव आगरी' ही पुंडलिक म्हात्रे यांची कविता आगरी समाजजीवनाचे वास्तव चित्र रेखाटणारी कविता आहे. आगरी असल्याचा अभिमान आम्हाला आहे. एकेकाळी आम्हाला भरपूर पैसे मिळाले पण गैरमार्गाने ते उधळल्यामुळे, थाटामाटात जीवन जगल्यामुळे सर्वकाही संपत्ती वाया गेली आणि आता आमच्या जीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, असा अनुभव या कवितेतून व्यक्त होतो. 'आपली सारी जीनगानी फुकट गेली' अशा प्रकारचा पश्चातापाचा भाव या कवितेतील निवेदक व्यक्त करतो आहे.

"काय व्हता आमचा तवा ठाटमाट
हुरांपुरा व्हवून झाला सपाट
आथा कया तो मोबाईल नय राईली इसकट गारी घोरी"

अशा शब्दात आगरी समाजाचे सद्यपरिस्थितीतील चित्रण कवी पुंडलिक म्हात्रे करतात. एकेकाळी असलेली समाजाची सधनता आणि आज उद्भवलेली दारिद्र्याची परिस्थिती याचे वास्तव चित्रण कवीने केले आहे. राजकारणात नको त्या पुढाऱ्यांच्या बरोबर राहून आपला उदरनिर्वाह करता येत नाही. पुढाऱ्यांच्या मागे पुढे फिरुन काहीही उपयोग नाही याची जाणीव होते. आमचे बालपण, तरुणपण वाया गेले आणि हाती आता काठी आली आहे अशा प्रकारचा भाव कवितेतून व्यक्त होतो आहे. रूढी परंपरेच्या जातात अडकलेला, व्यसनाच्या आहारी गेलेला आगरी समाज एकेकाळी सधन होता, संपन्न होता. आज मात्र भूमिहीन झालेला हा समाज उपेक्षित असे जीवन जगतो आहे त्याचे चित्रण या कवितेतून कवीने केले आहे. आगरी समाजाने कठोर परीक्षण करण्याची गरज कवीने व्यक्त केली आहे.

### ९) इनकूरी - पुंडलिक म्हात्रे

कवी पुंडलिक म्हात्रे यांची 'इनकूरी' ही प्रकल्पग्रस्तांची कैफियत मांडणारी कविता आहे. वेगवेगळ्या प्रकारचे प्रकल्प आल्यामुळे जमिनी विकल्या गेल्या पण विकासाची फळे मात्र आगरी समाजाला कधीच चाखता आली नाहीत. मूळचा हा भूमिपुत्र कायम उपेक्षितच राहिला. प्रकल्पग्रस्तांची ससेहोलपट, राजकीय नेतेमंडळींनी साधलेला स्वतःचा स्वार्थ आणि पैशाचा विनियोग योग्य पद्धतीने न करता आल्याने आगरी समाजावर आता कोणती वेळ आली आहे, याचे वेदनादायी चित्रण ही कविता करते. या पार्श्वभूमीवर 'इनकूरी' या कवितेत कवी पुंडलिक म्हात्रे म्हणतात,

"आम्ही उगस नय भांडाचू पोरा हाच प्रकल्पग्रस्तांची
साईब तुमी इनकुरी करा इ जागा हाय कोनचे बापासची"

अशी विनवणी हा प्रकल्पग्रस्त शेतकरी करतो आहे. गावात एक मोठी पाण्याची विहीर होती. सर्वच लोक तेथून पाणी भरायचे. गुण्यागोविंदाने एकत्र राहायचे. गावात आनंदी वातावरण होते. बहुतेकांची मिठाची आगरे होती आणि त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. पण कंपन्या आल्या, प्रकल्प आले आणि आम्ही बेकार झालो. भीक मागायची वेळ आमच्यावर आली. आमच्या

जमिनी असून मात्र आमचे जगणेही कठीण होऊन बसले आहे, अशा प्रकारची खंत या कवितेतून कवी व्यक्त करीत आहेत.

"परकल्पग्रस्त चिंतातूर हाय व्हं
इनवी कुंडलिक तुमा नोकरी द्या तरी वाचमेनची"

प्रकल्पग्रस्त चिंतातुर आहेत, त्यांना धड नोकरीही नाही आणि शेतजमीनही नाही. किमान वॉचमनची तरी नोकरी देण्याची विनंती निवेदक करतो आहे. अशा कठीण परिस्थितीत या सर्व गोष्टींची निपक्षपातीपणे चौकशी करण्याचे आवाहन, विनंती हा प्रकल्पग्रस्त शेतकरी करतो आहे. त्याची करुण कहाणी कवीने या कवितेतून शब्दबद्ध केली आहे.

एकूण कवी पुंडलिक म्हात्रे यांच्या 'आमी जातीचं हाव आगरी' व 'इनकूरी' या दोन्ही कवितांमधून आगरी समाजजीवनाचे परखड वास्तव व्यक्त होते. समाजाची व्यथा, वेदना व दु:खाची जाणीव नेमक्या शब्दात कवीने येथे मांडली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | म. वा. म्हात्रे | : | १०. जमिनीचा तुकरा |

**परिचय -**

शिक्षकी पेशातून सेवानिवृत्त झालेले म.वा. म्हात्रे यांची खोप्यातील चिवचिवाट, बोल अभंगाचे, उखार, दुमान, मारवेल, सरवान सरी, आखांदा, दामटी इ. पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना प्राप्त झाला असून अन्य अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

**१०) जमिनीचा तुकरा -**

'जमिनीचा तुकरा' या त्यांच्या कवितेत पैशामुळे माणूस नातीगोती विसरून चैन करण्यासाठी वडिलोपार्जित जमिनी विकून भावा बहिणींनाही फसू लागला, याबद्दलचे वास्तव व्यक्त करणारी ही कविता आहे. एका अर्थाने आगरी समाजाला नैतिकतेचे, मूल्यांचे व माणुसकीचे उपदेश करणारी अशी ही कविता आहे. एकेकाळी फार पैसे नसतानाही आपले सर्वच नातेवाईक आपणाला जवळचे वाटत होते. काम करुन कष्ट करुन गुण्यागोविंदाने सर्वजण एकत्र नादंत होते, राहात होते.

पहाटेस उठून डोक्यावर जेवण घेऊन शेतकरी शेतावर कामाला जावचा, शेताच्या बांधावर बसून आनंदाने भाकरी खाऊन समाधानाने जीवन जगायचा. जमीन विक्रीतून वारेमाप पैसा आला. त्या पैशातून नवीन बंगला बांधला. जेवायला टेबल-खुर्ची आली. पण त्याचा आनंद मात्र काही मिळत नाही अशा प्रकारची भावना कवीने व्यक्त केली आहे. सारी सुखे आता दारासी असूनही निवांत आणि शांत झोप लागत नाही. पैशाचा हव्यास आज जास्तच वाढल्याने सुख मात्र लांब गेल्याची दु:खच भावना यातून व्यक्त होते. एका अर्थाने आगरी समाजात झालेले हे परिवर्तन कवीने मार्मिक शब्दात अधोरेखित केलेले आहे. नात्यांमध्ये वाढत केलेला दुरावा, भावनिक तुटलेपणा आणि माणुसकी विसरुन, नातीगोती विसरून आपण स्वार्थी पद्धतीने जीवन आता जगलो आहोत, ही अपराधीपणाची भावना नकळतपणे या कवितेतून व्यक्त होते. म्हणून शेवटी कवी म्हणतात,

“जमिनीचा तुकरा ऱ्हावदे जवळी
तिच हाय आपली सावली
नाती-गोती इसरू नका
फसवा फसवी करु नका”

अशा प्रकारचा उपदेश कवी म.वा. म्हात्रे आगरी समाजातील सर्व घटकांना विनम्रपणे करीत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | मुकेश कांबळे | : | ११. बंदर |
| | | : | १२. खोपट |

**परिचय -**

मुकेश कांबळे यांचा ‘निंगोलीच पाणी’ काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. दिवाळी अंकांमधून त्यांचे काव्यलेखन प्रकाशित झालेले आहे. आगरी बोली व प्रमाण मराठीतही त्यांनी कविता लिहिल्या. ‘कोमसाप’च्या विविध कार्यक्रमात त्यांनी काव्यवाचन केलेले आहे.

**११) बंदर - मुकेश कांबळे**

मुकेश कांबळे यांची ‘बंदर’ कविता इथल्या मातीची, मानवी संस्कृतीची परंपरा व अस्सल जिवनाची नाते सांगणारी कविता आहे. कालानुरुप आगरी समाज व्यवस्थित झालेले बदल त्यांनी आपल्या कवितेतून टिपले आहेत. एकेकाळी असलेले आगरी कोळी बांधवांचे हे बंदर नष्ट होऊन ‘एसइझेड’ च्या माध्यमातून त्याजागी मातीचा भराव टाकून इमारती कशा उभ्या राहत आहेत. वाढत्या शहरीकरणाचा, औद्योगीकरणाचा होत असलेला दूरगामी परिणाम कवीला या कवितेतून व्यक्त करायचा आहे.

“तव आसाची बंदराव कोल्यांची धावपल
मावऱ्याच्या पाट्या वावनाऱ्या कोलनंची पलापल
चालली व्हती आज तयं कोगाऱ्यांची गरबर
रेती, इटा, खरी, न डबर”

अगोदरच्या आणि नंतरच्या बंदरातील परिवर्तन कवीने रेखाटले आहे. सिडकोच्या भरावामुळे लयास गेलेल्या बंदराचे चित्रण कवीने नेमक्या शब्दात केले आहे. एकेकाळी बंदरावर कोळ्यांची चाललेली धावपळ, माशांच्या पाट्या वाहून नेणाऱ्या कोळीनींची पळापळ व आज त्याच जागी मजुरांची भाराव टाकण्यासाठी चाललेली गडबड कवीला अस्वस्थ करते. एकेकाळी येथे नारळी पौर्णिमेचा उत्सव आनंदाने साजरा झाला असेल. अनेक विवाह सोहळे संपन्न झाले असतील. आज मात्र नष्ट होत चाललेली ही बंदरे, आपल्या संस्कृतीचा ऱ्हास कवीला अस्वस्थ करतो आहे. एका अर्थाने नष्ट होणाऱ्या बंदराबद्दलची अस्वस्थ भावना, व्यथा आणि वेदना कवीने या कवितेतून चित्रित केलेल्या आहेत.

**१२) 'खोपट' - मुकेश कांबळे**

ही मुकेश कांबळे यांची कविता सिडको कंपनीने टाकलेल्या भरावामुळे आपले जूने खोपट कसे नष्ट झाले, त्यामागची भावना कवीने व्यक्त केली आहे. खाडीच्या बाजूला असलेल्या आपल्या लहानशा खोपटाच्या जागी आता सिडकोने भराव टाकला आहे. एके काळी जोराच्या पाण्याने माझं खोपट बुडायचं. ही आपली कुडाची झोपडी छान विणलेली होती. एका अर्थाने त्या खोपटात आपला भावनिक जो जिव्हाळा होता तो सिडकोने टाकलेल्या भरावामुळे कसा नष्ट झाला, याबद्दलची दुखरी भावना कवी व्यक्त करतो आहे.

"शिरकोचे भरावान सगलं जेलं
खोपटाचे जागवं बंगलं झैलं
आठवूनी त्याला आथ काय लराचं
आयस माज खोपट व्हतं कुराचं"

अशा जुन्या आठवणींना कवी उजाळा देतो आहे. सिडकोच्या आगमनाने बदललेली परिस्थिती आणि नष्ट झालेली मूळ संस्कृती कवीला त्यातून व्यक्त करायची आहे. खोपट जाऊन त्याच्या जागी आता बंगाले झाले. त्याची आठवण काढून आता रडून काहीच उपयोग नाही. अशा प्रकारची अस्वस्थ भावना मुकेश कांबळे यांच्या 'खोपट' या कवितेतून व्यक्त होते. आपल्या मूळ मातीशी, संस्कृतीशी जोडलेली नाळ व भावनिक नातेसंबंध कवीला व्यक्त करायचा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | सुनंदा मोडखरकर | : | १३. आलं कंपनीवालं आलं |

**परिचय -**

सेवानिवृत्त शिक्षिका असलेल्या सुनंदा मोडखरकर या सजग आणि जिज्ञासू लेखिका आहेत. 'आगरी लोकगीते आणि परंपरा', 'स्मृतिगंध', 'माझ्या मनातले गाणे' ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांनी आपल्या लेखनातून आगरी समाजाचे कष्ट, त्यांचा जीवनसंघर्ष व्यक्त केला आहे.

**१३) 'आलं कंपनीवालं आलं'**

या कवितेत सुनंदा मोडखरकर यांनी कंपनीवाले लोक येऊन शेतकऱ्यांच्या हक्काची जमीन कवडीमोल किमतीने विकत घेतात आणि त्यामुळे शेतकऱ्याला कोणत्या प्रकारच्या या त्रासाला सामोरे जावे लागते याचे संघर्षमय चित्र या कवितेतून व्यक्त होते. पैशाच्या जोरावर कंपनीवाले लोक आमची शेतजमीन विकत घेतात. आम्ही या भूमीची लेकरं त्याला बळी पडतो आणि भूमिहीन झालेली ही सर्व माणसे कशा प्रकारचा संघर्ष करत जीवन जगतात. ही वास्तव परिस्थिती सांगताना कवयित्री म्हणतात,

"या भूमीची लेकरं आमी
कला रं भिकंला लावताय तुमी
खाऱ्या न खोऱ्याशी आमची नाती
कला रं खावाला लावलंय माती"

शेतीशी आम्हा शेतकऱ्यांची असलेली ही जवळीक आहे. शेतजमिनीच्या विक्रीमुळे आम्ही तिला पारखे होतो. नोटांची बंडले दाखवून तुम्ही सामान्य शेतकऱ्यांना फसवता. नोकरीचे आमिष दाखवले जाते. पण या सर्व गोष्टीत त्यांना दोन घासही सुखाने मिळत नाहीत. आपल्या मातीशी एकनिष्ठ असलेला हा शेतकरी शेतजमीन म्हणजे आपली 'आई' आहे आणि ही जमीन सरकार व कंपनीवाले आमच्याकडून बळजबरीने खरेदी करतात. आपल्याला बेघर करुन देशोधडीला लावले जाते, ही वेदना व्यक्त करताना त्या म्हणतात,

"मायबाप तुम्हाला कोन आमी
माय आमची इकाला निंगलव तुमी
कसलं तुमचं रं सोटं लोटं
न आमाला भिकची दावताय वाट"

असाच सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. कंपन्या आल्यामुळे शेतकऱ्यांची शेती नष्ट होत गेली. परिणामी भीक मागण्याची वेळ सामान्य माणसांवर आलेली दिसते. सारकाही साटंलोटं करुन आमची जमीन तुम्ही विकत घेता. शहरीकरण, औद्योगिकरणचा आगरी समाज- संस्कृतीवर होत असलेला विपरीत परिणाम कवयित्रीने परिणामकारक शब्दात या कवितेतून व्यक्त केला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | शोभना पाटील | : | १४. पायंडा |

**परिचय -**

जिल्हा परिषदेच्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असलेल्या शोभना पाटील यांनी विविध मासिकांमधून कविता लेखन केलेले आहे. त्यांचे शाळेतील मुलांसाठी गाण्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले असून 'सावित्रीबाई फुले मानवसेवा रत्न' व 'प्रतिभा रत्न' या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

**१४) पायंडा - शोभना पाटील**

'पायंडा' ही शोभना पाटील यांची कविता आगरी समाज रूढी परंपरेत, अज्ञानाच्या गर्तेत कसा अडकलेला होता. त्याला नवा विचार व मार्गदर्शन करणारी कविता आहे. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी या कवितेतून स्पष्ट केले आहे. पणजा व पणजी शेती करत होते. स्वतःचा उदरनिर्वाह भागू शकत होते. पण पुढे शिक्षणाचे महत्त्व लक्षात आल्याने पणजीने आपल्या आजोबाला शाळेत घातले. शिक्षण घेऊन नोकरीला लावले आणि त्यामुळे कशा प्रकारचे परिवर्तन कुटुंबात झाले याचे चित्रण या कवितेतून येते.

"नोकरीला आजूस शारान आला
न बापासला माझे पक्का शिकवला
शिकून बापूस साहेब झाला
नं पक रूपये कमवाला लागला"

शिक्षणामुळे कुटुंबाचा, समाजाचा कसा विकास होतो हा अत्यंत मौलिक विचार कवयित्री शोभना पाटील यांनी या कवितेतून दिला आहे. शैक्षणिक प्रगती झाल्याशिवाय आपल्या

आचार, विचार व वर्तणुकीतही बदल घडत नाही. त्यामुळे वेगळ्या प्रकारचा पायंडा आपल्या या आजोबांनी, वाड-वडिलांनी निर्माण केला.

"बाबनी मना कालेजात धरली, न पक्की शिकवून डाक्टरीन केली"

आपल्यालाही वडिलांनी शिकवून डॉक्टर केले. याबद्दलची जाणीव कवयित्रीने व्यक्त केली आहे. पणजोबा व पणजी यांनी सुरु केलेली शिक्षणाची ही नवी परंपरा कुटुंबाला, आगरी समाजाला नव्या दिशेने पुढे घेऊन जाण्यात कशी उपयोगी ठरली. याबद्दलची सकारात्मक जाणीव या कवितेतून व्यक्त होते. मार्गदर्शक, विचारप्रवर्तक व आगरी समाजातील बदलांची नोंद घेणारी अशी शोभना पाटील यांची 'पायंडा' ही महत्त्वाची कविता होय. आगरी समाजातील शैक्षणिक प्रगतीचा व त्यातून येणाऱ्या वैचारिक प्रगतीचा विचार या कवितेतून व्यक्त होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | गणपत म्हात्रे | : | १५. एस.ई.झेड. नवरा |

**परिचय -**

कवी गणपत म्हात्रे हे व्यवसायाने शेतकरी असून त्यांनी आगरी मासिकांमधून काव्यलेखन केले आहे. ग्रामीण कवी, कथालेखक, शेतकरी संघटक म्हणून ते ओळखले जातात. 'यमाच्या राज्यात धांगडधिंगा' ही त्यांची नाटिका प्रसिद्ध आहे. कृषिबल, लोकमत, सागर या वर्तमानपत्रांमध्ये पत्रकार म्हणूनही त्यांनी काम केले आहे. 'कृषीमित्र पुरस्कार' त्यांना प्राप्त झालेला आहे.

**१५) एस.ई.झेड. नवरा -**

कवी गणपत म्हात्रे यांची 'एसई.झेड नवरा' ही कविता सरकारने आणलेला प्रकल्प म्हणजे 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' घालवण्यासाठी, त्याचा विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांनी केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली प्रतिकात्मक अशा स्वरूपाची कविता आहे. 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' आल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला. त्याला चळवळीचे रूप प्राप्त झाले आणि या असंतोषाला शब्दरूप देण्याचा प्रयत्न गणपत म्हात्रे यांनी 'एसई झेड नवरा' या कवितेतून केलेला आहे.

"मिळून शेतकरी सारे
लावू याच्या हळद अंगाला
मोर्चे घोषणांनी मिरवणूक काढू
देऊ चपलांच्या माला"

अशा शब्दात या प्रकल्पाला आमचा विरोध असून शेतकऱ्यांच्या मनात असलेली अस्वस्थता कवी व्यक्त करतात. फायदा आणि सुधारणेच्या नावाखाली एसई झेड प्रकल्पातंर्गत आमच्या जमिनी सरकारने हस्तगत केल्या. त्यामुळे हवालदिल झालेला शेतकरी प्रखरपणे या प्रकल्पाला विरोध करीत आहे. शेतकऱ्याच्या मनातील दुःख व वेदनेची जाणीव आणि त्याच्या ठिकाणचा विद्रोह कवितेच्या रूपाने व्यक्त झाला आहे. या प्रकल्पाला आमचा विरोध आहे. मोर्चे, धरणे, सभा घेऊन आम्ही त्याला विरोध करु. एसई झेड चा प्रकल्प आम्ही रायगडात कधीच होऊ देणार नाही. त्याला परतून लावू, हाकलून लावू अशाप्रकारची भावना कवितेत व्यक्त होते.

थोडक्यात, शेतकऱ्यांवर अन्याय-अत्याचार करणाऱ्या एसई झेड प्रकल्पाला विरोध करताना त्यातील उपरोध दाखवून प्रतीकात्मक नवऱ्याचे चित्र उभे करुन कवीने असंतोषाची भावना व्यक्त केली आहे. शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आगरी समाजाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कविता आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | डॉ. अविनाश पाटील | : | १६. खलाटी |

**परिचय -**

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात संशोधन अधिकारी (निवृत्त) म्हणून कार्यरत असलेले डॉ. अविनाश पाटील यांनी 'आगरी बोलीतील लोकजीवन, संस्कृती व साहित्या'वर पीएच.डी. पदवीसाठी संशोधन केलेले आहे. अन्वय, ऋतू बहरताना, अनवट वाटा हे त्यांचे काव्यसंग्रह 'वस्ती नसलेले गाव', 'दर्यादौलत' या कादंबऱ्या, सार्थक, शंकर पट हे कथासंग्रह, दुभंगलेला किनारा हे नाटक अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी लेखन केले आहे. 'आगरी बोली, लोकसंस्कृती व साहित्य परंपरा' हे त्यांचे पुस्तक प्रकाशित झालेले आहे. विविध प्रकारच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

**१६) खलाटी - अविनाश पाटील**

अविनाश पाटील यांच्या 'खलाटी' या कवितेतून आगरी समाज जीवनातील बदलणाऱ्या परिस्थितीचे वास्तव चित्रण आले आहे. आमची खलाटी वलाटी म्हणजे गावाजवळची पांढरी जमीन आमच्या मालकीची असूनही तलाठी मात्र आम्हाला फसवून ती बळकावण्याचा प्रयत्न करतो आहे. जमिनीला जशी लाखमोलाची किंमत आली, तशी त्याचे प्लॉट पाडून त्यावरचे लोणी खाण्याचा प्रयत्न तलाठी करतो आहे.

आमची हिरवीगार भात शेती आता नष्ट होऊ लागली आहे. मूळ जमीन नष्ट झाल्यामुळे व त्या जागी प्लॉट तयार होऊन शहरीकरण वाढते आहे, हे सर्व पाहताना उर दाटून येतो आहे. दु:खाची भावना कवीने त्यातून व्यक्त केली आहे.

"आमीच बनलू भाई अन् ते तं छुप कसाई,
अंतरली आमची आई, न् परक्यांना झाली घाई,
झगरा यो कोनासाठी"

असा भाव कमी व्यक्त करतात. आम्ही पैशासाठी जमिनी विकू लागलो. भाईगिरी करु लागलो. छुप्या पद्धतीने आमचेच काही लोक आम्हाला फसवून आमच्या आईला म्हणजे जमिनीला विकून कसाई झाले आहेत. आमची आई आता आम्हाला अंतरली असून हा सर्व झगडा कोणासाठी लढायचा असा प्रश्न कवी शेवटी विचारत आहेत. बदलणाऱ्या परिस्थितीचे अत्यंत वास्तव चित्र अविनाश पाटील यांच्या कवितेतून व्यक्त होते. आगरी समाज बदलत गेला, समाजीवनातील हे चढउतार पाटील यांच्या एकूण कवितेतून व्यक्त होतात. गतकाळाच्या अनेक आठवणीत कवीचे मन रमते आणि त्याबद्दलचा भाव समर्पक शब्दात त्यांनी या कवितेतून व्यक्त केला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | दिनानाथ पाटील | : | १७. दीप्तीला गाव सारा धावला |

**परिचय -**

शासकीय सेवेतून राजपत्रित अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालेले दीनानाथ पाटील आपल्या काव्य लेखनातून समाजातील वृत्ती-प्रवृत्तींवर डोळसपणे भाष्य करतात. 'गौराई', 'सानुली', 'तरंग', 'काव्यसंध्या' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. गेली वीस वर्षे विविध वर्तमानपत्र व दिवाळी अंकांमधून ते लेखन करतात. राष्ट्रीय एकात्मता फेलोशिप, महाराष्ट्र गुणीजन रत्न पुरस्कार, प्रतिभा सन्मान पुरस्कार अशा पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आलेले आहे.

**१७) दीप्तीला गाव सारा धावला - दिनानाथ पाटील**

दीनानाथ पाटील यांची 'दीप्तीला गाव सारा धावला' ही कविता समाजातील वाईट वृत्ती प्रवृत्तींवर डोळसपणे भाष्य करणारी महत्त्वाची कविता आहे. जमीन विकून भरपूर पैसा मिळाल्यानंतर व्यसनामुळे हौस, मौजमजा करण्यात पैसे कसे उडवले गेले. व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे होती नव्हती ती सर्व जमीन गेली. मौजमजा करण्यातच धन्यता मानल्यामुळे आपल्या आयुष्याची कशी वाताहात झाली, हे अत्यंत परखड शब्दांत कवी समाजाला मार्गदर्शन करीत आहेत. एकेकाळी भरपूर पैसा होता तोपर्यंत समाजात आपल्याला मान सन्मान असतो.

आपल्याजवळ पैसा आहे तोपर्यंत लोक आपल्याला मोठेपणा देतात. हाच पैसा संपला की आपल्याकडे कुणी ढुंकूनही पाहत नाही हे वास्तव कवीने येथे व्यक्त केले आहे.

"बोटात आंगठ्या हातात घऱ्याल, गल्यान चैन
फिराया सुसाट एसी कार
जवायला रोज गाठाचा बार
कोबऱ्याचे रसा संग रमने झिंगला"

म्हणजे जमिनीच्या विक्रीतून आलेला पैसा कसा चुकीच्या गोष्टीसाठी उडवला गेला. वाईट गोष्टींच्या संगती लागल्यामुळे असलेली सर्व सधनता गेली. व्यसनापायी आपल्या कुटुंबाला कुळाला बट्टा लागला, होते नव्हते ते सर्व संपले. आता मात्र आपल्या बरोबर कोणीही नाही, याचा पश्चाताप होतो आहे. एकेकाळी जमिनीतून भरपूर पीक घेतले जात होते. घरदार चांगले चालले होते. आपल्या वाईट कर्तृत्वामुळे कुटुंबावर कशी दुर्दशेची वेळ आली आहे हेच कवी येथे सांगत आहेत. घरातली सर्व चीली-पिली आनंदाने जगत होती. ती शेतात ऊन उत्पन्न मिळत हाते. सुखासमाधानाने संसार चालला होता, पण जमिनीच्या विक्रीतून आलेला पैसा कसा गैरमार्गाने उडवला गेला आणि आज आगरी समाजातील अनेक लोकांवर कशा पद्धतीने जीवन जगण्याची वेळ आली आहे, याबद्दलचे मार्गदर्शन या कवितेतून दीनानाथ पाटील करीत आहेत.

"आता आगरान नाय खोसा न घराला वासा
तुझ्या कररनीनं लेका सारं बघ धरला"

आपल्या वाईट वर्तणुकीचा असा पश्चातापाचा भाव व झालेल्या चुकांची जाणीव निवेदकाने व्यक्त केली आहे. जोपर्यंत आपल्या जवळ पैसा आहे तोपर्यंतच लोक आपल्याला मानसन्मान देतात. आपल्या आजूबाजूला वावरतात. एकदा का आपला पैसा संपला की सारा गाव कसा पसरतो हेच वास्तव कवीने येथे मांडले आहे. आगरी समाजाने मिळालेल्या पैशाचे योग्य नियोजन न केल्यामुळे समाजावर आलेली वाईट अवस्था कवीला यातून व्यक्त करायची आहे.

त्यामुळे आगरी समाजाला विचार देणारी, मार्गदर्शन करणारी त्यांची ही कविता येथे महत्त्वाची ठरते.

| | | | |
|---|---|---|---|
| १३. | विश्वास ठाकूर | : | १८. आमचेकरं आता प्रकल्प आयलय |

**परिचय -**

सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत असलेले विश्वास ठाकूर यांना काव्य लेखनाबरोबरच चित्रकला व तबला वादनाची ही आवड आहे. 'आठवणीतला गंध' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध असून विविध मासिकांमधून त्यांनी काव्यलेखन व चारोळ्यांचे लेखन केलेले आहे. सिडकोतर्फे प्राथमिक शिक्षक पुरस्कार उरणपूर्व साहित्य संमेलनात काव्य गायनाचा प्रथम पुरस्कार, आगरी साहित्य विकास मंचातर्फे सन्मान आदी पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आलेले आहे.

**१८) आमचेकर आता प्ररकल्प आयलंय - विश्वास ठाकूर**

या कवितेत कवी विश्वास ठाकूर यांनी आमच्याकडे प्रकल्प आल्यामुळे काय काय बदल झाले, परिवर्तन झाले याबद्दलचे दुःखद चित्रण या कवितेतून व्यक्त केले आहे. जुन्या काळात शेतात जोराने पाणी यायचे. खड्ड्यात पाणी साठून राहायचे आणि त्यामुळे चांगल्या प्रकारची मासळी मिळायची. चिंबोरी हाताला लागयची. जमिनीवर मात्र प्रकल्पाच्या माध्यमातून आता भराव टाकला गेल्यामुळे या सर्वांना आपण कसे पारखे झालो आहोत, याबद्दलची दुःखत भावना कवी व्यक्त करतो आहे.

"घरान ढोमनी भरुन
काऱ्या कोलीम आसाचा
सुके न वले मासलीचा
मोजमाप नसाचा"

एका अर्थाने मासळीची विपुलता होती. तसेच माणुसकी ही टिकून होती. पाहुणे रावळे सर्व यायचे. एकमेकांबद्दल माणुसकी टिकून होती पण प्रकल्प आल्यामुळे मात्र घडलेले सर्व हे बदल नात्या-नात्यांमध्ये कसा दुरावा निर्माण करतात आणि आमच्या जीवनात झालेल्या बदलाचा भावनिक परिणाम कवीला या कवितेतून व्यक्त करायचा आहे.

गतकाळाच्या अनेक आठवणींना कवी विश्वास ठाकूर या कवितेतून उजाळा देतात. एकेकाळी शेतात असलेली सधनता कौटुंबिक नातेसंबंध, एकमेकांचा लोभ व माणुसकी या सर्वच गोष्टींना आता आगरी समाज दुरावला आहे. हे सर्व कशामुळे झाले आहे तर आमच्याकडे आता प्रकल्प आल्यामुळे शेतांवर आता भराव टाकला गेला. जोराचे पाणी आत येत नाही. सर्वकाही ही शेती भरावामुळे नष्ट झाली आहे, ही दुःखाची सल कवीने नेमक्या शब्दात व्यक्त केली आहे. बदलत्या परिस्थितीचा आगरी समाज व संस्कृतीवर झालेला विपरीत परिणाम ही कविता चित्रित करते. काळाबरोबर झालेले हे परिवर्तन अस्वस्थ करते.

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | दमयंती भोईर | : | १९. भाकरी |
| | | : | २०. शून्य |

**परिचय** -

दमयंती मोहन भोइर या शास्त्र शाखेच्या पदवीधर असून काव्यलेखनाबरोबरच त्यांनी ललित लेखन केले आहे. आगरी साहित्य मंडळाच्या या विश्वस्त म्हणून कार्यरत आहेत. 'संस्कार' हा त्यांचा ललित लेखसंग्रह आणि 'तरंग उदकाचे अंग', 'दिशाभूल' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. अनेक आगरी साहित्य संमेलनात त्यांनी काव्य वाचन केले आहे. 'दिशाभूल' या संग्रहात को.म.सा.प. चा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

## १९) भाकरी - दमयंती भोइर

आगरी साहित्याची चळवळ जवळून अनुभवणाऱ्या दमयंती भोइर यांच्या कवितेतून समाजजीवनाचा सांस्कृतिक, सामाजिक आविष्कार परिणामकारकपणे घडतो. त्यांच्या आगरी कवितेत अनुभवविश्वाची भिन्नता दिसते. 'स्त्री'च्या जगण्याचा व सामर्थ्याचा विचार त्यांनी आपल्या काव्यलेखनातून मांडला आहे. दमयंती भोईर यांची 'भाकरी' ही कविता जीवनाचा नेमका दृष्टिकोन व्यक्त करते. एका साध्या गोष्टीतून संसार साधण्याची, योग्य पद्धतीने करण्याची कला 'आई' कशी शिकविते हे या कवितेतून कवयित्रीने सांगितले आहे. भाकरी करायला शिकवताना आई जणू जगण्याचे तत्त्वज्ञानच आपल्याला शिकून जाते, हा विचार येथे महत्त्वाचा आहे.

"तवा माजे धेनान आयला
का वरशी ज्या दिसतं सादा सुदा
त्या नसतं तवरा सोपा - तूनी मग पान्याशी
मलून मलून मव केलास पीठ
न शिकविलीस
कयाच न कुरकुनारी
चांदागत गोल भाकरी"

आपल्याला चांगला संसार करता यावा, संसाराला तडा जाऊ नये यासाठी काही एक तत्वज्ञान भाकरी करता करता आपल्याला आईने शिकविले. चार भिंतीतले धडे गिरवायला सांगतानाच जीवनाचे तत्वज्ञानही ती सांगून जाते. दु:खाने भरलेल्या या जीवनाला भाकरीच्या पिठासारखं मऊ करुन सांधता आले पाहिजे. ही कला आई जाता जाता शिकवून जाते. दमयंती भोईर यांची ही कविता वाचना बहिणाबाईच्या 'अरे संसार संसार' या कवितेची आठवण आपल्याला येते. साध्या सोप्या शब्द रचनेतून प्रतिमा व रूपक वापरुन भोईर यांनी जीवनाचे व्यापक तत्त्वज्ञान सूचितार्थाने स्पष्ट केले आहे. नवी जीवनदृष्टी देणारी त्यांची ही कविता म्हणूनच महत्त्वाची वाटते.

## २०) शून्य - दमयंती भोईर

दमयंती भोईर यांची 'शून्य' ही कविता जीवनातले चढ-उतार दर्शविणारी कविता आहे. शून्यापासून सुरुवात करुन पुन्हा शुन्याकडे प्रवास करणारे आपले जीवन कवयित्रीने या कवितेतून मांडले आहे. शून्याला म्हटले तर अर्थ आहे तर काहीच अर्थ नाही. शिक्षणाच्या वाटचालीत लेखनाला वळण लागण्याआधी लिहिता येण्यासारखा आकार म्हणजे शून्य होय. त्या आकाराला पुढे गिरवत गिरवत आपण शिक्षणाची नवी वाट शोधत पुढे जातो. सुरुवात

शून्यापासून होते आणि शेवटही शून्यातच होतो. शेवटी शून्य हातात शिल्लक राहतो. माणसाच्या जगण्याचा हा मतीतार्थ कवयित्रीने जुन्या प्रतीकातून कलात्मकरीत्या मांडला आहे.

"शून्यापासूनते, शून्यापतूरचे ये परवासान
एकेक घर, सर करत गेलेलो आपून
एक मवर, फकस्त पटावरची"

अशा पद्धतीने शून्याचा हा प्रवास म्हणजे माणसाच्या जीवनातला चढ-उतार आहे. मानवी जीवनाचे वास्तव व्यक्त करणारी त्यांची ही कविता मार्गदर्शक व महत्त्वाची ठरते.

### ५.३.३ आगरी बोलीतील कवितांमधील आशयसूत्रे :

रायगड, ठाणे व नवी मुंबई या जिल्ह्यात वास्तव असलेला आगरी समाज हा शेती व्यवसायाशी निगडित आहे. आपल्या आगरात शेती व त्याला पूरक म्हणून मासेमारी, मीठ तयार करणे असा व्यवसाय तो करतो आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करत आनंदाने जगणारा हा शेतकरी गतकाळात सुखासमाधानाने राहत होता. पण शहरीकरण, औद्योगीकरण विविध प्रकल्पांच्या माध्यमातून येणाऱ्या कंपन्या याचा परिणाम होऊन आगरी समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत गेले. त्यांचे जीवनमान बदलून गेले. या सर्व व बदलत्या परिस्थितीचा आगरी समाजजीवनावर झालेला विपरीत परिणाम आगरी बोलीतील कथा, कादंबरी, कविता व नाटक लेखनातून व्यक्त होतो.

विशेषतः आगरी कवितांमधून हे सामाजिक, सांस्कृतिक बदल कवींनी स्पष्टपणे नोंदवले आहेत. अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या आगरी बोलीतील २० कवितांचा एकत्रित अभ्यास करताना या कवितांमधून पुढील प्रकारची भिन्नभिन्न आशयसूत्रे जाणवतात.

आगरी बोलीतील निवडक कवितांची आशयसूत्रे

१. आगरी समाज संस्कृतीचे वास्तव चित्रण
२. बदलत्या परिस्थितीत निर्माण झालेली नवी आव्हाने
३. शहरीकरण, उद्योग-व्यापार व्यवसायाचा दूरगामी परिणाम
४. माणुसकी व नातेसंबंधात घडत गलेले बदल
५. पैशाला आलेले अवास्तव महत्त्व
६. पैशाचा गैरवापर त्यातून नैतिकतेचा झालेला ऱ्हास
७. आगरी समाजाचे दुःख, कष्ट व व्यथा-वेदना
८. प्रकल्पग्रस्तांच्या भिन्न-भिन्न समस्या
९. आगरी समाजाचा जीवनसंघर्ष
१०. रूढी परंपरा व अंधश्रद्धांचा पगडा
११. आपल्या शेतीशी, मातीशी असलेले भावनिक नाते
१२. शिक्षणाचे महत्व व जाणीवजागृती
१३. समाजातील वृत्ती-प्रवृत्तींवर केलेले भाष्य
१४. स्त्रीजीवनाचे चित्रण

एकूणच आगरी बोलीतील या सर्व कविता आगरी समाजीवनाचे, संस्कृतीचे वास्तव दर्शन घडवितात. काळाबरोबर झालेली परिवर्तने, मानसिक, भावनिक, दृष्ट्या घडत गलेले बदल आणि आगरी समाजाच्या या जगण्यावर त्याचा झालेला परिणाम अशी आशयसूत्रे या

निवडक कवितांमधून व्यक्त होतात. त्या-त्या कवी व कवयित्रींनी कलात्मक रीत्या बोलीभाषेच्या लयबद्ध मांडणीतून या सूत्रांना शब्दबद्ध केले आहे.

### २.३.४ आगरी बोलीतील कवितांचे स्वरूप-विशेष :

आगरी बोलीत साधारणपणे १९८४-८५ च्या सुमारास कविता लिहिली जाऊ लागली. सिडकोच्या माध्यमातून येऊ घातलेले वेगवेगळे प्रकल्प आणि त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी मोठ्या प्रमाणात सरकारकडू, कंपन्यांकडून हस्तगत होऊ लागल्या. त्यातून झालेल्या आंदोलनांचा, केलेल्या संघर्षाचा आविष्कार आगरी बोलीतील कवितांमधून व्यक्त होतो. प्रकल्पग्रस्तांची लेखनी सरसावली. येथील मूळचा भूमिपुत्र हा उपरा होऊ लागला. त्याची जमीन प्रकल्पासाठी विकत घेतली गेली. मोठ्या प्रमाणात पैसाही मिळाला. परंतु या पैशाचा विनियोग कसा करावा या बद्दलचे नियोजन न केल्याने, त्याची जाणीव नसल्यामुळे हौस-मौज मजा करण्यातच गैरमार्गाने पैसा खर्च झाला आणि शेवटी दु:ख, कष्टदायी असे जीवन वाट्याला आले. त्यातून प्रकल्पग्रस्तांची आंतरिक तळमळ व उध्वस्त होतानाची तडफड आगरी बोलीतील कवितांमधून कवींनी मांडली आहे.

अनुभवातून आलेले हे आगरी समाजाचे भावविश्व बोलीतील परिणामकारक शब्दशैलीमुळे कलात्मक रित्या साकारले गेले आहे. या सर्वच कवितांचे सर्वसाधारण स्वरूप पाहिले तर आगरी समाजाचे, शेतकऱ्यांचे आपल्या शेतजमिनीशी, मातीशी जोडले गेलेले घट्ट नाते या कवितांमधून व्यक्त होते. आगरी कवितांचे स्वरूप लक्षात घेताना -

- शेतीजमीन व आगर
- शेतजमीनीशी असलेले भावनिक नातेबंध
- निसर्ग आणि त्याच्याशी असलेले जवळीक
- सामाजिक रूढी परंपरांचा पगडा
- प्रकल्पग्रस्तांच्या समस्या
- आई बद्दलचा प्रेमभाव व नातेसंबंध
- स्त्रीवर्गाच्या दु:खाची जाणीव
- मार्मिक भाष्य व समाजाचे प्रबोधन
- दु:ख, व्यथा-वेदना व आव्हाने
- शहरीकरण व प्रकल्पांचा परिणाम
- नवीन जीवनदृष्टी व जाणीवजागृती
- प्रतिमा, प्रतीक व रूपकांचा शैलीत कलात्मक वापर

या कवितांमधून व्यक्त होते. बोली भाषेतील गोडवा या सर्वच कवितांना जसा आहे, तशा या कविता आशय विषयाच्या दृष्टीने संपन्न व अर्थपूर्ण अशाच आहेत. नव्यानेच शिक्षित झालेला लेखकवर्ग आगरी समाजाचे भावविश्व, त्यांच्या व्यथा-वेदना शब्दबद्ध करु लागला आहे. अचानक हाती आलेला खूप पैसा, त्याचा गैरवापर, त्यातून मानवी नातेसंबंध कसे दुरावत गेले, याचे वास्तव चित्रण या कवितांमधून व्यक्त होते.

अनेक कवितांमधून आगरी समाजाची आंतरिक तळमळ व्यक्त होते. शेतकऱ्यांना त्यांची जमीन आपल्या जीवाभावाची वाटते. काळजाच्या तुकड्या सारखी वाटते. त्यामुळे ती विकताना होणाऱ्या व्यथा-वेदना, दु:ख यांचे चित्रण कवितांमधून आलेले आहे. वाढते शहरीकरण व त्याचा आगरी समाज जीवनावर झालेला परिणाम कवींनी मांडला आहे. आम्ही येथे मूळचे भूमिपुत्र असूनही आमच्या वाट्याला आता उपरेपणा आला आहे. आम्ही कष्ट करायचे, राबायचे आणि व्यापार मात्र दुसऱ्यांनी करायचा. प्रकल्पाच्या नावाखाली आमच्या जमिनी बाहेरुन आलेल्या लोकांनी हस्तगत केल्या आहेत आणि आम्हाला परके केले. तेथे शेतजमिनी नष्ट झाल्यामुळे रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला. जीवन जगणे अवघड झाले. प्रकल्पग्रस्तांच्या अनेक समस्या त्यातून कशा निर्माण झाल्या आहेत ही भावना या कवितांमधून व्यक्त होते.

**२.३.५ आगरी बोलीतील कवितांमधील जाणिवा व भाषाशैली :**

आगरी बोलीतील कविता या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक प्रश्नांचा वेध घेणाऱ्या कविता आहेत. त्या कवितांमधून व्यक्त झालेल्या जाणिवा आगरी समाजातील समकालीन वास्तवाला नेमक्या शब्दात मांडू पाहतात. भिन्न-भिन्न स्वरूपाच्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांचे चित्रण या कवितांमधून झालेले आहे. हक्काची आपली जमीन प्रकल्पासाठी गेल्यामुळे या प्रकल्पग्रस्तांची तळमळ व त्यांच्या दु:खाची भावना, जाणीव कवींनी मांडली आहे. निवडलेल्या १४ कवींच्या २० कवितांमधून आगरी समाजाच्या समकालीन वास्तवाचे भान व जाणिवा व्यक्त होतात.

आगरी समाज हा मुळात कुणबी म्हणजेच शेतीप्रधान आहे. आपल्या आगरात म्हणजे शेतीवाडीत थोडेफार उत्पन्न मिळवू उदरनिर्वाह करणारा हा समूह आहे. 'आगरी बोली' असा उल्लेखही 'आगर' या शब्दावरूनच होत असलेला दिसतो. आगरी कवितांमधील आशय व जीवनाभुवाबरोबर या बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्द रचनेमुळे या कवितांना वेगळेपणा प्राप्त झाला आहे. शब्दांची भिन्नभिन्न रूपे बोलीचे वेगळेपण स्पष्ट करणारी आहेत. सर्वनामे, क्रियापदे, नाते संबंध दाखवणारे शब्द रंग, ऋतू, नक्षत्रे, वार, शरीराचे अवयव अशा शब्दांमध्ये आगरी बोलीचे वेगळेपण जाणवते.

आगरी बोलीत काव्यलेखन करणाऱ्या कवी व कवयित्रींनी समाजजीवनात वापरल्या जाणाऱ्या शब्दकळा वापरल्याने या कवितांना एक गोडवा प्राप्त झाला आहे. 'अल्पाक्षरीत्व' हे कवितेचे वैशिष्ट्य या सर्वच कवितांमधून जाणवते आहे. 'सारेबाराचा पलाट', 'आगरी कोळी', 'नवी मुंबई', 'इनकूरी' या कवितांमधून रचनेची वैशिष्ट्यपूर्ण जाणवते. 'एस.ई.झेड. नवरा' यातून नवऱ्याचे वैशिष्ट्यपूर्ण रूपक वापरून महत्वाचा विचार मांडला आहे. 'भाकरी' ही कविता साध्या सोप्या शब्दातून जीवनदृष्टी देणारी कविता आहे. त्याचबरोबर रचनेची तंत्रशुद्ध पद्धतही अनेक ठिकाणी वापरलेली दिसते. कडव्यांची केलेली वैशिष्ट्यपूर्ण रचना, ध्रुवपदाचा केलेला वापर, आशयाला पूरक ठरणाऱ्या प्रतिमा, प्रतीक, व रूपकांचा वापर काव्यलेखनासाठी केला गेला असल्यामुळे भाषिक शैलीच्या दृष्टीने या कविता वाचनीय ठरतात. बोलीभाषेतील कवितांना मुळातच एक लयबद्धता असते. कलात्मक सौंदर्य असते. हे शब्दसौंदर्य या कवितांमधून ही साधले गेलेले दिसते.

**आपली प्रगती तपासा :**

१) आगरी कवितांमधील आईची विविध रूपे चित्रीत करणाऱ्या कवितेचा आढावा घ्या.

_______________________________________________________________

_______________________________________________________________

_______________________________________________________________

_______________________________________________________________

_______________________________________________________________

## २.४ सारांश

आगरी बोलीचा अभ्यास करताना या बोलीचे स्वरूप, व्युत्पत्ती व शब्दसंग्रह, वाक्प्रचार, म्हणी हे घटक समजून घेताना आगरी बोलीत निर्माण झालेले वैशिष्ट्यपूर्ण लेखन अभ्यासने महत्त्वाचे ठरते. त्यादृष्टीने आगरी बोलीतील निवडक अशा २० कवितांचे स्वरूप आपण लक्षात घेतले. या कवितांमधून व्यक्त झालेल्या जीवनजाणिवा, मांडलेले विषय व आशयानुभव विचारात घेतला. आगरी समाज संस्कृतीचे घडवलेले दर्शन वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. शिवाय या सर्वच कविता म्हणजे गतकाळापेक्षा आजच्या काळात आगरी समाज जीवनात काय बदल घडत गेले, कोणते परिवर्तन होत गेले याबद्दलची कवी व कवयित्रींनी नोंदवलेली निरीक्षणे आहेत. आगरी समाज जीवनाचा, सांस्कृतिक बदलांचा विचार या कवितांमधून व्यक्त होतो. त्याचबरोबर समाजाला, समूहाला मार्गदर्शन करणाऱ्या, नवा विचार व दिशा देणाऱ्या या कविता महत्त्वपूर्ण वाटतात.

## २.५ सरावासाठी स्वाध्याय / नमुना प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. तुम्ही अभ्यासलेल्या प्रा. एल.बी. पाटील आणि रामनाथ म्हात्रे यांच्या कवितांची आशयसूत्रे थोडक्यात स्पष्ट करा.

२. चंद्रकांत मढवी यांच्या तुम्ही अभ्यास असलेल्या कवितांमधून कोणत्या जाणिवा व्यक्त होतात, ते स्पष्ट करा.

३. आगरी बोलीतील कवितांमधून आगरी समाजजीवनाचे वास्तव दर्शन घडते, साधार स्पष्ट करा.

४. आगरी कवितेतून स्त्रीजीवन व स्त्रियांच्या समस्यांचा विचार कसा मांडला आहे, ते स्पष्ट करा.

५. पुंडलिक म्हात्रे यांच्या 'आमी जातीचं हाव आगरी' व 'इनकुरी' या कवितांचे थोडक्यात रसग्रहण करा.

६. आगरी समाजजीवनात घडलेले बदल, शहरीकरण आणि प्रकल्पांचा परिणाम याबद्दलची जाणीव आगरी कवितांमधून कशी व्यक्त होते ते स्पष्ट करा.

७. तुम्ही अभ्यासलेल्या आगरी कवितांची स्वरूप वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

८. अभ्यासाला नेमलेल्या आगरी कवितांमधून कोणकोणती आशयसूत्रे व्यक्त होतात, ते थोडक्यात विशद करा.

९. आगरी बोलीतील कवितांमधून प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न मांडणाऱ्या कवितांबद्दल थोडक्यात विवेचन करा.

१०. आगरी समाजात झालेले परिवर्तन कवींनी आपल्या कवितांमधून कसे रेखाटले आहे ते स्पष्ट करा.

११. प्रकल्पग्रस्तांच्या विविध समस्यांचे वास्तव चित्रण आगरी कवितांमधून परखडपणे व्यक्त होते सोदाहरण स्पष्ट करा.

१२. काळाबरोबर नष्ट होत चाललेली आगरी संस्कृती, कृषीजीवन आगरी कवितांमधून कसे व्यक्त होते, सोदाहरण विशद करा.

१३. आशयानुभव व भाषाशैलीच्या दृष्टीने आगरी कवितांची तुम्हाला जाणवणारी वेगळी वैशिष्ट्ये कोणती, ते स्पष्ट करा.

१४. आगरी कवितांमधून व्यक्त होणारा जीवनविषयक दृष्टीकोन वाचकांना समृद्ध करणारा आहे, साधारण स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा**

१. 'आगरी कोळी' या कवितेचे रसग्रहण करा.

२. 'नवी मुंबई' या कवितेतून मांडलेले प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न

३. 'इनकूरी' या कवितेचा आशय स्पष्ट करा.

४. 'आलं कंपनीवालं आलं' या कवितेचा आशय थोडक्यात लिहा.

५. 'एस.ई.झेड. नवरा' या कवितेतील उपरोध.

६. 'भाकरी' या कवितेतून व्यक्त झालेल्या जीवनदृष्टी

७. 'आय' कवितेतील 'आई' ची विविध रूपे

८. 'सारेबाराचा पलाट' या कवितेतून केलेले मार्मिक भाष्य

९. दमयंती भोईर यांच्या कवितेतील स्त्री जाणीव

१०. आगरी कवितेतील दु:ख व वेदनांचे चित्रण

११. आगरी कवितांमधून मांडलेले प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न

१२. आगरी कवितांचे शैलीविशेष

**क) वस्तुनिष्ठ प्रश्न (एक-दोन वाक्यात उत्तरे)**

१) 'साडेबाराचा पलाट' ही कविता कोणी लिहिली आहे ?

उत्तर. 'साडेबाराचा पलाट' ही कविता प्रा. एल. बी. पाटील यांनी लिहिली आहे.

२) 'आबंचा अघोर' या शब्दाचा अर्थ लिहा.

उत्तर. 'आबंचा अघोर' म्हणजे आजोबा, वाड-वडिलांची शेतीवाडी होय.

३) ‘भाकरी’ ही कविता कोणाची आहे ?
उत्तर. ‘भाकरी’ ही कविता दमयंती भोईर यांची आहे.

४) आगरी भूमिपुत्रांचे प्रश्न कोणत्या कवितांमधून चित्रित झाले आहेत ?
उत्तर. ‘आगरी कोळी’, इनकूरी, आलं कंपनीवालं आलं इ. कवितांमधून आगरी भूमिपुत्रांचे प्रश्न मांडले आहेत.

५) ‘इनकुरी’ ही कविता कोणी लिहिली आहे ?
उत्तर. ‘इनकुरी’ ही कविता पुंडलिक म्हात्रे यांनी लिहिली आहे.

६) ‘नवी मुंबई’ ही कविता कोणाची आहे ?
उत्तर ‘नवी मुंबई’ ही कविता रामनाथ म्हात्रे आहे.

७) ‘एस.ई.झेड. नवरा’ या कवितेचा विषय कोणता आहे ?
उत्तर. सेज (SEZ) विशेष आर्थिक क्षेत्र या प्रकल्पाविरूद्ध शेतकऱ्यांनी केलेले आंदोलन हा या कवितेचा विषय आहे.

८) ‘आमी जातीचा हाव आगरी’ ही कविता कोणी लिहिली आहे ?
उत्तर ‘आमी जातीचा हाव आगरी’ ही कविता पुंडलिक म्हात्रे यांची आहे.

९) ‘मुकेश कांबळे यांच्या खोपट या कवितेतून कोणती कोणता विषय मांडला गेला आहे ?
उत्तर. ‘सिडको मुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नष्ट झाल्या, त्याबद्दलचे दुख हा या कवितेचा विषय आहे.

१०) काश्मीरचा बर्फ आणि मिठाचे डोंगर यांची तुलना संजीव म्हात्रे यांनी कोणत्या कवितेत केली आहे.
उत्तर. कश्मीर बर्फ आणि मिठाचे डोंगर यांची तुलना संजीव म्हात्रे यांनी ‘आबंचा आगोर’ या कवितेत केली आहे.

११) मुकेश कांबळे यांच्या ‘बंदर’ या कवितेचा विषय कोणता ?
उत्तर. भराव टाकण्यापूर्वी ची शेती ती व त्यानंतर ते तिचे नष्ट होणे हा विषय मुकेश कांबळे यांच्या ‘बंदर’ या कवितेचा आहे.

१२) समाजातील अपप्रवृत्तींवर दीनानाथ पाटील यांनी कोणत्या कवितेतून भाष्य केले आहे ?
उत्तर. समाजातील अपप्रवृत्तींवर दीनानाथ पाटील यांनी ‘दीप्तीला गाव सारा धावला’ या कवितेतून भाष्य केले आहे.

१३) ‘खलाटी’ या कवितेचा विषय कोणता ?
उत्तर. आगरी समाजातील बदलणाऱ्या परिस्थितीचे चित्रण ‘खलाटी’ या कवितेत कवी अविनाश पाटील यांनी केला आहे.

१४) आगरी बोलीत काव्यलेखन करणाऱ्या कोणत्याही दोन कवयित्रींची नावे लिहा.

उत्तर. सुनंदा मोडखरकर, दमयंती भोईर, शोभना पाटील या कवयित्रींनी आगरी बोलीत काव्यलेखन केले आहे.

१५) चंद्रकांत मढवी यांच्या कोणत्या कवितेतून आई बद्दलची भावना शब्दबद्ध झाली आहे ?

उत्तर. चंद्रकांत मढवी यांच्या 'आय' या कवितेतून आई बद्दलची भावना व्यक्त झाली आहे ?

१६) नात्यांचा विसर पडून पैशाला आलेले अवास्तव महत्त्व म. वा. म्हात्रे यांच्या कोणत्या कवितेतून व्यक्त होते ?

उत्तर. म.वा. म्हात्रे यांच्या 'जमीनीचा तुकरा' या कवितेतून ही जाणीव व्यक्त होतो.

## २.६ पूरक अध्ययन / अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१) भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : मुख्य संपादक - डॉ. गणेश देवी, 'महाराष्ट्र खंड' : संपादक - अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन पुणे २०१३

२) आगरी बोली : लोकसंस्कृती आणि साहित्य परंपरा - डॉ. अविनाश पाटील, आगरी युथ फोरम डोंबिवली २०१७.

३) 'आगरातल्या वाटा' (आगरी बोली) : संकलन, संपादन व लेखन - डॉ. मनीषा बनसोडे व इतर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २०१७.

४) अभ्यासक्रमात नेमलेल्या कवितांचा अभ्यास करण्यासाठी पूरक म्हणून त्या-त्या कवींचे, कवयित्रींचे मूळ कविता संग्रह संदर्भ म्हणून अधिक आकलनासाठी वाचता येतील.


❖❖❖❖

# ३

# आगरी बोलीतील निवडक कथांचा अभ्यास

'विशिष्ट बोलीचा अभ्यास' हा आपला अभ्यासाचा विषय आहे. हे विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. एखाद्या बोलीचा परिचय करुन घेण्याचे विविध मार्ग आहेत. पहिला आणि उत्तम मार्ग मार्ग म्हणजे त्या बोली समाजातील वर्तमान बोलीचे मौखिक अथवा लिखित नमुने प्रत्यक्ष अनुभवणे. त्या समाजात राहून त्या बोली समाजातील व्यक्तींचे संवाद ऐकून त्या बोलीचा परिचय करुन घेता येतो. बोली परिचयाचा दुसरा मार्ग म्हणजे कोणत्याही बोली या लोकसाहित्याने समृद्ध असतात. पारंपरिक लोकगीते आणि लोककथांमधून बोलीची विविध रूपे प्रतिबिंबित होत असतात. त्यांचा आस्वाद घेतल्यास आपल्याला बोलीरुपाचा परिचय होऊ शकतो. बोली परिचयाचा तिसरा मार्ग म्हणजे त्या बोलीतील कथा, कादंबरी, कविता, नाटक आणि इतर साहित्याचा आस्वाद घेणे आणि त्यातील बोलीरूपाचा अनुभव घेणे. अर्थात हे साहित्य त्या अस्सल बोलीतून साकारले असले पाहिजे. अथवा बोलीचे काही अंश त्या साहित्यामधून व्यक्त झाले असले पाहिजे. आपला बोली अभ्यासाचा हा तिसरा मार्ग आहे. आपल्याला दहा आगरी कथांमधून आगरी बोलीचे रूप कसे अवतरले आहे. हे अभ्यासायचे आहे आणि हाच या घटकाचा हेतू आहे. त्यानंतर बोलीच्या अनुषंगाने कथांमधून आगरी समाज संस्कृतीचा परिचय करुन घ्यावयाचा आहे.

अर्थात बोलींचा जिंवत आणि रसरशीतपणा मौखिक रूपातच योग्यरित्या अनुभवास येतो. या सर्व कथा लिखित स्वरूपात असलेल्याने त्या पूर्णपणे बोली रूपाची ओळख करुन देतीलच असे नाही. तरीही आपल्याला बोलीचा परिचय या कथांतून होईल. आगरी बोलीच्या सैद्धांतिक विवेचनातून तुम्हाला आगरी बोलीचा परिचय झाला असेलच. या कथांतून तुम्हाला संदर्भासहित आगरी शब्द, शब्दबंध, वाक्यबंध, वाक्प्रयोग आणि म्हणी यांचा परिचय होईल. विशिष्ट प्रदेशाचा, तिथल्या भौगोलिक घटकांचा, सभोवतालच्या पर्यावरणाचा परिणाम त्या बोलीवर होत असतो. आपल्या आत्मविष्कारासाठी तो निसर्गातील घटकांचा, त्यातील प्रक्रियांचा आधार घेतो. याचेदेखील ज्ञान होईल. सर्व बोलींची काही समान वैशिष्ट्ये तशी आगरी बोलीची कोणती वैशिष्ट्ये आढळतात याचा अभ्यास आपल्याला करता येईल. यातून तुमचा बोलीविषयक दृष्टिकोन समृद्ध होण्यास मदत होईल.

अभ्यासक्रमासाठी लावलेल्या दहा कथाकारांचा आगरी बोलीतील अविष्कार आहे. अभिव्यक्तीसाठी बोली समर्थ असतात त्या अशुद्ध नसतात. प्रमाणभाषांपेक्षा त्या जास्त स्वाभाविक आणि नैसर्गिक असतात. हा अनुभव आपल्याला सदर अभ्यासात येईल. आपणही आपल्या बोलींतून साहित्य निर्मिती करण्याचा प्रयत्न या अभ्यासपात्रिकेच्या अभ्यासानंतर करु शकता. यामुळे तुमच्याही बोलीचा सन्मान वाढेल. तिच्या जतन आणि संवर्धनात हातभार तुमचा हातभार लागेल. आज जगभरातल्या अनेक बोली मरत आहेत. काही बोली भाषा मरणाच्या उंबरठ्यावर आहेत. जो साहित्यिक आपलं साहित्य बोलीतून अविष्कृत करतो ही कृती बोलींच्या संवर्धनास खूप उपकारक ठरत आहे. आपण 'आगरातल्या वाटा' (आगरी बोली) शब्दालय प्रकाशन या संपादित ग्रंथातील कथा वाचाव्यात. त्या कथांचा प्रत्यक्ष आस्वाद तुम्हाला घेता येईल.

# १

# कथा : एक साहित्यप्रकार

**घटक रचना :**

१.१ प्रस्तावना
१.२ कथा या साहित्यप्रकाराचा व्याख्या
१.३ कथेचे घटक
१.४ कथा आणि भाषा

## १.१ प्रस्तावना

साहित्याच्या ज्या प्रकारातून तुम्हाला आगरी बोली भाषा समजून घ्यायची आहे त्या साहित्य प्रकाराचा स्थूल परिचय करुन घेणे गरजेचे आहे. साहित्याचे कथा, कादंबरी, कविता आणि नाटक चार प्रमुख प्रकार घडतात. कथा हा साहित्याचा महत्त्वाचा प्रकार होय. गोष्ट सांगणे आणि गोष्ट ऐकणे हा मानवी स्वभाव गुणधर्म आहेत. आपण लहानपणापासून अनेक गोष्टी ऐकत आलो. ऐकत आलेल्या गोष्टींनाही आपण कथा असे सांगतो. या अभ्यासक्रमात जेव्हा आपण 'कथा' असा शब्द वापरतो तेव्हा तो 'गोष्ट' असा घेत नाही. गोष्ट हे कथेचे अतिशय प्राथमिक रूप होय. गोष्ट साधी सरळ असते, गोष्टीतला घटनाक्रम सलग असतो. कथा ही गोष्टीपेक्षा जास्त व्यापक, अर्थाच्या अनेक शक्यता व्यक्त करणारी, एकाचवेळी अनेक आशयविषयांना सामावून घेणारी असते. मानवी जीवनातल्या एका लहानशा पण लक्षणिय घटनेवर कथा आधारित असू शकते. साहित्याचे जे इतर साहित्यप्रकार आहेत त्याच्याशी तुलना करता ही कादंबरी पेक्षा लहान असते. कवितेत विविध भावांच्या अभिव्यक्तीला महत्व असते. एखादी कथा काव्यात्म असू शकते. नाटकात एखादा विषय नाटयमयरित्या अविष्कृत केलेला असतो. लिहिलेल्या नाटकाचा रंगमंचावर जेव्हा प्रयोग होतो तेव्हा त्या नाटकाला पूर्णत्व लाभते. काही कथांचं नाटक अथवा चित्रपटात रूपांतर करता येते.

## १.२ कथा या साहित्यप्रकाराचा व्याख्या

आजवर विविध तहेच्या कथा लिहिल्या गेल्या असल्याने कथेची नेमकी व्याख्या करता येत नाही. कथेच्या स्वरूपाबाबत निष्कर्षात्मक लिहिताना समीक्षक इंदूमती शेवडे म्हणतात, "स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून कथेचे अस्तित अबाधित आहे. तिची पृथगात्मकता कायम राहिली आहे. एक पृथगात्म वाङ्मयप्रकार म्हणून तिची व्यवच्छेदक लक्षणे दोन : एक तिच्यातील अनुभवाची एकात्मता, एकजीनसीपणा, एकविविधता आणि दुसरे या गुणांशी संलग्न असलेले तिचे एक संस्कारित्व."

समीक्षक सुधा जोशी यांच्या मते, 'कथेचे लघुरूप व तिच्या संस्काराची एकता यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत काही विशेष स्वभावतःच येतात. एककेंद्रितता, मितव्यय, संक्षेप, संपृक्तता, काटेकोरपणा, नेमकेपणा हे कथेच्या कलातंत्राचे खास विशेष म्हणता येईल.' नामवंत साहित्यिक, समीक्षक भालचंद्र नेमाडे म्हणतात, 'लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा भाषिक अवकाश पुरविणारा, एकसुरी आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदन देणारा प्रकार आहे.' वरील व्याख्यावरुन आपल्याला असे सांगता येते की, लघुत्व हे कथेचे विशेष आहे. एककेंद्रीत्व, मितव्यय, संक्षेप, संपृक्तता आणि नेमकेपणा ही कथेची आणखी वैशिष्ट्ये होत.

## १.३ कथेचे विविध घटक

कथानक, घटना, प्रसंग, व्यक्तिचित्रण, निवेदन, वातावरण आणि भाषा हे कथा या साहित्यप्रकाराचे विविध घटक होत. 'अनुभावार्थ' किंवा 'कथार्थ' हा कथेचा महत्त्वाचा घटक होय. कथेचा चित्रण विषय हा मानवी जीवन असते. कथेतील कथार्थ हा मानवी जीवनासंबंधी असतो. कथाकाराभोवती एक वास्तव, लौकित स्वरूपाचे जीवनविश्व असते. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर तो कथेत एक कल्पनाविश्व निर्माण करतो. हे विश्व जाणीवेच्या तसेच नेणिवेच्या पातळीवरील असू शकते. कथागत अनुभव हा विविध तऱ्हेचा असतो. वास्तवदर्शी, वास्तवाचा आभार निर्माण करणारे तसेच अद्भुतरम्य, फॅटसीमय असू शकते. 'कथानक' म्हणजे त्या कथेतील मूळ कथा. कथानक हा कथेतील गतिशील घटक असतो. कथानक म्हणजे घटनांचा कथांकित केलेला प्रवाह असेही म्हणता येईल. एखाद्या दहाबारा पानांच्या कथेचे कथानक आपल्याला पाचसहा ओळीत सांगता येऊ शकते. कथानकात पात्रे त्यांचा जीवनप्रवास, घटना, प्रसंग, वातावरण हे सगळे घटक सामावून घेतलेले असतात. कथाकाराला केवळ कथानक सांगायचे नसते त्याला कथार्थाची निर्मिती करायची असते. 'व्यक्तिचित्रण' कथेचा एका मूलभूत घटक होय. व्यक्तिचित्रण म्हणजेच कथेतील पात्राची निर्मिती होय. कथाकार वृत्ती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून विशिष्ट अशा व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा निर्माण करतो. व्यक्तिच्या या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हटले जाते. ही कथागत पात्रे शब्दरूप असली तरी ती आपल्या भोवतालच्या माणसांसारखीच असतात. कथागत पात्राला स्वतःचे विशिष्ट असे भावविश्व आणि व्यक्तित्व लाभलेले असते. कथेतील पात्र निर्मिती करताना कथाकाराला काही मर्यादा येतात. एखाद्या पात्राचा संपूर्ण जीवनप्रवास कथेत चित्रित करता येत नाही. कथेत काही प्रमुख पात्रे तर काही गौण पात्र असतात. निवेदन करणे म्हणजे सांगणे किंवा कथन करणे होय. निवेदन हे कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. कथाकार कथा सांगण्यासाठी एक निवेदक पात्र निर्माण करतो. हे निवेदक पात्र कथेचे संघटन आणि सूत्रसंचलन करीत असते. कथाकाराचा दृष्टिकोन निवेदनातून दिसून येतो. कथा निवेदक कधी कधी सर्वज्ञ, सर्वसाक्षी किंवा केवळ निरीक्षक असतो. 'वातावरण' हा कर्थाथाच्या निर्मितीसाठी क्रियाशील घटक आहे. कथा ही एका विशिष्ट स्थलकालाच्या चौकटीत, एका विशिष्ट भौगोलिक तसेच सामाजिक, सांस्कृतिक परिसरात घडत असते. कथेतील वातावरणाचे प्राथमिक कार्य कथेसाठी एक कल्पित परिसर निर्माण करणे. वातावरणासाठी कथाकार जे तपशील निवडतो त्यामागे कथाकाराचा विशिष्ट हेतू असतो.

## १.४ कथा आणि भाषा

कथा आकारास येते ती भाषेतूनच. भाषेतून अभिव्यक्त झालेली कथा आपल्याला भाषेतूनच कळते. कथेच्या आशय विषयानुरुप भाषा ठरत असते. असे असले तरी लेखक देखील विशिष्ट भाषेची निवड करीत असतो. आपल्या मनातील कथन वाचकांपर्यंत पोहचावे, त्यातून सौंदर्य निर्माण व्हावे म्हणून कथालेखक भाषेचा खुबीने वापर करतो. कथा ज्या प्रदेशात घडते त्या प्रदेशाच्या भाषेचे प्रतिबिंब त्या कथेत पडलेले दिसते. समजा कथा मुंबई परिसरातील उच्चभ्रू वस्तीत घडत असले तर तेथे प्रमाण मराठी, इंग्रजीचा प्रभाव असलेली भाषा आढळेल. कथा महाराष्ट्राच्या विदर्भ भागातली असेल तर त्या कथेवर वैदर्भी भाषेचा प्रभाव दिसेल. कथेतील भाषेवर प्रदेश या घटकाचा प्रभाव जसा पडतो तसा काळाचाही प्रभाव आढळतो. कथेतील पात्राचे लिंग, वय, स्वभाव, पद यांचाही प्रभाव भाषेवर असतो. या उलट कथेच्या भाषेकडून आपण कथेच्या अंतरंगापर्यंत पोहचू शकतो. आतापर्यंत मराठी साहित्यात प्रमाणभाषांचाच वापर झालेला आढळतो. त्यातही निवेदनासाठी प्रमाणभाषेचा वापर आणि पात्रांचे संवाद त्या पात्राच्या बोलीप्रमाणे हे सूत्र अनेक लेखकांनी अवलंबिले आहे. काही लेखकांनी बोली भाषेचा वापर केलेला आहे.

❖❖❖❖

# २

# आगरी कथा

**घटक रचना :**


२.१ प्रस्तावना

२.२ साकव - परेन जांभळे

२.३ मॉल - प्रा. शंकर सखाराम

२.४ म्हारत्याचा तेरावा - मोहन भोईर

२.५ बेमट्याचा बेरा - चंद्रकांत पाटील

२.६ भगताचा उतारा - हरिभाऊ घरत

२.७ वादळ - वासंती ठाकूर

२.८ निर्वणुका - अे.डी. पाटील

२.९ जोल - डॉ. अविनाश पाटील

२.१० जाण - गजानन म्हात्रे

२.११ शालन जावाचं हाय - प्रा. जयवंत म्हात्रे


## २.१ प्रस्तावना

शदत कथा वेगवेगळ्या विषयाच्या आणि आशयाच्या दहा कथाकारांच्या या दहा कथा आहेत. कथांचे विषय आशय थोडक्यात खालीलप्रमाणे.

## २.२ साकव - परेन जांभळे

परेन शिवराम जांभळे यांच्या ‘बिलोरी’ या कथासंग्रहातून साकव ही कथा घेतली आहे. साकव म्हणजे लाकडाचा पुल. भालपाडा आणि बोरीगाव ही दोन गावे हाकेच्या अंतरावर आहेत. या दोन गावामधून चिरनेरची खाडी वाहते. या दोन्ही गावांना एकमेकांशी एका साकवाद्वारे संपर्क साधता येतो मात्र पुरामुळे हा साकव नेहमी कोसळतो त्यामुळे दोन्ही गावाचा संपर्क तुटतो. बोरीगावातील गावकरी या साकवाच्या ऐवजी नवा पक्का पुल बांधला जाईल आणि आपले हाल संपतील या स्वप्नांमध्ये जगत असतात. स्थानीक राजकारणामुळे पुलाचं काम होत नाही. मात्र एके दिवशी गावातले शिक्षक आनंदाची बातमी घेऊन येतात की, बोरीकर गावाचे हाल संपणार, गावाच्या खाडीवर सिमेंट कॉक्रिटचा लांब आणि रूंद पुल होणार, गावात एस.टी येणार... कारण गावातल्या विलास नावाच्या इंजिनियरच्या प्रेमात मुख्यमंत्र्याची मुलगी पडली आहे. या नव्या नात्यामुळे जावयाच्या गावात सोयीसुविधा होणार. गुरुजीच्या या बातमीमुळे गावकरी आनंदीत होतात.

## २.३ मॉल - प्रा. शंकर सखाराम

शंकर सखाराम यांच्या 'शिकार' या कथासंग्रहातील ही कथा आहे. मूळची घणसोलीची आणि लग्नानंतर कोपरखैरणेची रहिवासी झालेली राघूवायची ही कथा. राधूवायच्या नवऱ्यानं आपली जमीन विकली. त्या पैशावर मौजमजा केली दारू प्याली आणि तो राधूवाय आणि तिची दोन मूलं यांना सोडून स्वर्गवासी झाला. राधूवायचा नवरा नामदेव मेल्यानंतर राधूवायकडे केवळ राहतं घर आहे. आपली दोन मुलांची पोटापाण्याची व्यवस्था लागण्याकरिता ती परप्रांतीयांकडे धुणीभांडी करण्याचं काम करते. "शेतकरणीची झाली मोलकरीण" अशी तिची अवस्था होते. तिच्याच जमिनीवर उभ्या राहिलेल्या हॉटेल मध्ये चिकन पुरविणारा सईदया तिला चावलाच्या (तांदळाच्या) भाकरी व्यवसाय मिळतो. या भाकरी ती चुलीवर भाजते म्हणून तिला सरपणासाठी लाकडे लागतात. ही लाकडे ती जवळच्याच डंपिंग ग्राऊंडवरुन गोळा करते. मात्र अचानक सईदया भाकरी नेण्याचे बंद करतो. सईदयाच्या हॉटेलमध्ये लागलेला तिचा मुलगा त्याचा पगारही बंद होतो. तिला सईदया भेटतो. तो तिला सांगतो की याच जागेवर आता मॉल उभा राहणार आहे. त्याच्याही रोजीरोटीवर गदा येते आणि राघुबायचं रूळावर आलेलं जगण पुन्हा कोलमडतं.

## २.४ म्हारत्याचा तेरावा - मोहन भोईर

मोहन भोईर यांच्या 'म्हारत्याचा तेरावा' या कथासंग्रहातील ही कथा. म्हारत्या पाटलाच्या तेराव्यासाठी म्हणजेच त्याच्या पिंडदानासाठी तळयाकाठच्या पारावर सगळा गाव जमला आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्याने तेराव्याच्या विधी करायला आलेला भटजी घामाने डबडबलेला आहे. सगळी माणसे उन्हाने हैराण झाली आहे. विधी होईपर्यंत गावातील विविध प्रवृत्तीची माणसे वेगवेगळ्या विषयांवर गप्पा मारतात, चर्चा करतात, वाद घालतात त्यातून गावाच्या अंतरंगाचे दर्शन आणि माणसांचे दर्शन घडविणे हा या कथेचा हेतू आहे. म्हारत्याच्या तेरावा बाजूला राहतो आणि हे सगळे गावकरी आपली गप्पांची भूक भागवतात. चांग्या काथोर, इकठ्या डोकरा, सख्या पाटील, डोलं मिटक्या वासू, पांड्या दूधवाला, बुद्ध्या डोकरा, वाल्या मेस्त्री, काल्या सरपंच, कालाराम्या, शिन्या डोकरा सर्व पात्रे कथेत आहेत. यांच्या गप्पांतून अनेक हेवेदावे, उखाळ्यापाखाळ्या, रागरूसवे, गावातील अनैतिक संबंध त्यांच्या संवादातून बाहेर येतात. अनेकांचे स्वभावधर्म त्यातून कळतात. त्यात पिंडाला कावळा शिवत नाही म्हणून सर्वजण अनेक प्रयत्न करतात. कावळा शिवल्यावर सर्वजण जेवायला निघून जातात. रूढ असे कथानक या कथेला नाही. ही कथा गावगजालीच्या स्वरूपाची आहे.

## २.५ बेमट्याचा बेरा - चंद्रकांत पाटील

बेमट्या नावाच्या एका एकाकी पडलेल्या वृद्धाची ही कथा आहे. तो गावापासून दूर एका वेऱ्यात राहतो. मात्र बेमट्या तेथला राजा आहे. त्याचा हा वेरा समृद्ध आहे. वेरा म्हणजे वेडा जनावरांसाठी शेतावर बांधलेला गोठा. त्याच्या सभोवताली सर्व प्रकारच्या भाज्या आणि फुलझाडे आहेत. एक तलय (छोटं तलाव) आहे. असे असले तरी तो दुःखी आहे. त्याची तीन मुले आता त्याच्याजवळ नसतात ती लग्न करुन बोरी गावात राहत आहेत. बेमटयादाची सारी संपत्ती त्यांच्या मुलांनी फुकून टाकलेली असते. मुलांच्या बायकांनी कमलू बायचे म्हणजेच बेमट्याच्या पत्नीचे खूप हाल केले. मुलं दारुडे निघाले या त्रासाने बेमट्या आत्महत्या करायला निघाला परंतू कमलूबायने त्याला आधार दिला. आता पत्नी वारल्यामुळे तो एकटाच त्याच्या वेऱ्यात राहत

असतो. त्याच्या सोबतीला त्याचा येशा नावाचा कुत्रा आहे. त्याने म्हैशीदेखील पाळल्या आहेत. तो स्वतः जेवताना त्याला आपल्या पत्नीची आठवण येते म्हणून तो तिच्या नावानं घास बाजुला काढून ठेवतो. मासे पकडणे आणि ते वाळवून ठेवणे हा त्याचा व्यवसाय आहे. त्याच्या नशिबी खूप मासे आहेत. बेमट्या श्रद्धाळू आहे. आकादेवी ही त्याचे मातेसरी आहे तिच्यावर त्याचा विश्वास आहे. अध्यात्मात त्याला गोडी असून पोथ्यापुराणे त्याला पाठ आहेत. वेगवेगळ्या सणावारांना त्याला गावातून अध्यात्म वाचायला बोलविले जाते. त्याला 'वाच्या' अशा शब्दप्रयोग कथेत वापरला आहे. तो अध्याय वाचायला रिकाम्या हाती जात नाही तर जाताना भाजी आणि दूध घेऊन जातो. इतरांना भरभरुन देणे हा त्याचा स्वभाव आहे. आपली मुलं अशी का निघाली याची मोठी खंत त्याच्या मनात आहे. एके दिवशी तो मंगल्या नावाच्या मित्राकडे अध्याय वाचायला जतो. वेऱ्यापाशी येताना त्याच्या पायाला साप दंश करतो. देवीचा धावा करीत बेमट्यादा आपल्या मांडीला फडक्याची दोरी करुन घट्ट बांधतो. दंशाच्या ठिकाणी आणखी घाव करतो. आपल्याला उल्टी व्हावी म्हणून खाडीच्या किनाऱ्याची रेव (चिखल) खातो. येश्या कुत्र्याच्या आवाजाने पाचसहा गावकरी येतात आणि डोली करुन बेमट्यादाला मंगल्याकडे घेऊन येतात. कोंबड्या गोळा केल्या जातात. या कोंबड्यांचे गुद्दवार दंश केलेल्या जखमेवर लावले जाते. एकेक करुन अशा एकवीस कोंबड्या मरतात. (कोंबड्या आपल्या गुद्दवारे ते विष खेचून घेतो अशी पारंपरिक समजूत आहे.) बेमट्याच्या जीव वाचतो. त्याची तीन मुलं तेथे येतात. सगळं गाव त्यांना दूषणं देतं. ती मुलं त्याची माफी मागतात. बेमट्याच्या मित्र त्याला सल्ला देतो की आता तू एकाकी बेऱ्यात राहू नकोस. नवे बोरीगावात आपल्या मुलांकडे राहा. गोकुळात राहा. मंगल्यादा आणि बेमट्यादा आपल्या भावासारख्या मैत्रीपुण नात्यामुळे दोघांनाही अश्रू अनावर होतात. या कथेतून चंद्रकांत पाटील यांनी समृद्ध अशा ग्रामजीवनाचं आणि त्यासोबत कृषिसंस्कृतीचं दर्शन घडविले आहे.

## २.६ भगताचा उतारा - हरिभाऊ घरत

सन २०१० साली प्रकाशित झालेल्या हरिभाऊ घरत यांच्या 'हळद रूसली' या कथासंग्रहातील ही कथा आहे. तुकाराम घरत चिरलेगावचा रहिवासी आहे. तो कस्टममध्ये शिपाई म्हणून कामाल आहे. मूळचा तो भेंडखळ गावचा मात्र चिरले गावातल्या रामदास पाटलांनी त्याला आपला घर जावई करुन घेतला आहे. तेव्हापासून तो चिरले गावचा रहिवासी झाला आहे. तुकाराम स्वभावाने खमक्या आणि विनोदी आहे. दिसरात दारू पिण्याची सवय असली तरी तो अंधश्रद्धेच्या विरुद्ध आहे. भूत खवीस यावर त्याचा अजिबात विश्वास नव्हता. भगत हे त्याचे आडनाव आहे असा खुलासा कथालेखकाने केला आहे. कारण गावाकडे भूतपिशाच्च यांना दूर करणाऱ्या मांत्रिकाला भगत असे म्हटले जाते. एकदा तुकाराम डोंगरात आपल्या संगत्यासोबत सशाची शिकार करायला डोंगरात गेला. डोंगरातल्या एका जाळीत व्यालेली डुकरीण होती. ती बिथरली आणि घोळक्याच्या अंगावर धावून आली. सगळे पळाले मात्र तुकाराम तेथेच उभा राहिला. सर्व जण घाबरले. मात्र तुकारामाने त्या डुकरिणीला हूल देऊन दरीत पाडले. असा तुकाराम खमक्या होता. या कथेत एक येताळ बाबा आहे. बाबाने पंचक्रोशीत आपला दबदबा बनविला आहे. त्याने गुमटाच्या आकाराचं आपलं ठाणं वसवलं आहे. तेथेच त्याने आपला दरबार भरवितो, लोकांची फसवणूक करतो.

एके दिवशी तुकारामाचा सदानंद नावाचा मेव्हणा आजारी पडतो. त्याला दम्याचा आजार होता. दिवसेंदिवस त्याची तब्येत खालावत जाते. त्याचा सासरा त्याला दवाखान्यात नेण्याऐवजी येताळबाबाकडे नेण्याचे ठरवितो. तुकाराम त्याला विरोध करतो मात्र सासरा त्याला जुमानत

नाही. लोकांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेणाऱ्या आणि आपला स्वार्थ साधणाऱ्या येताळबाबाचं ढोंग उघडकीस आणण्याचे तुकाराम ठरवितो. तुकाराम स्वतःच भूत बनतो आणि येताळबाबाला स्मशानात बांधून ठेवतो. येताळबाबाचे ढोंग उघडे पाडतो. कथेतून तुकाराम भगताचं साहस आणि गावाकडील अंधश्रद्धा आणि बाबाबुवांच्या प्रभावाचे दर्शन घडते.

## २.७ वादळ - वासंती ठाकूर

वासंती ठाकूर यांच्या 'गजरा' कथासंग्रहातील ही कथा आहे. मंजुळा नावाची स्त्री या कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. तिचं माहेरच गाव सावरगाव आणि सासरचं गाव नवघर आहे. तिच्या पतीचं नाव नारायण आहे. मुलाचं नाव प्रकाश असून तो शिक्षण घेत आहे. नवऱ्याला दारुचं व्यसन आहे. मंजुळाच्या माहेरची जमीन प्रकल्पात गेली आहे. त्यातून मिळालेल्या पैशातला वाटा मंजुळाने आणावा म्हणून नारायण तिला आग्रह करीत आहे, तिचा छळ करीत आहे. अखेर मंजुळा आपल्या वाट्याचे दहा हजार रूपये आणते आणि त्याचे विकासपत्र खरेदी करते. साडेपाच वर्षात त्याचे वीस हजार रुपये होतात. या वीस हजारातून दहा हजारात ती घर सुधारते आणि उरलेले दहा पोष्टात ठेवते. पण नारायणचं म्हणणे असते की भावांना अजून दहा हजार दिले पाहिजेत. पोष्टातले पैसे दोघांच्या संसाराला कामी आले असते मात्र नारायण भेंडखळच्या कंपनीतल्या चोरी प्रकरणात पकडला जातो. त्याला सोडविण्याकरिता ते दहा हजार वापरले जातात. नारायण मंजुळाला आपल्या माहेरी पाठवत नाही. तिचा छळ करतो तिला शिव्या देतो. यातून प्रकाश आणि नारायण यांच्यात भांडणे होतात. बापाच्या या कटकटीला कंटाळून प्रकाश आपल्या मामाकडे निघून जातो. ज्याच्यावर मंजुळा आशा लावून बसली आहे तोच निघून जाणे याचे मंजुळाला दुःख होते. माहेर विषयक वाटणारा जिव्हाळा, प्रकाशचे निघुन जाणे आणि नारायणने केलेला छळ या कोंडीत सापडली आहे.

## २.८ निर्वणुका - अे.डी. पाटील

ए.डी. पाटील यांच्या 'सापान' या कथासंग्रहातील ही कथा आहे. ग्रामपंचायत निवडणूकाचं वातावरण असलं की गावातील अनेकांच्या वृत्तीप्रवृत्ती दिसून येतात. या कथेतील खरीडे गावात दोन महिन्यावर निवडणूक आली आहे. गावामध्ये गोपाल नावाचे शिक्षक त्यांच्या मनात गावात बिनविरोध निवडणूक झाली पाहिजे. यासाठी गावातील प्रत्येकाला आपला विचार पटवून देण्याचा प्रयत्न करतात. यावर विचारविनिमय करण्यासाठी श्रीकृष्णाच्या मंदिरात सभा बोलाविली जाते. दहा वाजेपर्यंत सगळे गावकरी जमतात. गावातील दामूशेठ बिनविरोध निवडणूका लढविण्याचं आवाहन सभेला करतात. राम्याचा किसना याला विरोध दर्शवितो. दरवर्षी तेच तेच उमेदवार नको नवे उमेदवार असतील तर बिनविरोध निवडणूका करु, असे सगळ्यांचे म्हणणे असते. या प्रमाणे म्हादयाशेठ या मताला आपलं सावध समर्थन देतो. पण गावात कोणत्या पक्षाला किती उमेदवार द्यायचे असा प्रश्न उपस्थित होतो. गावात आता चार पक्ष आहेत. गेल्या निवडणूकीत ज्या तीन पक्षाला जास्त मत मिळाली त्यांनी महिला आणि पुरुष असे प्रत्येकी दोन उमेदवार द्यायचे आणि चौथ्या पक्षाने एक महिला उमेदवार द्यायचा, असे सर्वानुमते ठरते. यानंतर आठवडे दोन आठवडे निघून जातात. निवडणूक बिनविरोध होऊन ग्राम विकास आघाडी स्थापन होते. गावाला मिळालेल्या निधीतून गावात सुधारणा होतात. ए.सी. झेडला विरोध करुन हाकलून लावले जाते पण खरीडे गावच्या हद्दितील जमीनी दलाल चढ्या किंमतीने विकत घेतात. या जमिनीवर भराव करण्यासाठी ग्रामपसंचायतीची एनओसी घेण्याकरिता

सभासदाना लाखो रुपये मिळतात. हे पैसे ग्रामपंचायतीत जमा होतात. पुढच्यावेळी तशीच बिनविरोध निवडणूक होते. पुन्हा याच मार्गानी पैसा खाल्ला जातो. अखेर गावाला उपरती होते. "केला काय नं झाला काय" असे सगळेजण म्हणतात. आता आपण निवडणुका लढवूनच दाखवायच्या या निर्णयापर्यंत सर्व जण येतात.

## २.९ जोल - डॉ. अविनाश पाटील

अविनाश पाटील यांचे 'सार्थक' आणि 'शंकरपट' असे दोन कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यातील 'शंकरपट' या संग्रहातील ही कथा आहे. त्यांच्या काही कथा आगरी संस्कृती आणि आगरी बोली अभिव्यक्त करणाऱ्या आहेत. 'जोल' ही कथा आगरी कृषिसंस्कृतीशी निगडित आहे. जोल म्हणजे एकत्रित येऊन श्रमदान करणे होय. आगरी लोकांची वस्तीच समुद्रकिनारी, खाडीलगत आहे. त्याची भातशेती ही समुद्रकिनारच्या आगरात असते. समुद्राचं पाणी खाडीतून या आगरात शिरू नये म्हणून बांधबंदस्ती करावी लागते. उधाणाचं पाणी शेतात शिरलं तर शेतजमीन नापीक होऊ शकते. समुद्र खाडी आणि शेती या मधला पाणी अडविणारा जो बांध असतो तो मातीने गावकऱ्यांच्या श्रमदानातून मजबूत केला जातो. यासाठी सगळं गाव एकत्रित येऊन श्रमदान करतं त्यालाच जोल असे म्हणतात. या कथेचं शीर्षक ही 'जोल' असे आहे. डोलवी दबावाची खलाटी / खार. ही खलाटी दहा बारा गावाचं पोषण करते. अतिशय इमाने इतबारे या खलाटीची काळजी पद्माकर खारपाटील घेतो. उधाणाच्या काळात बांधाला नेरू (बीळ) पडल्यास पेंड (मातीचे गोळे) टाकून उधाणाचं पाणी आत शिरून देत नाही. मात्र ही जमीन सरकार आता सीआरझेड कायद्या अंतर्गत सरकार हस्तगत करणार आहे. ही बातमी पद्मा आणि बाळ्या वाचून दाखवितात. या बातमीने सर्वचजण चिंताग्रस्त होतात आणि होणाऱ्या परिणामांची चर्चा करतात.

## २.१० जाण - गजानन म्हात्रे

'जाण' ही कथा गजानन म्हात्रे यांच्या 'तर्क-वितर्क' या कथासंग्रहातील आहे. ऑक्टोबरच्या तप्त उन्हात असगर चाचा बांगड्या विकायला गावात येतो. त्याच्या अंगात ताप असून तो अपरिहार्य पणे बांगड्या विकावयास गावात आला आहे. गावात सगळेजण त्याची आपुलकीने चौकशी करतात. मूळात त्याला सगळेजण 'चाचा' असे संबोधतात हेच गावातील लोकं आणि असगर चाचा यांच्यातील प्रेमाच प्रतीक आहे. "बॅऽऽगलवालाऽऽऽ!" अशी हाकाटी देत तो श्रावण पाटलाच्या अंगणात जाऊन बसतो. अंगात ताप असून आणि तोंडाची चव जाऊन देखील केवळ पाटलाच्या आग्रहास्तव मासली भाकर खातो. तोवर तेथे आलेल्या पाटलाच्या जावयाला पाहून चाचाला घाम फुटतो, त्यानंतर पाटलीणबाईच्या सोबत घरातून बाहेर आलेल्या प्राजक्ताला पाहून चाचाला घेरी आल्यासारखे वाटते, चाचाच्या घशाला कोरड पडते. त्याला प्रश्न पडतो की 'प्राजक्ता अजून जिवंत असणे कसं शक्य...' चाचा प्राजक्ताच्या हातात चुडा भरतो. पैसे न घेता काही न बोलता भराभर निघून जातो. प्राजक्ता आणि चाचा यांच्यात सख्या बापलेकी सारखं नातं आहे. 'हाळदीला तिला चुडा भरताना चाचा लहान मुलासारखा मुसमुसत रडला होता.' चाचाने पैसे घेतले नाही ही गोष्ट जावई सोमनाथला खटकते. पुन्हा माघ महिन्यात चाचा तो प्राजक्ताच्या घरी येतो. सोमनाथ पैसे देऊ पाहतो पण चाचा पैसे घेत नाही. या गोष्टीचा राग येऊन सोमनाथ प्राजक्ताच्या थोबाडीत मारतो. हे प्रकरण सरपंचापर्यंत जाते. तेव्हा चाचा 'प्राजक्ता मेरे बच्चीसमान है' असंही म्हणतो. सरपंचाने चाचाला गावात यायला बंदी घातल्याने

तो खरी हकीगत सांगतो. चाचा नागपंचमीला गावात आला असताना, गवताची मोळी घेऊन चालेलल्या बाईच्या मानेवर त्याच मोळीत बांधलेला साप चावतो. ती बाई प्राजक्ता असते. तिला अजून जिवंत बघून चाचाने पैसे घेतले नाही. हे सत्यकथन केल्यावर सोमनाथ शरमिंदा होतो. ही गोष्ट प्राजक्ता ऐकते आणि काळीनिळी पडून मरते. गावातला तांबड्या नावाचा मांत्रिक आणला जातो. त्याच्याने जिवंत करणे शक्य न झाल्याने डॉक्टरचा आणलं जातं. डॉक्टर त्याचे स्पष्टीकरण देतो. 'ही अपवादात्मक मानसशास्त्रीय केस आहे. याला 'गट फ्लोरा सिंड्रोम' असे म्हटले जाते. आपल्या शरीरातील पेशींमध्ये अशी काही क्षमता असते की अजाणतेपणाने आपल्या शरीरात विष गेले तरी त्याचा परिणाम होत नाही. पण त्या माणसाला काही दिवसानंतर दंशाबाबत ठोस माहिती झाल्यास त्याची बाधा होऊ शकते. प्राजक्ताची केस या प्रकारची आहे.' सोमनाथ असगर चाचाचे पाय पकडतो आणि माफी मागतो. कथा येथे संपते. सोमनाथच्या मनात गैरसमज जर झाला नसता तर चाचाने ही गोष्ट सांगितली नसती. प्राजक्ताचही वाचली असती.

## २.११ शालन जावाचं हाय - प्रा. जयवंत म्हात्रे

प्रा. जयवंत पाटील यांचा 'तरी सुद्धा जगायचंय' या पहिल्याच संग्रहातील ही कथा आहे. मुंबईतल्या कुर्ला स्टेशनच्या पूर्वेकडील झोपडपट्टीत राहणारा मुलगा आहे. तो कुर्ला सिग्ननला लिंबू-मिरची विकण्याचे काम करतो. त्याच्या सावळ्या रंगामुळे त्याला सर्वजण 'काल्या' म्हणतात. त्याच्या आईचं नाव राधा आणि वडिलांचे जनार्दन आहे. काल्याला त्याच्यासह नऊ भांवडे असून काल्या हा खूप मेहनती आहे. घरात अठरा विश्वे दारिद्रय असल्याने काल्याला काम करावे लागते आहे. लोकांच्या श्रद्धेवर त्याचे कुटुंब पोट भरते. तो महानगरपालिकेच्या शाळेत सातवीत शिक्षण घेत आहे. मात्र या व्यवसायामुळे त्याची शाळा बुडते. वर्ष संपल्यानंतर सगळ्यांचा निकाल लागतो. सगळे आनंदात असताना काल्या निराश होतो. त्याला जेवण गोड लागत नाही. तो पुन्हा शिकण्याचा निर्धार करतो. नाईट शाळेत जाण्याचा निर्धार आपल्या आईला सांगतो. आईच्या होकाराने तो खूष होतो. आईला तो सांगतो, "आयं, आता दोन मयनं रात शाला सुरु व्हवाला. दोन मयनं लय काम करीन. तुला कालजी कराचा काम नाय. वह्या, पुस्तकांचा बंदोबस्त करीन. फीची बी फिकीर करु नको." दोन महिने काल्या जीव तोडून मेहनत करतो. जून महिन्यातल्या पाऊस पडतो. मुंबईला झोडपून काढलं जातं. त्यात काल्याची झोपडी देखील गळू लागते. घरात रात्रभर झोपायला जागा राहत नाही. पहाटे त्याला झोप लागते. सकाळी तो उशिराने उठतो. आज शनिवार धंद्याचा वार असल्याने तो लगबगीने सिग्नलला पोहोचतो. मात्र तो एका टॅक्सीखाली येतो. त्याचा अपघात होतो. रक्ताच्या थारोळ्यात असलेल्या काल्याला हॉस्पीटलमध्ये नेत असताना स्ट्रेचरवरुन तो आपल्या आईला तुटकपणे म्हणतो, "आयं मला शालन जावाचा हाय". काल्याची प्राणज्योत मालवते. त्याचं स्वप्न अपूर्ण राहातं.

अशा प्रकारे या दहा कथा आगरी समाजजीवन, आगरी समाजाचा प्रदेश, त्यांची संस्कृती, श्रद्धा समजुती, त्यांच्या जीवनमानात झालेले बदल चित्रित करतात.

❖❖❖❖

# ३

# आगरी कथांचे स्वरूप, भाषिक आणि सामाजिक सांस्कृतिक वैशिष्ट्ये

**घटक रचना :**


३.१ प्रस्तावना

३.२ आगरी कथांचा आशय विषय

३.३ आगरी कथांतील बोली

३.४ आगरी कथांतील वाक्प्रयोग आणि म्हणी

३.५ आगरी कथांतील आगरी बोलीचे नमुने


## १.१ प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो आपणांस या घटकामध्ये आगरी कथांचे स्वरूप समजून घेत असताना भाषिक आणि सामाजिक वैशिष्ट्याचा ही आापणास विचार करावा लागणार आहे. साधारणपणे आगरी कथा या पेण, पनवेल, रायगड, ठाणे या परिसरात घडत असताना आपणास दिसुन येत असते. कारण आगरी समाज हा या पारिसरात फार मोठ्या प्रमाणात वसलेला आहे. आगरी समाजाच्या रूढी परंपरा, चालीरिती, श्रद्धा अंधश्रद्धा तसेच आगरी समाजाला भेडसावणारे ज्वलंत प्रश्न त्यांची लग्नविधी वेगवेगळ्या हिन्दु सणावळ्या त्या समाजात फार मोठ्या प्रमाणात सादर करताना दिसुन येते. म्हणूनच या सर्व विचारसरणीचा प्रभाव हा आागरी साहित्यावर पडला असल्याचे दिसते. त्यातूनच आपल्या एस.वाय.बी.ए. च्या पेपर क्र.३ मधील सेम चार मध्ये आपणास काही आगरी कथाचा खालील प्रमाणे अभ्यास करणार आहोत.

## १.२ कथा या साहित्यप्रकाराचा व्याख्या

वरील पैकी आगरी कथा पेन, पनवेल, रायगड, ठाणे या परिसरात घडतात. आगरी समाज संस्कृतीचा वर्तमान आणि भूतकाळ या कथांतून साकारला आहे. आगरी समाजाचे जीवन, त्यांच्या सभोवतालच्या परिसर, श्रद्धा अंधश्रद्धा, चालीरीती, समाजात होणारे परिवर्तन, त्यांना भेडसावणारे प्रश्न या कथातून साकारले आहेत. या कथांतून सूक्ष्म जनमानस व्यक्त होते. आगरी समाज हा पूर्वी पासून आगरात भातशेती करणारा आणि खाडीभागातील मासेमारी करणारा समाज याचेही प्रतिबिंब या कथांतून उमटले आहे. आगरी कृषी संस्कृतीची वर्तमान स्थिती कथांतून दिसते. 'जोल' सारख्या कथेत पद्माकर खारपाटील यांच्या सारखी कृषिसंस्कृतीवर जिवापाड प्रेम करणारी माणसे दिसतात. समुद्राचं पाणी शेतजमीनीत शीरु नये

म्हणून शेतजमीनींनसभोवती बांध घालावा लागतो. हे काम जिकरीचे आणि श्रमाचे असते. सगळा गाव एकत्र जमून हे काम करतात. या श्रमदानाला 'जोल' असे म्हणतात. श्रमकऱ्यांना 'जोले' असं म्हणतात. जोलासाठी आलेली माणसे एका नव्या प्रश्नाला सामोरी जातात. डोलवी दबावाची खार जमीन सीआरझेड कायद्या अंतर्गत सरकार ताब्यात घेणार आणि तीचं अस्तित्व नामशेष होणार या चिंता सर्वांना लागून राहते. यासाठी जोल कथेतील खालील उतारा... 'सारे जोले पुढे काय होणार यांची चित्र रंगवीत होते. धनदांडगा शेट इथल्या दलालांना नोटांचे तुकडे टाकून विकत घेऊ लागला होता. सर्वत्र तीच चर्चा चालू झाली होती. नांदत्या गोकुळासारख्या गावाची, सुजलाम सुफलाम खलाटीची राखरांगोळी केली जाणार होती. एक कृषी संस्कृती गाडली जाणार होती. इतिहास पुसला जाणार होता.' यातून शेतकऱ्यांची बैचेनी दिसून येते. मुंबई, नवी मुंबई आणि त्यानंतर सरकार आता तिसरी मुंबई लादण्याचा सरकार प्रयत्न करते आहे. असा उल्लेख 'जोल' सारख्या कथांतून येतो. या सोबत परप्रांतीयांचे आक्रमण आणि त्यांची मुजोरी आपल्याला सहन करावी लागेल, 'मुवै तुमची न् भांडी घासा आमची!' अशी अवस्था होईल याची भीतीही कथेत डोकावते. आपण देशोधडीला लागू याची जाणीव सर्वांना होते.

शेती कसणे आता जिकीरीचे होऊन बसले आहे. मजुरांच्या मजुऱ्या महाग, खताच्या गोणी महाग, औषधपाणी आणि बियाणे देखील महाग झाली आहेत. लावणी पासून कापनीपर्यंतचा हिशोब केल्यास काहीही मिळत नाही. हे वास्तव देखील या कथांमधून डोकावते. त्याची खंत ते व्यक्त करतात. मात्र वाडवडिलांची जमीन ओसाड कशी टाकायची या भावनिक प्रश्नात ते गुंतले आहेत. बऱ्याच जणांना ते जुनेच दिवस आहेत. तेच दिवस चांगले होते असे त्यांना वाटते. यासोबत गाव, गावातील माणसे, त्यांच्या सौहार्द आणि वैमनस्य, एकमेकांची काळजी या सर्व गोष्टी काही कथांतून प्रकटल्या आहेत.

मुंबई मायानगरीने आपली दुसरी नगरी वसवली ती म्हणजे नवी मुंबई. सिडकोने मातीमोल भावाने अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या. तिथे सिमेंटची जंगल उभी राहिली. तिथे पिकणारे भात आणि मीठ संपुष्टात आलं. ज्या लोकांनी आपल्या आयुष्यात मुबलक पैसा पाहिला नव्हता त्यातील काही लोकांनी हा पैसा दारुवर उडवला. दारुच्या आहारी जाऊन स्वतःच जीवन संपवलं. त्यांच्या बायकांना त्याच जागेत उभ्या राहिलेल्या परप्रांतीय माणसांच्या घरी मोलकरणीचं काम करावं लागलं. जमिनी विकल्यावर आजुबाजुला ज्या उंचच उंच इमारती निर्माण झाल्या. त्यात तिथला मूळचा रहिवासी एकाकी पडला, त्याची घुसमट झाली. ही शोकांतिका 'मॉल' कथेतून दिसते. जमिनींचा भाव आल्यावर आणखी एक गोष्ट घडली, नातेसंबंधात दुरावा निर्माण झाला. भावबहिणींमध्ये भांडणे निर्माण झाली. अनेकांनी आपल्या पत्नीचा वाटा मागितला. पत्नीच्या नावे आलेले पैसा दारुत उडवला. आपली पत्नी पैसा आणत नाही म्हणून तिचा छळही करण्यात आला. याचे दर्शन वासंती ठाकूर यांची 'वादळ' कथा घडविते.

नवी मुंबई या परिसरात औद्योगिक कंपन्या आल्या. औद्योगिक कंपन्यांकडून पुढारी लोकांनी, नेतेमंडळीनी स्वार्थापोटी हप्ते, देणग्या घेतल्या. कंपन्याना प्रदूषण करण्यास वाव मिळाला. प्रदूषणाची देणगी या परिसराला मिळाली. आपल्या नातलगाचा नोकरीत भरणा केल्याने कंपन्यांच्या प्रदूषणाला पुढारी लोकांनी, नेतेमंडळींनी जराही विरोध केला नाही. खाड्यांचा परिसर प्रदूषित झाला. परिसराची रया गेली. कंपन्यांच्या येण्याअगोदर मिळणारे मासे मिळणे बंद झाले. सर्वसामान्यांची ही खंत या कथांमधून येते. औद्योगिक कंपन्या आणि पर्यटन यांच्या मुळे जागाजमीनींना अचानक भाव आला. याच दरम्यान दलालांचा सुळसुळाट झाला. या लाटेला जे हुरळून गेले त्यांनी कवडीमोलाने आपल्या जमीनी विकल्या. अचानक पैसा आल्याने नवी पिढी

श्रमापासून दूर गेली. काहीही पैशांतून मौजमजा केली, दारुच्या आहारी गेले, काही जण मृत्यूमुखी पडले. त्यांची कुटुंबे उघड्यावर पडली. ज्या वाडवडिलांच्या संपत्तीतून आपल्याला वैभव प्राप्त झालं त्या आईवडिलांनाच दूर लोटलं गेलं. 'बेमट्याचा वेरा' या कथेत बेमट्याच्या तीनही मुलांनी आणि सुनांनी त्याला दूर सारलं आहे.

गावातील ग्रामपंचायतींचं राजकारण या कथांमधून येते. आपल्या स्वार्थानुसार प्रभाग बदलणे, मतांसाठी पैसे घेणे, विविध परवानग्यांसाठी सभासदांनी पैसे खाणे. गावातील निवडणुका आल्यावरच मत मागण्यासाठी गावात येणे, त्याची खोटी आश्वासने, सगळयांना विश्वासात घेऊन निवडणूक बिनविरोध करणे आणि निवडणून आल्यावर भ्रष्टाचार करणे यासगळ्या गोष्टी सर्वसामान्य माणसांचा त्यांच्या विषयी असलेला राग या सारखे विषय कथेत येतात. वर्षोनवर्ष लाकडाचा असलेला साकव कुणीतरी राजकारणी अथवा नेता सिमेंटचा पक्का पुल बांधून देईल या भाबड्या आशेत राहणारी मंडळी आपल्याला परेन जांभळे यांच्या 'साकव' कथेत भेटतात.

'शालन जावाचा हाय' ही कथा मुंबई शहरातील झोपडपट्टीत घडते. त्या कथेतील संवाद आगरी असल्याने तिला आगरी कथा असे म्हणता येईल. झोपडपट्टीत राहणाऱ्या एका मेहनती मुलाचे शाळेत जाण्याचे अपुरे राहिलेले स्वप्न मना शालनं जावाचं हाय या कथेत येतं. गजानन म्हात्रे यांची 'जाण' कथा एका वेगळ्या, मानसशास्त्राची संबंधीत विषयाची मांडणी करते. याच सोबत इतर धर्माशी, समाजाशी आगरी समाजाला वावडं नाही हे देखील दर्शविते. बांगडी विकणाऱ्या असगर चाचावर सगळेच गावकरी प्रेम करतात. श्रावण पाटलाच्या मुलीला म्हणजे प्राजक्ताला असगर चाचाने आपली मुलगी मानली आहे. तिच्या हळदीच्या बांगड्या भरताना असगर चाचा मुसमुसुन रडला आहे. असगर चाचाला श्रावण पाटील मासली भाकर खायला देतो. या सगळ्या गोष्टी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतीक आहेत. प्राजक्ताला साप चावताना पाहिलेला असगरचाचा पुन्हा प्राजक्ताला जिंवत असलेली पाहतो. असगरचाचा गोंधळतो. त्याच्या या गोंधळण्यातून गैरसमज निर्माण होतात. असगरचाचा सत्यता सांगतो आणि गैरसमज दूर होतात.

'भगताचा उतारा' ही हरिभाऊ घरत यांची कथा आगरी समाजातील अस्तित्वात असलेल्या अंधश्रद्धेचं दर्शन घडविते. मात्र त्या सोबत या अंधश्रद्धा तोडून टाकण्याचे कार्य करणारा तुकाराम भगत या कथेचा नायक आहे. हरिभाऊ घरत वर्तमानस्थितीवर भाष्यही करतात. 'हालीचे जमान्यान शेनीमापासून लहानाचे, हालदीचे मांडवापरेन दारूचा पान्यासारखा न शेहरान दारूपिने यो परतिस्टीचा इशय बनून जेला.' या कथेत सर्वसामान्यांचा भूतावरचा असलेला विश्वास, गावाबाहेरचा खडकाळ माळावरचा येताळ बाबा, त्याचा दरबार आणि करनी झालेली माणसे तसेच सर्दी पडसे झालेली माणसे देखील त्याच्या दरबारात जातात असा उल्लेख येतो. येताळबाबा आणि त्याचा ढोंगीपणा, लोकांचा त्यावर असलेला विश्वास आणि तुकाराम भगताने (येथे भगत हे आडनाव आहे) आणि त्याच्या मित्राने येशाने येताळ बाबाचं उघडं पाडलेलं पितळ, नाट्यमय पणे कथन केले आहे.

आगरी संस्कृती दर्शन या कथा घडवितात. वारी भराला आणणे. तेरावा करणे, पिंडाला कावळा शिवणे, घरभरणी करणे, गावकी भरणे अशा रीती कथांतून दिसतात. यातील अनेक कथा गाव उभा करतात. गावात दवंडी पिटविण्याची प्रथा अजुनही दिसते. त्यातून दिलेला आदेश अथवा सूचना न पाळल्यास परिणामांना सामोरे जावे लागेल असेही सांगितले जाते. 'बेमट्याचा बेरा' या कथेत श्रावण महिन्यात गावागावात अध्याय सांगणे आणि अध्याय ऐकणे ही त्या गावची

रीत दिसते. शिवलिलामृत, पांडवप्रताप, रामविजय, हरिविजय, गुरुचरित्र या ग्रंथाचं पठन करुन 'उजिगरा' होतो. श्रावण महिन्यांमध्ये गावात दवंडी पिटविली जाते. "उदयापासना कोन्ही मच्छीकाटा खावाचा नाय रय. सरवान निघलाय... सगल्याही उपासा धराची र ऽऽऽनाय धरील त्याल्हा गावकीन पारती परल र ऽऽ य.."

आगरी बोलीतून विशिष्ट मूल्यव्यवस्था डोकावते. मॉल कथेतील राधूबाय म्हणते, "आरं बाबा कष्टान आगर पिकवाचा न मांड्या मोरून खावाचा..." अशी श्रमाला महत्व देणारी माणसे कथेत भेटतात पण अचानक आलेला पैसा माणसांच्या मूल्यांमध्ये नकारात्मकता दिसते. याच कथेतला नारायण म्हणतो, "धंदा! शेतकऱ्यांनी काय धंदा कराचा असतं!... आरं आसंल तव्ह दिवाली, नसल तह शिमगा!" किंवा राघुबायशी बोलताना म्हणतो, "अगं आजचा आज! उंदया कोनी बघितलाय." आपल्या आई वडिलांडून जर आपल्याला संपत्ती मिळाली असेल तर त्यांचा सांभाळ करणे हे आपले कर्तव्य आहे असे 'बेमट्याचा बेरा' कथेतील गावकरी विचार करतात. एकुणच आगरी समाजाच्या विविध पैलुंचे दर्शन वरील कथा घडवितात.

## ३.३ आगरी कथांतील बोली

कथांतील सर्वच कथा पूर्ण आगरी बोलीत नाहीत. काही कथांमध्ये निवेदकाने प्रमाण मराठीचा वापर केला आहे. त्या कथांमधील पात्रांच्या अनुषंगाने आगरी बोली येते. ज्या कथांमध्ये समूह आहे त्या कथांमध्ये आगरी बोलीचे अस्तित्व जास्त जाणवते. उदा. साकव, म्हारत्याचा तेरावा, बेमट्याचा बेरा, भगताचा उतारा, निवर्नुका, जोल या कथेत बोलीचे प्रमाण जास्त आहे. विशेषतः केवळ आगरी पात्रेच आगरी बोलतात असे नव्हे तर आगरेतर शिक्षक, बांगड्या विकणारे असगर चाचाही आगरी बोलतात. दर बारा कोसावर भाषा बदलते. एकच समाजाची बोली प्रदेशपरत्वे त्यात बारीकसे भेद असतात. या दहा कथा एकाच गावातल्या नाहीत त्यामुळे आगरी बोलीच्या शब्दउच्चाराचे काही सामाईक विशेष खाली नोंदविले आहेत.

१. प्रत्येक बोलीचा स्वतंत्र शब्दनिधी असतो. आगरी बोलीचा शब्दसंग्रह समृद्ध आहे. कवाट (अंडे), जापणे (बोलणे), कुफरान (वाईटकृत्य), चावूल (तांदूळ), खलाटी (पिकाखालील खार जमीन), आखी (खाडीत पकडलेली मासळी ठेवण्याची जाळीदार पिशवी), कंधा (कंदील), कांजी (मासळीचे पातळ कालवण), करबाकोय (रानकोंबडी), जिभरा (टरबूज), चटमटया (खोडकर, चंचल), वरनूस (ब्लॅकेट), रमाठमा (सामानसुमान), पेन्सान (मातीच्या चिखलाचे गोळे पाडण्याचे साधन), काटकाम (मातीकाम), कोंझेरी (चक्कर) असे कितीतरी शब्द कथांत आले आहेत.

२. प्रमाण मराठीशी तुलना करता. आधिक्याने 'ड' चा 'र' होताना दिसतो - झाड > झार, वड > वर, भानगड > भानगर, गोड > गोर, पाडावी > पारावी

३. 'ढ' चा 'र' होताना दिसतो - काढलं > कारलं, एवढा > आवरा, गाढव > गारव

४. 'घ' चा 'ज' होताना दिसतो. घ्यायला > झेवाला. 'झ' चा 'ज' होतो. माझा > माजा

५. झारा - पाना, पानी-पाखरा, मंतर-तंतर, काय-बाय, आवदा-सुवदा असे आगरी अभ्यस्त शब्द आढळून येतात.

६. व्यक्तिनामांच्या पुढे आदरार्थी 'दा' प्रत्यय येते. त्या प्रत्ययांवरुन त्या पात्रांचे वय लक्षात येते. बेमट्यादा, बामदा, मंगल्यादा, खंड्यादा, बेटुदा अशी नावे येतात. तर जी पात्र सधन आहेत आणि राजकारणी संबंधित आहेत त्याची नावे साधारणतः म्हादयाशेठ, दामूशेठ, आवऱ्याचा परभाकर शेठ अशी आहेत. पेसवाय, कमलूवाय अशी स्त्रीयांची नावे येतात. या व्यतिरिक्त राम्याचा किसन्या, बाळया, पदमाकर खारपाटील, डोलमिटक्या बासू, बाबू कोतवल, मोत्या शिनवार अशी काही नावे कथांमध्ये येतात.

७. ज्या व्यक्ती वाईट आहेत अशांसाठी अनेक अपशब्दांचा वापर कथांमध्ये आढळतो. उदा. पानघोऱ्या, घोऱ्याचे पोटचां. माकरा, यरझव्या, बेंजाल, वटकिच्या इ. 'बेमट्याचा वेरा' या कथेत बेमट्यादाची वाया गेलेल्या मुलांना पानघोरे, दिवटे आणि सुनांना कारकोंबऱ्या, कारबाकोयी आणि डाहीक अशी विशेषणे वापरली आहेत.

८. आगरी समाज कृषिसंस्कृतिशी संबंधित आहे. त्याच्याशी संबंधित काही नावे कथांत येतात. जोल पेन्सान, खलाटी, खांड, चिकाट्या कांडा तर मासे पकडणे हा त्यांचा जोडव्यवसाय असल्याने त्याच्याशी संबंधित साधने येतात. पाग, आखी, चलानी, मुलुका इ.

९. मासळीला काही कथेत 'बाव' असा शब्द वापरला आहे. बोईटा, कोलंबी, निवट्या, खवनी, चिवनी, पीता, करपाली, जिताडा ही मच्छीची नावे घेतात. मासली भाकर, कवटाचा पोला, चावलाची भाकर ही आगऱ्यांची खादयसंस्कृती आहे.

१०. जया, टायचून या तांदळाच्या जून्या जातींचे उल्लेख येतात. पुर्वीचं हे धनतोली धन म्हणजे धान आणि ते तोलण्याचे व्यापाराचे ठिकाण म्हणजे घणसोली ही ग्रामनामाची व्युत्पत्ती कळते.

११. आगरी बोलीतील इंग्रजी शब्दांचा समावेश कथांतून आढळतो. इतर सर्वच बोलींमध्ये तो आढळून येतो. काही इंग्रजी शब्द तर बोलींमध्ये बेमालुपणे मिसळून गेले आहेत. नामिनल,

१२. बोलीभाषेतील प्रतिमाविश्व लक्षणीय आहे. उपमेयासाठी उपमानाचा जो वापर केला आहे तो त्याच विश्वातला आहे. 'म्हारक्याचा तेरावा' या कथेत अशी उदाहरणे दिसतात. १. पानी खदल करावा तैसा सख्याचा मन वासूनी खदल केला. २. चिंबोरीसारखा चाव झ्यावा तैसा वाल्यामेस्त्री चावरा झयल्यासारखा बोलला. ३. चिखलावं डगोर टाकावा तैसा चांग्या पाटलाचे नावाशी म्हन्ना टाकला. ४. पायशी माती उखलीत बैलानी धाव झ्याची तैसा सरपंच पुन्हं आयला. तो पिसाळलेले कुत्रयाचे पाठनावं उपट टाकावी तैसा थिकारला.

## ३.४ आगरी कथांतील वाक्प्रयोग आणि म्हणी

१. काऱ्या कोचकणे - काड्या घालणे - चांगल्या कामात अडथळा निर्माण करणे.

२. आमचीच काठी टाठ - आपली काठी ताड असणे - आपलंच म्हणणं खरं किंवा आपलीच बाजू योग्य असे म्हणणे.

३. सुपरापार करणे - सुपडा साफ करणे - संपत्ती अथवा पैशांचा अपहार करणे, लूट करणे.

४. खंडीचे वरनान मुतणे - खूप साऱ्या वरणात मुतणे - कामात घोटाळा करणे.

५. गावाचा उंगलत मावलत होणे - गावाची उगवती आणि मावळती होणे - गावाचे दोन परस्पर विरोधी गट निर्माण होणे.

६. कवटा घालणे - काही काम न करता घरात बसून राहणे - आळशी असणे.

७. चिखोटा काढणे - चिमटा काढणे - टोमणा मारणे

८. लाट लागणे - लाट येणे - भरपूर फायदा होणे

९. फोलफोल होणे - पोलखोल होणे - सर्वांसमोर बेइज्जती होणे

१०. शेनपा करणे : नुकसान करणे

११. डोळ्यावर सुतेरी येणे - डोळ्यावर कोळ्याचे जाळे येणे - समोरचे वास्तव न दिसणे

१२. कुलंखालची कवटा काऱ्हून घेणे - कुल्याखालची अंडी काढून घेणे - सगळे ओरवाडून घेणे.

**म्हणी :** खाली दिलेल्या म्हणी वेगवेगळ्या कथांतल्या आहेत. बहुतांश म्हणी प्रमाण मराठीतील म्हणींशी मिळत्याजुळत्या आहेत. त्यांची रूपं मात्र वेगळी आहेत. कथेतील आलयाशी त्या निगडीत आहेत त्यामुळे खाली सांगितलेल्या अर्थामध्ये हलकासा फरक पडू शकतो.

१. कावला बसाला आणि डावरी मोडाला : कावळा बसायलाच आणि फांदी मोडायला : एखादया गोष्टीचे निमित्त होणे.

२. उरला तो कावला ना बुरला तो बेरूक : उडला तो कावळा आणि बुडाला तो बेडूक : सर्व गोष्टींकडे एकाच नजरेने पाहणे.

३. इकरुन बावव तिकरुन बावव : इकडे आड तिकडे विहिर : कोंडीत सापडणे.

४. उंबोर पिकलं न आसोलनीचं डोलं आलं - उंबर पिकले आणि... एखादी गोष्ट आस्वाद घ्यायच्या वेळीसच असमर्थ होणे.

५. ज्याच्या हातात नाना तो शाना : ज्याच्या हातात पैसा तो शहाणा : आर्थिकदृष्ट्या सधन माणूस शहाणपणा करतो.

६. आसलं तवं दिवाली नसल तवं शिमगा : पैसा असेल तर दिवाळी नाहीतर शिमगा : पैसा असल्यास चैन नाहीतर काहीनाही.

७. भागीचा किरा किरवान मरताय - भागीदारीतला किडा किरवाने मरतो - भागीदारी यशस्वी होत नाही, त्यात नुकसान होते.

## ३.५ आगरी कथांतील आगरी बोलीचे नमुने

सुकतीच्या खाडीत पागून धरमादा आनि म्हादया परतत होते.

"आप्ले या गावाचं काय खरा नाय वग..."

"आथा काय आनखी ?"

"रांडच्या, तू न्हेमी दारवा पिवून खोपटीन निजत जा."

"नाय पून झाला तऱ्ही काय रं ?"

"तू निस्तास गावान ऱ्हातंस पून-"

"खराय रं! मना काय पुन न्हाय म्हायीत"

"बेमटी काकीचे बबन्याचा लगन मोरला."

"लगन मोरला ?"

"मंग मी काय खोटां जापतंय ?"

"तसा नाय रं म्हादया."

"त मंग कसा ?"

"कसा लगन मोरला ?"

"लगन का मोरतान ?"

"कोनी आंदला असला, कोनी लंगरा असला, कोनाचं लफरं आस्लं."

"आप्ले गावानच्या पोरांची लग्ना का मोरतान ते सांग."

"तूच सांग. मना नाय म्हायीत." (साकव - परेन जांभळे)

कावले हागीची बांडगुला जिशी झारावं वावरताना आडालतान तिशी आजपून अंदसरदा पांढरपेशान न खेरवल लोखान हाय रोऊनशी घट उबी हाय. तिचीच ई चित्तत कानी हाय. (भगताचा उतारा - हरिभाऊ घरत)

तुकारामाचा अंदाज खरा ठरला. दोघावनी यो आवाज वलिखला. न त्यांनी कालोखाचा आसरा झेत झेत समशयानाकरं सरकवाला सुरवात केली. थोऱ्या येलान झिपऱ्या शाप केलेल्या कोंबऱ्या झेवून आला. पुरं आलेल्यानं आधीच डगराचा चुला करुन इस्तव केला हुता. फानसाच्या उजेरान त्यांनी कालजी फोफनीसाचं न कोंबऱ्याचं तुकरं केलं. त्यानी आधीच पानी, भांडी न मटणाचा हादान कोदान वाटून हानला व्हता. चुल्यावर टोप ठेवून त्यानी मटणाला फोरनी दिली. (भगताचा उतारा - हरिभाऊ घरत)

गावान्चे गोपाल मास्तरांचे मनान निवरनुका बिन विरोध कराचा इच्चार आला. रस्तन भेटणाऱ्या परतेकाला निवर्नुकी लऱ्हवन्यापेक्षा समजोता करुन बिनविरोध निवर्नुक कराची. सगलं पक्ष गराम आघारीचं. परत्येक पक्षानी आपापला उमेदवार देवाचा. नाय तरी निवर्नुकीला पैसापून मोप लागतय असं ज्याला त्याला सांगत सुटलं. मास्तरांचा मुद्दा हुसलून धराचं. मास्तर बाजूला झालं की येगला बोलत हुतं. याच त्याच कान भरत. गागानचे यक दोघजन काऱ्या कोचकून निवरर्नुका लऱ्हवाच्या असं बोलून आग लावत हुतं. (निवर्नुका - अे.डी. पाटील)

## ३.६ प्रश्न :

१) आगरी कथांतून अविष्कृत झालेले आगरी बोलीचे स्वरूप विशेष स्पष्ट करा.
२) आगरी कथांतील आशय विषय थोडक्यात सांगून आगरी बोलीची स्वरूप वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) आगरी कथांतून अभिव्यक्त झालेले आगरी बोली सांगून बोलीतील वाक्प्रयोग आणि म्हणी यांचे विशेष लिहा.

टिपा -

१) आगरी बोली

२) आगरी कथेचा विकास

३) 'साकव' या कथेचा आढावा घ्या.

४) 'वादळ' या आगरी कथेचा परिचय द्या.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) तुमच्या अभ्यासक्रमाला एकूण किती आगरी बोली कथांचा समावेश केला आहे ?

२) आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र कोणते ?

३) आगरी बोलीचा भाषिक इतिहास प्रथम कोणी मांडला ?

४) आगरी कथेतील समाजजीवन स्पष्ट करा.

५) आगरी बोलीचा आढावा घ्या.

## ३.७ संदर्भ :

१) आगरातल्या वाटा (आगरी बोली) संकलन, संपादन, लेखन - प्रा. डॉ. मनीषा बनसोड, प्रा. प्रज्ञा कुलकर्णी, प्रा. डॉ. अलका मटकर.

२) साहित्य : अध्यापन आणि प्रकार - संपादक : श्री. पु. भागवत, सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने. (प्रा. वा. ल. कुलकर्णी गौरवग्रंथ)

३) मराठींच्या बोलींचा अभ्यास - संपादक - डॉ. अरुण देवरे या ग्रंथाततील घटक : ३ आगरी बोलीतील निवडक कथांचा अभ्यास : घटक लेखक - प्रा. चिंतामण भोईर.

❖❖❖❖

## नमूना प्रश्नपत्रिका

## एस. वाय. बी. ए. (कला ) मराठी

## अभ्यासपत्रिका क्र. 3 सेमिस्टर IVगुण – १००

सूचना :

1. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावे
3. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितो

प्रश्न १ ला .आगरी बोलीचे वैशिष्टे सांगून ,आगरी भाषेचा विकास स्पष्ट करा ? २०

किंवा

मराठी भाषेत आगरी भासहे भाषेचे वेगळेपण स्पष्ट करा ?

प्रश्न २ रा . आगरी कवितेतून स्त्रीजीवन व स्त्रियांच्या समस्यांचा विचार कसा मांडला आहे, सविस्तर आढावा घ्या ?

किंवा

आगरी समाजात झालेले परिवर्तन कवींनी आपल्या कवितांमधून कसे रेखाटले आहे ? २०
प्रश्न ३ रा . आगरी कथांतून अभिव्यक्त झालेले आगरी बोलीचे वाक्येप्रयोग आणि म्हणी यांचे विशेष लिहा ? किंवा

आगरी कथांतून आविष्कृत झालेले आगरी बोलीचे स्वरूप वैशिष्टये कोणते ?

प्रश्न ४ था. खालील दिलेल्या पर्याय निवडून एक टीपलिहा ?कोणतेही तीन ३०

१ आगरी बोली

किवा

आगरी साहित्याचा इतिहास

२) आगरी कवितांची शैली विशेष

किंवा

आगरी कवितेतील दु:ख वेदनांचे चित्रण

३) “साकव ‘ या कथेचा आढावा घ्या

किंवा

“वादळ’ या आगरी कथेचा परिचय द्या ?

प्रश्न .५ वा . एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही पाच ) १०

1. आगरीच्या पोटजाती किती ?
2. बाळ जन्माच्या तिसऱ्या दिवशी आगरी लोक कोणता विधी पार पडतात ?
3. आगरी लोकांचा मुख्य आहार कोणता ?
4. 'साडेबाराचा पलाट ' ही कविता कोणी लिहिली ?
5. 'नवी मुंबई ' ही कविता कोणी लिहिली ?
6. 'खलाटी' या कवितेचा विषय कोणता ?
7. आगरी बोलीचा भाषिक इतिहास प्रथम कोणी मांडला ?
8. आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र कोणते ?
9. आगरी बोलीचा आढावा घ्या ?

❖❖❖❖